कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २२ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## नगराध्यक्षासाठी ३४, तर नगरसेवक पदासाठी ५९६ उमेदवार रिंगणात

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदासह नगरसेवकपदाच्या उमेदवारीचे अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया शुक्रवारी पार पडली. १०७ जणांनी अर्ज मागे घेतले. त्यात नगराध्यक्षपदातील उमेदवारांनी नऊ आणि नगरसेवकपदाच्या ९८ उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये नगरसेवकपदासाठी ५९५ व नगराध्यक्षपदासाठी ३४ असे अंतिम उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. त्यामुळे एकूण ६२९ उमेदवारांमध्ये ही लढत होणार आहे. खोपोलीमध्ये नगराध्यक्ष पदासाठी सात व नगरसेवकपदासाठी ११८, अलिबागमध्ये पान २ वर

इलेक्ट्रीशिअन पाहिजे

साई-इन हॉटेल, मुक्काम चोंढी, अलिबाग रेवस रोड येथे इलेक्ट्रीशिअन पाहिजे. सुस्वभावी, निर्वसनी. अर्जासह समक्ष भेटा

### वे|ध|क

## दूध विक्रेत्याची आत्महत्या

**नागोठणे :** दूध डेअरी धंद्यामध्ये नेहमी आलेली खोट आणि त्यामधून झालेले नुकसान तसेच दूध डेअरी धंद्यातून झालेले कर्ज यामुळे नैराश्य येऊन नागोठण्यातील एका दूध विक्रेत्याने आत्महत्या केली आहे. आत्महत्या केलेल्या मृत व्यक्तीचे नाव महेश अशोक नलावडे (५२) असे असून, तो नागोठण्यातील आंगर आळी भागातील जोगेश्वरी रेसिडेन्सी इमारत, बी विंग, चौथा मजला येथे राहणारा आहे. आत्महत्येची ही घटना गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी रात्री ७.३० ते ८.३० वाजण्याच्या पान २ वर

## पिलरवरून पडून युवकाचा मृत्यू

**रसायनी :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील आसरे होम, गुरूद्वाराशेजारी रिस रसायनी येथे लेबरच्या कामासाठी गेलेल्या ३४ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून, शारदाप्रसाद मिठाईलाल (रा. शेडंग, ता. पनवेल, मूळ रा.- जीबन नारायणपूर, इलाहाबाद-उत्तरप्रदेश) हा युवक गुरूद्वाराशेजारी रिस येथे लेबरचे काम करण्यासाठी गेला होता. कन्स्ट्रक्शन साईटवर काम करत असताना साईटवरील पिलरची उंची कमी असल्याचे त्याच्या लक्षात आले नाही. यामुळे तो पिलरवरून खाली पडून पान २ वर

# मालेगावात जनआक्रोश

### नराधमाला फाशी देण्याची मागणी
### आंदोलकांचा कोर्टात शिरण्याचा प्रयत्न
### पोलिसांकडून लाठीमार

**| नाशिक | प्रतिनिधी |**

**नाशिक जिल्ह्यामधील मालेगाव येथे साडेतीन वर्षीय चिमुकलीवर बलात्कार करत तिची हत्या करण्यात आली. या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा दिली पाहिजे, अशी मागणी करत मोर्चा शुक्रवारी निघाला होता. यावेळी सर्व मोर्चेकरी आक्रमक झाले होते त्यांनी कोर्टामध्ये शिरण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी लाठीचार्ज करत मोर्चेकरांना पांगवलं. क्रूर हा शब्दही कमी पडेल असा गुन्हा आणि अत्याचार करणाऱ्या आरोपीला आमच्या ताब्यात द्या, चिमुकलीला न्याय मिळालाच पाहिजे, आरोपीला जाहीर फाशी द्या, अशी मागणी करीत मालेगाव कोर्टाच्या आवारात मोर्चेकरांनी जोरदार घोषणाबाजी केली.**



दरम्यान, पोलिसांनी कोर्ट परिसरामधून मोर्चेकरांना बाहेर करण्याचा प्रयत्न केल्यावर ते आक्रमक झाले. काही मोर्चेकरी कोर्टाच्या दारापर्यंत पोहोचले होते आणि त्यांनी आत जाण्याचाही प्रयत्न केला, तेव्हा पोलिसांनी खबरदारीने दरवाजा बंद करून घेतला. त्यानंतर मोर्चेकरी आणि पोलिसांमध्ये धुमश्चक्री झाल्याचं पाहायला मिळालं. या मोर्चामध्ये महिलावर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. पोलिसांनी परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी बळाचा वापर करत त्यांना पांगवलं.

नाशिक जिल्ह्यातील डोंगराळे गावातील साडे तीन वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करत तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. १६ नोव्हेंबर रोजी चिमुकली घराच्या अंगणात खेळत होती, त्यावेळी गावातील २४ वर्षीय विजय संजय खैरनार याने तिला चॉकलेटचे आमिष दाखवले. नराधमाने तिला एका टॉवरजवळ नेले, तिच्यावर अत्याचार करत तिची हत्या केली. पोलिसांच्या शोधमोहिमेत आरोपीही होता, त्यावेळी तपास सुरू पान २ वर

### 'ती'ला डॉक्टरांनी वाचवलं, पण नराधमानं संपवलं

पीडित मुलीचा सातव्या महिन्यात तिचा जन्म झाला होता, तिचे वजन ९०० ग्रॅम होते. त्यावेळी डॉक्टर आणि कुटुंबांच्या प्रयत्नामुळे तिला वाचवण्यात आलं होतं. मात्र, आता साडेतीन वर्षाची असताना नराधमाने तिला संपवलं. आरोपीला कोर्टात हजर करण्याच्या मार्गावर नागरिक जमले होते, त्यामुळे आरोपीला व्हीसीद्वारे हजर करण्यात आलं. आरोपीला २७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### महिला, तरुणांनी गेट तोडले

आंदोलनात मोठ्या संख्येने महिला आणि तरुण सहभागी झाले होते. सुरुवातीला बंदोबस्तातील पोलिसांनी गेट लावले आणि आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण, या घटनेने संतप्त झालेला जमाव जसा वाढला, तसा महिला आणि तरुणांनी कोर्टाचे गेट तोडत आत धाव घेतली. त्यामुळे कोर्ट परिसरात एकच खळबळ उडाली.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**नवीन पनवेल :** सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपी कैलास राजेश सप्रे (२१, रा. पाले खुर्द) याला पनवेल तालुका पोलिसांनी १८ नोव्हेंबर रोजी अटक केली. नोव्हेंबर २०२४ मध्ये १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून आरोपीने तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि पीडित मुलगी चार महिन्यांची गर्भवती राहिली. तसेच तिला दारू पिऊन मारहाण केली. याप्रकरणी पीडित तरुणीने तक्रार दाखल केल्यानंतर आरोपी कैलास राजेश सप्रे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपीला अटक केली.

# पोलिसांच्या ताफ्यात 'स्पीड गन'

- रायगड वाहतूक पोलिसांच्या मदतीला आधुनिक वाहन
- वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर राहणार नजर

**प्रमोद जाधव**

**| रायगड |**



रायगड पोलीस दलाच्या हद्दीतील महामार्गासह वेगवेगळ्या मार्गांवर वाहनांची वर्दळ वाढली आहे. मात्र, काही वाहन चालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालवितात. आता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आधुनिक यंत्राद्वारे नजर राहणार आहे. रायगड पोलिसांच्या ताफ्यात 'स्पीड गन' दाखल झाली असून, या आधुनिक वाहनांच्या मदतीने अपघात रोखण्याबरोबरच बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

रायगड दलाच्या हद्दीत स्वतंत्र जिल्हा वाहतूक शाखा आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात वाहतुकीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जाते. जिल्ह्यात ९०हून अधिक वाहतूक पोलीस आहेत. वाहतूक पोलिसांच्या मदतीने जिल्ह्यातील वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला जात असून, हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविणे, पान २ वर

## 'त्या' वृद्ध महिलेची हत्याच

**| उरण | प्रतिनिधी |**

मोठे भोम गावातील घरात ९ नोव्हेंबरला मृतावस्थेत आढळून आलेल्या ९० वर्षीय हिराबाई जनार्दन जोशी यांची बेदम मारहाण करून हत्या करण्यात आल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे. उरण पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

नातेवाईकांपैकीच कुणीतरी हिराबाई यांची हत्या केल्याचा संशय असून, नातेवाईकांची कसून चौकशी करण्यात येत आहे. शवविच्छेदन अहवालामध्ये शरीरावर टणक वस्तूने बेदम मारहाण केल्यामुळे पान २ वर

## देशात चार नवीन कामगार संहिता

### केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

देशात नवीन श्रम संहिता लागू करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे देशभरातील कामगारांना मोठा फायदा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात नवीन कामगार संहिता अर्थात लेबर कोड लागू करण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यानंतर शुक्रवार (दि. २१) अखेर केंद्र सरकारने नवीन कामगार संहिता लागू करण्याची घोषणा केली आहे.

केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाची माहिती केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर (ट्विटर) दिली आहे. आता नवीन संहितेमुळे तब्बल ४० कोटी कामगारांना सुरक्षा कवच देण्यासह वेळेवर आणि किमान वेतनाची हमी देण्यात आल्याचं मंत्री मनसुख मांडविया यांनी म्हटलं आहे.

### कोणत्या संहिता लागू करण्याचा निर्णय?

केंद्र सरकारने आजपासून लागू केलेल्या नवीन कामगार संहितांमध्ये वेतन संहिता (२०१९), औद्योगिक संबंध संहिता (२०२०), सामाजिक सुरक्षा संहिता (२०२०) आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या परिस्थिती संहिता (२०२०) या संहिता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



# व्यापाऱ्यांचा नगरपरिषदेच्या घंटागाड्यांवर अधिकचा भार




| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन शहरातील कचरा संकलन करण्यासाठी नगरपरिषदेच्या चार घंटा गाड्या सेवेत दाखल आहेत. सद्यःस्थितीत बाजारपेठेतील मार्गावर कचरा गोळा करण्यासाठी जाणाऱ्या घंटा गाड्यांवर व्यापारी दुकानातील जमा झालेला सगळा कचरा ठेवत असल्याने घंटा गाड्यांवरील कर्मचाऱ्यांना ही एक डोकेदुखी ठरत आहे.

नगरपरिषदेच्या घंटा गाड्या श्रीवर्धन येथील कानाकोपऱ्यात जाऊन कचरा गोळा करतात. बाजारपेठेत दुकानांची संख्या जास्त असल्याने या मार्गावर सकाळ व रात्र अशा दोन फेऱ्या ठेवण्यात आल्या आहेत. परंतु, बाजारपेठ मार्गावरील अनेक व्यापारी या घंटा गाड्यांचा गैरफायदा घेताना दिसतात. दुकानातील खराब धान्य, कुजलेल्या अवस्थेतील कांदे, बटाटे गोणीत, खोक्यात भरुन घंटा गाडीकरिता ठेवतात.

अनेक वेळा व्यापाऱ्यांचा कचऱ्याने घंटा गाड्या भरत असल्याने घरगुती कचरा कर्मचाऱ्यांकडून योग्य स्थितीत ठेवला जात नाही. परिणामी, घंटा गाडीने वेग घेतल्यावर वरचेवर ठेवलेला कचरा वाऱ्याने उडाल्याने रस्त्यावर पडतो.

नगरपरिषदेचा कचरा डेपो हा दोन किलोमीटर अंतरावर असल्याने अनेक ठिकाणी प्लॅस्टिक पिशव्या, रिकाम्या बाटल्या तसेच कचऱ्यात टाकलेले शिळे अन्नपदार्थ रस्त्यावर आढळून येतात.या बाबतीत नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत असून, श्रीवर्धन नगरपरिषद येथे संपर्क साधला असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

## ज्युट प्रॉडक्ट उद्यमी प्रशिक्षण

**अलिबाग :** बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) मार्फत ज्युट प्रॉडक्ट उद्यमी हे मोफत १४ दिवसीय प्रशिक्षण दि. २९ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर या कालावधीत स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थान रायगड (RSETI) मध्ये आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी रोहा तालुक्यातील झोळंबे या गावातील ३१ महिलांनी सहभाग नोंदवला. प्रशिक्षणामध्ये ज्युटपासून विविध वस्तू बनविणे या विषयाचे सखोल ज्ञान तसेच उद्योजकता विकास, मार्केटिंग, बँकिंग, आर्थिक साक्षरता यासोबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी परीक्षा घेण्यात आली. यावेळी संचालक सुमितकुमार धानोरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# स्वबळावर मराठा भवनचा निर्धार

## किल्ले रायगडावर अलिबागचा मराठा समाज एकवटला



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

स्वबळावर मराठा भवन उभारण्याचा निर्णय अलिबागच्या मराठा समाजाने केला.किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून शपथ घेत महाराजांच्या आशीर्वादाने हा संकल्प पूर्ण करणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अलिबाग तालुक्यातील कानाकोपऱ्यातील असंख्य मराठा बांधव किल्ले रायगडावर एकवटला.

सकल मराठा समाज्योन्नती युवा सामाजिक संस्थेच्या अंतर्गत समरेश शेळके यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व कार्यकारिणीच्या मार्फत हा कार्यक्रम राबवण्यात आला. तालुका कार्यकारिणी, विविध तालुका समिती, गाव संघटक, विभाग संघटक व तालुका संघटक या पदांवर तालुक्यातील विविध गावांतील समाज बांधवांची नेमणूक करण्यात आली. या कार्यक्रमाला तालुक्यातील सर्व कानाकोपऱ्यातून मराठा बांधव एकवटला होता.

अलिबाग तालुक्यातील पाचशेहून अधिक मराठा समाज रायगडावर बुधवारी (दि.१९) दाखल झाला होता. यामध्ये महिला, तरुण मंडळींचा मोठ्या संख्येने सहभाग होता. अलिबाग तालुक्यात मराठा भवन उभारण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. त्याचदृष्टीने सर्व मराठा बांधव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने व अभिषेकाने पावन झालेल्या किल्ले रायगडावर एकत्र आले. बहुउद्देशीय असा मराठा भवन बांधण्याचा निर्धार घेतला असून, त्याची सुरुवात लवकरच केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन भूमीत प्रेरक अशी ऊर्जा मराठा समाजामध्ये निर्माण झाली.

# सुधागडात धम्मध्वजाचा अवमान

## ■ बौद्ध समाजाकडून तपासाची मागणी



| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील भालगुल हद्दीत बंद पडलेल्या अल्ट्राटा डायटेक या कारखान्याच्या आवारात ३१ ऑक्टोबर रोजी गौतम बुद्धांची मूर्ती आढळून आल्यानंतर उद्भवलेल्या प्रकरणात आता नवीन वळण आले आहे. याठिकाणी लावण्यात आलेला बौद्ध धम्माचा पंचशील ध्वज कोणीतरी काढून टाकल्याच्या प्रकारामुळे स्थानिक बौद्ध समाजात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.

यासंदर्भात सुधागड तालुक्यातील बौद्ध बांधवांनी माननीय तहसीलदार कार्यालय, पाली सुधागड येथे लेखी अर्ज देत या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. बौद्ध बांधवांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मूर्ती सापडल्याची माहिती मिळताच त्यांनी पाली पोलीस ठाणे तसेच तहसीलदार कार्यालयास कळविले होते. यानंतर नायब तहसीलदार, अधिकारी तसेच पाली पोलीस ठाण्याचे पीआय व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली होती. तसेच पंचनामा करून पुरातत्त्व विभागाला लेखी प्राचारण करण्याचे आश्वासनही देण्यात आले होते.

मात्र, त्यानंतर इतक्या दिवसांत ना तहसील कार्यालयाकडून, ना पोलीस प्रशासनाकडून कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप बांधवांनी केला आहे. या प्रकाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई न झाल्यास, सुधागड तालुक्यातील सर्व बौद्ध बांधव उग्र आंदोलन करण्यास बाध्य होतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळीराहुलसोनवणे (रिपाई), रायगड जिल्हा संपर्कप्रमुख, भगवान शिंदे, रवींद्र ओव्हाळ, भावेश गायकवाड, मारुती गायकवाड, नरेश गायकवाड, संदेश भालेराव, निवास सोनवणे, दिलीप मोरे, अनिकेत गायकवाड, योगेश गायकवाड, नितीन गायकवाड, नितीन वाघमारे, स्वप्निल गायकवाड, साजन शिंदे, दिनेश गायकवाड, मनोज साळुंखे, मिलिंद शिंदे, सतीश गायकवाड, श्रेयस भालेराव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## सत्य साईबाबांचा जन्मशताब्दी महोत्सव

| अलिबाग | प्रतिनिधी |

सत्य साईबाबांचा जन्म शताब्दी महोत्सव अर्थात १०० वा वाढदिवस रविवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी भारतात व जगातील बहुतेक देशात, तसेच त्यांच्या जन्म स्थळी पुट्टपर्ती आंध्रप्रदेश येथे मोठ्या थाटात संपन्न होणार आहे. त्यानिमित्त अलिबाग तालुक्यातील नागाव येथील प्रशांती निवास, धोबन तळ्यासमोर खारगल्ली-नागाव येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे पाच वाजता कार्यक्रमास सुरुवात होईल.

सकाळी ५ वा. ओंमकारम् सुप्रभातम् ५.१५ वा. नगरसंकिर्तन, ६.३० वा. जन्म उत्सव व ७.१५ वाजेपर्यंत भजन व आरती नंतर दर्शन, ७.३० ते ८.५० प्रसाद वितरण, नास्ता व चहा-कॉफी ९ वा. श्री साई नेत्रालयाचे उद्घाटन त्या नंतर ठिक ११.०० ते दुपारी १.३० दरम्यान सिव्हील हॉस्पीटल अलिबाग, मुख बधीर विद्यालय व श्री समर्थ वृध्दाश्रम, परहुर पाडा येथे नारायण सेवा (अन्नदान) त्या नंतर रात्रौ ८.०० वा. आरती व प्रसादा नंतर कार्यक्रमाची सांगता. तसेच गणपती पाडा थेरोंडा येथे सायंकाळी ६.३० ते ९.३० वा. जन्म सोहळा व महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

सत्य साईबाबांच्या जन्म शताब्दी महोत्सवानिमित्त आपल्या पंचक्रोशीतील गरजू नागरिकांसाठी डोळ्यासंबंधित उपचार/मोती बिंदू/काच बिंदू यांचे मोफत ऑपरेशन कसल्याही प्रकारचे शुल्क न आकारता एकदम मोफत करण्या करीता मान्यवरांचे हस्ते श्री साई नेत्रालय ओ.पी.डी. युनिटचे शुभारंभ, प्रशांती निवास धोबन तळ्यासमोर खारगल्ली-नागांव येथे रविवार दि. २३ नोव्हेंबर रोजी ठिक ९.०० वा. होणार आहे डोळ्यांसंबंधित उपचाराकरिता पेशंटचे रजिस्ट्रेशन आवश्यक आहे. ते शनिवार दि.२२ नोव्हेंबर रोजी दुपारी १ ते ३ यावेळेत प्रशांती निवास येथे करता येईल. रजिस्ट्रेशन करण्यासाठी आधार व रेशन कार्डची झेरॉक्स कॉपी आणणे अनिवार्य आहे, त्या शिवाय रजिस्ट्रेशन होणार नाही याची पेशन्टने दखल घ्यावी, असे सुरेश मेहरे यांनी सांगितले आहे.

## नेरे विभागात दोन नवीन बसथांब्यांचे लोकार्पण

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील नेरे विभागात दोन नवीन बसथांब्यांचा लोकार्पण सोहळा शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या हस्ते पार पडला. शिवसेनेचे पनवेल तालुका संघटक दिनेश मांडवकर, उपतालुका प्रमुख दुंदरे ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील, नेरा विभाग प्रमुख विद्याधर चोरघे यांच्या पाठपुराव्यातून शांतीवन, नॅचरल होम सोसायटी नेरे या दोन ठिकाणी दोन नवीन बसथांबे बांधण्यात आले. नेरे येथील कार्यक्रमादरम्यान अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

**THE REVDANDA CO-OPERATIVE URBAN BANK LTD.**

Revdanda, Dist. Raigad - 402 202. PH. :02141-240039 Fax: 02141-240793 Email ID: revdandabank@rediffmail.com

Ref. No. RCUB/HO/468/2025-26 Date: 21-11-2025

**Possession Notice**

Whereas the undersigned being the Authorized officer for The Revdanda Co-Operative Urban Bank Ltd, Revdanda, Under Securitization and Reconstruction of financial Assets and Enforcement of Security Interest Act,2002 and in exercise of powers conferred under section 13(2) read with rule 3 of the security interest (Enforcement) Rule 2002, issued Demand Notice calling upon the following borrowers to repay the amount mentioned in the notice with further interest incidental expenses and cost within 60 days from the date of receipt of the said notice.

The borrowers has failed to repay the amount, notice is hereby given to the borrowers in particular and to the public in general that the undersigned taken possession of the properties describe here in below in exercise of powers conferred on him under section 13(4) of the said Act read with the Rule 9 of the said rules on following dates written below.

The borrower in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealing with the property will be subject to the charged of The Revdanda Co Operative Urban Bank Ltd. Revdanda, for the amount given below and interest and other expenses thereon.

| Sr.No | Name and Address of the Borrower/ Guarantor | Outstanding As on date 30/06/2025 | Date of Demand Notice | Date of possession | Description of Immovable Properties |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Audumbar Sharad Gondhali AT Agar Ali, Post Revdanda Tal Alibag Dist Raigad | 78,66,408.50 | 07/07/2025 | 29/09/2025 | Tukadi and District Raigad, Pot Tukdi and Taluka Alibag, in the area of Sub Registrar Alibag, Raigad Zilla Parishad and Panchyat Samiti Alibag. Group Grampanchayat Revdanda In Mauje RevdandaCity Servey No.85 Hissa no.1, Area 0.28.20 H,.R. Out of That Area 0.05.10 HR in Talathi Saja Revdanda and house in Group Gram Panchyat Revdanda House No.2954 A of Area 92.84 sq.mtr, 2954 B of Area 92.84 sq.mtr 2954 C of Area 88.47 sq.mtr in Guruprasad Building Maruti Ali, Revdanda owned by Mr. Prasad Sharad Gondhali |
| 2 | Mr. Prasad Sharad Gondhali AT Agar Ali, Post Revdanda Tal Alibag Dist Raigad | | | | |
| 3 | Mr. Sharad Pandurang Gondhali AT Agar Ali, Post Revdanda Tal Alibag Dist Raigad | | | | |
| 4 | Mr. Santosh Posha Kajare At Tadwadi, Po-ValkeTal Murud Dist Raigad | | | | |

Date 21/11/2025
Place-Revdanda

sig/-
**Authorized Officer**
**The Revdanda Co Op Urban Bank Ltd, Revdanda**

# कुडपण बुद्रुक रस्ता अन् थोरली नदी पुलाच्या दुरूस्तीची गरज


(छायाचित्र : शैलेश पालकर)

| पोलादपूर | प्रतिनिधी |

तालुक्यातील सर्वात उंच असलेले ब्रिशकालीन थंड हवेचे ठिकाण कुडपण बुद्रुक येथे यंदा सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन होणार असून यानिमित्त राज्यभरातून असंख्य वारकरी मंडळींची गर्दी उसळणार आहे. मात्र, तत्पूर्वी कुडपण बुद्रुक रस्ता आणि थोरली नदीवरील पुलाच्या दुरूस्तीची गरज ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

ब्रिटिशांनी महाबळेश्वर हे हिलस्टेशन विकसित केले त्याच काळातपोलादपूरतालुक्यातीलकुडपण बुद्रुक गावाचीही हिलस्टेशन अशी नोंद ब्रिटीशदप्तरी तसेच नकाशामध्ये करून विकसित करण्याचा विचार केला होता. या गावाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने माजी मंत्री स्व. प्रभाकर मोरे यांच्याप्रमाणेच माजी आमदार स्व. माणिकराव जगताप यांनी यशस्वी प्रयत्न केले. सद्यःस्थितीत क्षेत्रपाळ या पायथ्याच्या गावापासून थेट कुडपण खुर्द शेलारांच्या कुडपणपर्यंत रस्ता करण्यात आला. मात्र, आता या रस्त्याची पूर्णपणे दुरवस्था झाली आहे.

कुडपण गावाचे सुपुत्र नायक कृष्णा सोनावणे यांनी ब्रिटीशांच्या बॉईज कंपनीतून सैन्यात प्रवेश घेतल्यानंतर स्वतंत्र भारतातील सेनादलामधून पाकिस्तानी सैन्याची आणि कबाली घुसखोरांची दाणादाण उडविल्याबद्दल त्यांचा महावीरचक्र देऊन सन्मान करण्यात आला. त्याकाळी जन्मगावी कुडपण येथे सेवानिवृत्तीनंतर राहून उर्वरित आयुष्य कंठणे, तेथील भौगोलिक परिस्थितीमुळे केवळ अशक्य असल्याने त्यांनी येथे राहणे टाळले. कुडपण येथील भिमाची काठी या दुर्गम सुळक्यावर चढाईसाठी प्रस्तरारोहक तसेच बर्मा ब्रिज बांधून काही गिर्यारोहकही तीन-तीन दिवसांचे कॅम्प करत असत.अलिकडेच, पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळी शेलारमामांची समाधीदेखील असणे, हा निव्वळ कल्पनाविलास असल्याची चर्चा होऊ लागल्याने शेलारांच्या कुडपणची आध्यात्मिक एकजूट पाहता शेलारमामा कुडपणमधील असल्याची आणि त्यांची समाधी आढळून आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

कुडपण बुद्रुक येथील दि. २९ डिसेंबर २०२५ ते दि.१ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त येथे चार मोठे प्रशस्त मंडप उभारण्यात येणार असून, वारकरी भाविकांसाठी तंबू उभारून राहण्याची सोयही करण्यात येणार आहे. मात्र, कुडपण ते क्षेत्रपाल रस्त्याची अतिशय बिकट आणि धोकादायक अवस्था तसेच थोरली नदीवरील साकव व बांधाची जीर्णावस्था पाहता वारकऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह कायम राहणार असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्थानिक प्रशासन, तहसीलदार तसेच रायगड जिल्ह्यातील दोन्ही मंत्रीमहोदयांनी तातडीने लक्ष घालून राज्यातून येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय टाळण्याचे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की **श्री. पुनीत शाह** आमच्या अशिलांना सर्व भार आणि दाव्यांपासून मुक्त खाली नमूद केलेली मालमत्ता विकण्यासाठी वाटाघाटी करत आहेत.

कोणतीही संस्था / व्यक्ति, ज्यामध्ये कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था समाविष्ट आहे, जी सदर मालमत्तेवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर किंवा त्याच्या संदर्भात वारसा, गहाणखत, विक्री, भेटवस्तू, भाडेपट्टा, देवाण घेवाण, धारणाधिकार, परवाना, विभाजन, शुल्क, ट्रस्ट, देखभाल, सुविधा ताबा, व्यवसाय किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपात कोणत्याही प्रकारचा हिस्सा, हक्क, शीर्षक किंवा हितसंबंधाचा दावा करत आहे, त्यांना येथे विनंती केली जाते की त्यांनी हे प्रकाशन झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत **एक्झामिनर प्रेस बिल्डींग, ३५, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथील त्यांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात खालील स्वाक्षरीकर्त्यांना कागदोपत्री पुराव्यांसह कळवावे अन्यथा अशा दाव्याचा संदर्भ न घेता विक्री पूर्ण केली जाईल आणि ती माफ आणि सोडून दिली आहे असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित मालमत्तेचे परिशिष्ट**

"इनर सर्कल अलिबाग" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील विंग/टॉवर डी च्या दुसऱ्या मजल्यावर १३७८.३० चौरस फुट रेरा कार्पेट एरियाचा फ्लॅट क्र. डी-०६ हा निवासी परिसर आहे, तसेच विशेष वापरासाठी सदर अपार्टमेंटला लागून असलेली ३३१.१० चौरस फुटची विशेष बाल्कनी आहे, जी जिल्हा परिषद रायगड आणि पंचयात समिती अलिबागच्या हद्दीतील मौजे दत्तपाडा, ता. अलिबाग, जिल्हा: रायगड येथील गट क्र. २३ असलेल्या जमिनीच्या एका तुकड्यावर बांधली आहे.

२२ नोव्हेंबर, २०२५ रोजी दिनांकित.

सही/-
**तान्या व्ही. रघानी**
भागीदार
**मेसर्स हरिदास अँड कंपनी**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
३रा मजला, एक्झामिनर प्रेस बिल्डींग,
३५, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

पान १ वरून

## नगराध्यक्षासाठी ३४, तर नगरसेवक पदासाठी ५९६ उमेदवार रिंगणात

नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवक पदासाठी ४२, श्रीवर्धनमध्ये नगराध्यक्षपदासाठी चार आणि नगरसेवकपदासाठी ६०, मुरूडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी तीन व नगरसेवक पदासाठी ५८, रोहामध्ये नगराध्यक्ष पदासाठी दोन व नगरसेवक पदासाठी ५१, महाडमध्ये नगराध्यक्षपदासाठी पाच व नगरसेवक पदासाठी ५३, पेणमध्ये नगराध्यक्ष पदासाठी तीन व नगरसेवक पदासाठी ७२, उरणमध्ये नगराध्यक्षपदासाठी चार आणि नगरसेवक पदासाठी ४९, कर्जतमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन आणि नगरसेवक पदासाठी ४६, माथेरानमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवक पदासाठी ४६ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात असणार आहे. या उमेदवारांमध्ये अंतिम लढत होणार असल्याची माहिती जिल्हाप्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## दूध विक्रेत्याची आत्महत्या

सुमारास घडली. आपल्या राहत्या घरातील बेडरूमच्या छताच्या सीलिंग फॅनला कुत्र्याच्या गळ्यात बांधतो त्या पट्ट्याने गळफास घेऊन महेश नलावडे याने आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. या घटनेची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली असून, अधिक तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलिस अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हे.कॉ. दया पाटील करीत आहेत.

## पिलरवरून पडून युवकाचा मृत्यू

त्याच्या डोक्याच्या उजव्या भागास मार लागून गंभीर दुखापत झाली. त्यास उपचारासाठी तात्काळ एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले आहे. याबाबत पवनकुमार मिठाईलाल हा मृत व्यक्तीचा भाऊ याने रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार सहा. फौजदार कोळेकर अधिक तपास करीत आहेत.

## मालेगावात जनआक्रोश

असताना गावातील एका माहिलेने नराधमासोबत चिमुकलीला टॉवरकडे जाताना पाहिले होते. त्यानंतर हे प्रकरण समोर आले आहे. सोशल मीडियावर तिचे फोटो व्हायरल झाल्यामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे.

## पोलिसांच्या ताफ्यात 'स्पीड गन'

ट्रिपल सीट असणे, अशा अनेक प्रकारच्या वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालक महामार्गासह अन्य मार्गांवरून वाहन चालवितात. आता पोलिसांच्या मदतीला आधुनिक पद्धतीचे वाहन दाखल झाले आहे. वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचे इंटरसेप्टर वाहनांची मदत होणार आहे. मारुती इर्टिगाची कार असून, त्यामध्ये फोर डी रडारगन, ब्रेथ ॲनालायझर, लॅपटॉप, फोल्डींग टेबल, बॅटरी, बॅटरी चार्जिंग केबल, रुफ लाईटबार, पी.ए. सिस्टीम आदी सुविधा असणार आहेत. या वाहनाला असलेल्या कॅमेऱ्याच्या मदतीने प्रत्येक गाडीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जाणार आहे. मर्यादेपेक्षा वेगात वाहन चालविणाऱ्यांवर आता या स्पीड गनद्वारे नजर ठेवली जाणार आहे. रायगड पोलीस दलाच्या ताफ्यात पहिल्यांदा ही स्पीड गन दाखल झाली असून, या गाडीचा उद्घाटन समारंभ पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आला.

रायगड पोलीस दलाच्या हद्दीत महामार्गावर ४५ ब्लॅक स्पॉट आहेत. जे वाहन चालक सुसाटपणे वाहने चालवितात, त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी या स्पीड गनचा उपयोग होणार आहे. अपघात रोखण्यासाठी या गाडीची मदत राहणार आहे. वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर लक्ष ठेवले जाणार आहे. रडार, सेंसर अशा अनेक सुविधा स्पीड गनमध्ये आहे. या गाडीमुळे वाहनांची सर्व माहिती एका क्लीकवर समजणार आहे.

– अभिजीत भुजबळ,
पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा

## 'त्या' वृद्ध महिलेची हत्याच

मृत्यू झाल्याचे आढळले. हिराबाई यांचे डोके, हाताचा पंजा, छाती व शरीरावर ठिकठिकाणी गंभीर जखमा होत्या. तुटलेल्या, रक्ताने माखलेल्या दोन लाकडी पट्ट्याही घटनास्थळी आढळल्या. हिराबाईंनी जमीन विकली होती. त्यातील १५ लाखांची रक्कम त्यांच्या खात्यात आली होती. त्यातील पाच ते सहा लाख रुपये त्यांनी आपल्या नातेवाईकांना वाटले होते. याच वादातून त्यांच्या नातेवाईकांपैकी कुणीतरी त्यांची हत्या केल्याचा पोलिसांचा संशय आहे.

**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**निविदा सुचना**

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/४५२५/प्र.क्र.४४४१/२०२५ दिनांक: /११/२०२५

**शुद्धीपत्रक - १**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/१९२/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा मधील सेक्टर-०७, प्लॉट नं.०६ येथे पनवेल महानगरपालिका शाळा बांधणे. | ४०,२८,१३,००३/- |

या कामाच्या ई-निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या :'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २१/११/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त -I**
**पनवेल महानगरपालिका**

**PANVEL MUNICIPAL CORPORATION,**
**PANVEL**
**NOTICE INVITING TENDERS**

Online bids are invited from bidders to perform of the following work on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here-in- after called the CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov.in as per time schedule (key dates) in the notice published on the above website.

| Sr. No | Name of Work | Earnest Money (Rs.) | Cost of tender form (Rs.) |
|---|---|---|---|
| 1. | Purchase of 10 nos. of Truck Mounted Road Sweeping Machines for daily cleaning of Roads in Panvel Municipal Corporation area including Operation & Comprehensive Maintenance of Road Sweeping Machines and Supplying Manpower for period of 5 Years. | 3.06 lakh | 3000/-+5% G.S.T. |

**Key Dates: -**

| Sr.No | Description | Date & Time |
|---|---|---|
| 1 | Publish Date | 21/11/2025 at 16:00 |
| 2 | Document Download Start Date | 21/11/2025 at 16:00 |
| 3 | Document Download End Date | 5/12/2025 at 16:00 |
| 4 | Pre-Bid Meeting | 25/11/2025 at 12:30 |
| 5 | Bid Submission start date | 21/11/2025 at 16:00 |
| 6 | Bid Submission end date | 05/12/2025 at 16:00 |
| 7 | Bid opening date | 08/12/2025 at 16:00 |

Out No -PMC/SWM/2525/Sr.No.112/755/2025
Date- 21/11/2025

SD/-
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**

## निवडक




### आरोग्य शिबिराचे आयोजन

**रसायनी :** वडगाव ग्रामपंचायतीच्यावतीने ठाकूरवाडी, तळवली आणि बोरीवली येथे दोन दिवसांचे आरोग्य शिबिर आयोजित केले होते. बोरीवली शिबिरात डोळ्यांच्या काळजीवर भर देण्यात आला तर इतर शिबिरांमध्ये सामान्य आरोग्य सेवा देण्यात आल्या. शिबिरांसोबतच वाशिवली येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात मुलांचे आरोग्य जागरूकता सत्र आयोजित करण्यात आले होते तसेच बोरिवली येथे कर्करोग जागरूकता सप्ताह आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थी आणि समुदायातील सदस्यांनी सम वयस्कांचा दबाव, मानसिक आरोग्य, सामना करण्याची कौशल्ये आणि निरोगी खाणे यावरील चर्चेत भाग घेतला.या उपक्रमाला मर्कने त्यांच्या सीएसआर कार्यक्रमाद्वारे पाठिंबा दिला होता आणि आरोग्यसेवा, शिक्षण आणि समुदाय विकासात काम करणारी सेक्शन ८ संस्था, थर्ड प्लॅनेट फाउंडेशन, दिल्लीद्वारे हा उपक्रम राबविण्यात आला होता.पाचशे हून अधिक लोकांना आरोग्य जागरूकता समर्थन आणि मोफत तपासणी मिळाली. आत्मविश्वास बळकट करणे, लवकर जागरूकता सुधारणे आणि समुदायासाठी मूलभूत वैद्यकीय सेवा सुलभ करणे हा या प्रयत्नाचा उद्देश होता.



### परळीतील ट्रान्सफॉर्मर धोकादायक

**सुधागड-पाली :** परळी विभागात असलेला एक ट्रान्सफॉर्मर सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत असून, त्याचे संपूर्ण स्ट्रक्चर खराब झाले आहे. या ठिकाणी परिसरातील लहान मुले नेहमी खेळत असतात, त्यामुळे संभाव्य दुर्घटनेचा धोका सातत्याने निर्माण होत आहे.काही दिवसापूर्वी ट्रान्सफॉर्मरवरील एक वायर अचानक तुटली आणि ती जमिनीवर कोसळली. सुदैवाने त्या वेळी मुले थोड्या अंतरावर असल्यामुळे कोणतीही जिवीत हानी झाली नाही. मात्र, ही घटना भविष्यातील गंभीर अपघाताची शक्यता अधोरेखित करणारी ठरली आहे.स्थानिक नागरिकांनी याबाबत चिंता व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. ट्रान्सफॉर्मरच्या आजूबाजूला कोणतीही संरक्षक जाळी किंवा इशारा फलक नसल्यामुळे नागरिक आणि विशेषतः लहान मुलांचे जीव धोक्यात आहेत.या संदर्भात संबंधित वीज वितरण विभागाने तत्काळ दखल घेऊन ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती करावी, संरक्षक उपाययोजना कराव्यात आणि परिसर सुरक्षित करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने वेळेवर पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील दुर्घटना टाळणे कठीण होईल, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

### वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत अव्वल

**रसायनी :** रायगड जिल्ह्यात सर्वाधिक लोकसंख्या असणारी वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीची ओळख आहे. जवळपास ६५ हजार लोकसंख्या आहे. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांचा सहभाग वाढवण्यास व त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी 'माझी वसुंधरा ६.० अभियान' सर्वत्र राबविले जात आहे. या अभियाना अंतर्गत ई-शपथमध्ये राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचा सहभाग होता. त्यात कोकणातील ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांनी माझी वसुंधरामध्ये ८६०१ ई-शपथ घेऊन राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला.त्यामुळे सरपंच उमा मुंढे, उपसरपंच दिपक कांबळे,ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, सदस्य संदिप मुंढे, रसिका खराडे, प्रतिक्षा राऊत, मयुरा गोपाळे,प्रशाली खाने, वेदीका पाटील, माया पाटील, कविता मांडे, संगिता भोईर, स्वप्नाली मैदर्गीकर, वनिता पारंगे, ताई पवार, आकाश जुईकर, राकेश खारकर,केदार भोईर यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### भोकरपाडा येथे रानडुकराची सुटका

**रसायनी :** मुंबई-पुणे हायवे जवळ भोकरपाडा येथे रस्त्याजवळ असणाऱ्या पाण्याच्या टाकीत रात्रीच्या वेळेस रानडुक्कर पडल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाली. याकरिता ग्रामस्थांनी तात्काळ वनविभागाला कळविले असता पोयंजे वन परिमंडळाचे वनरक्षक आनंदा खाने व नेचर फ्रेन्ड सोसायटी पनवेलचे अध्यक्ष संतोष उदरे हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सुमारे अर्धा तासाच्या अथक परिश्रमानंतर पाण्याच्या टाकीत पडलेल्या रानडुकराची सुखरूप सुटका करण्यात आली व त्यास निसर्गाच्या सानिध्यात सोडून देण्यात आले.या रानडुकराच्या सुटकेसाठी भोकरपाडा येथील ग्रामस्थ सतिश आगिवले, दिपक पाटील, हेमंत शिंदे, साहिल पाटील व ग्रामस्थांनी मोलाची भूमिका बजावून पाण्याच्या टाकीत पडलेल्या रानडुकराची सुटका केली.

# महाविकास आघाडीच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शेकाप,काँग्रेस, महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे जल्लोषात स्वागत











●(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शेकाप, काँग्रेस, महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी प्रचाराला सुरूवात केली आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया प्रशांत नाईक यांच्यासह प्रभाग एक ते दहामधील नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचाराला मतदारांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून मतदारांकडून उमेदवारांचे जल्लोषात स्वागत केले जात असल्याचे दिसून येत आहे.

अलिबाग नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्षसह नगरसेवकपदाच्या २१ जागांची लढत होती. मात्र प्रभाग दोनमधील नगरसेवकपदाचे उमेदवार प्रशांत नाईक यांच्यासमोर असलेल्या भाजपचे संतोष साळुंखे यांनी उमेदवारी अर्ज गुरुवारी मागे घेतला. त्यामुळे प्रशांत नाईक यांची बिनविरोध निवड झाली. त्यामुळे कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

अलिबाग नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्षपदासाठी अक्षया प्रशांत नाईक, नगरसेवक पदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधुकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर. प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील, प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे. प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समीर मधुकर ठाकूर. प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्विनी ठोसर. प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर. प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा. प्रभाग नऊमधून योजना प्रदिप पाटील, सागर शिवनाथ भगत. प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

मंगळवारपासून प्रचाराला सुरुवात करण्यात आली. अलिबागमधील कांळबादेवीचे दर्शन घेऊन प्रचार सुरू केला. त्यानंतर चेंढरे, बाजारपेठ, या परिसरात प्रचाराचा शुभारंभ केला. मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. यावेळी शेकाप, काँग्रेस, महाविकास आघाडीच्या उमेदवारांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. शेकाप, महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी मतदारांसह कार्यकर्ते व महिलांशी संवाद साधून निवडून देण्याचे आवाहन केले. या प्रचारात शेकापचे कार्यकर्ते महिला, तरुण मंडळी स्वयंस्फूर्तीने सहभागी होत आहेत. एक वेगळा उत्साह या निमित्ताने दिसून येत आहे

## पर्यावरण रक्षणासाठी चिमुकले दूत

### पनवेल महापालिकेकडून शालेय विद्यार्थ्यांची निवड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पालिकेच्या 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे, यासाठी ङ्गपर्यावरण दूतफ निवडण्यात आले आहेत. कोपरा, मुर्बी, खारघर येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये नुकताच विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

या अभियानांतर्गत कोपरा, मुर्बी, खारघर येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादामध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदल साक्षरता, स्वच्छतेच्या महत्त्वाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

प्रत्येक शाळेतून जबाबदार विद्यार्थ्यांची पर्यावरणदूत म्हणून निवड करण्यात आली. पनवेल महापालिकेसोबत विविध पर्यावरणीय उपक्रम, स्वच्छता मोहिमेत मुले सक्रिय सहभाग घेणार आहेत.

**तरुण पिढी घडवणार**

पर्यावरण विभागाच्या वतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा, महाविद्यालयांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले असून, या माध्यमातून तरुण पिढीमध्ये पर्यावरणपूरक विचारसरणी रुजवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## जनसंपर्क कार्यालयाचे बाळाराम पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**। उरण । प्रतिनिधी ।**



नवी उमेद, नवे ध्येय आणि जनतेच्या सेवेसाठी नव्या वळणावर उभा राहिलेला महत्त्वाचा दिवसम हाविकास आघाडीच्या घटक पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात आणि जनतेच्या मोठ्या उपस्थितीत पार पडले. परिसरातील कार्यकर्ते, नागरिक आणि पदाधिकारी यांच्या पारंपरिक मंगल शुभेच्छांसह कार्यालयाचा शुभारंभ माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.भविष्यातील राजकीय दिशा आणि लोकांसाठीच्या बांधिलकीचे प्रतीक ठरणारा हा क्षण, उभ्या असलेल्या प्रत्येकाच्या मनात एक विशेष आशावाद रोवून गेला.

उद्घाटनानंतर माजी आमदार मनोहर भोईर यांनी थोडक्यात पण हृदयाला भिडणारे शब्द बोलले. लोकांचा विश्वास, जनतेच्या प्रश्नांवर तत्पर प्रतिसाद आणि विकासाच्या कामात पारदर्शकता या तत्त्वांनुसार पक्ष कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील सर्व घटकांना जोडून घेण्याची आणि प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

ओंकार घरत यांच्याशी झालेल्या थोड्याशा अनौपचारिक संवादात भविष्यातील कल्पना आणि लोकहिताचे विचार अधिक स्पष्ट झाले.

जर निवडून आलो तर महिलांची सुरक्षा हे माझे पहिले प्राधान्य असेल, असे सांगताना त्यांच्या आवाजात आत्मविश्वास आणि संवेदनशीलता दोन्ही जाणवत होते. महिलांसाठी सुरक्षित वातावरण, सार्वजनिक स्वच्छतागृहाची उभारणी आणि सुधारणे, तसेच नागरिकांच्या नाळेशी जोडलेल्या विमला तलावाच्या स्वच्छता मोहिमेवर त्यांनी विशेष भर दिला.

तलाव स्वच्छता मोहिमेबाबत ते म्हणाले, विमला तलाव हा केवळ पाण्याचा साठा नाही, भावनांचा आणि सांस्कृतिक वारशाचा भाग आहे. त्याला नवजीवन देणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.या वाक्यानंतर उपस्थित नागरिकांमध्ये टाळ्यांचा गजर झालाजणू त्यांच्या मनातल्या इच्छांना शब्द मिळाले होते.कार्यक्रमात अनेक स्थानिक नागरिक उपस्थित होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्सुकता, बदलाची आशा आणि विकासाच्या नव्या दिशेची प्रतीक्षा दिसत होती. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यालयाच्या माध्यमातून अधिक चांगल्या संवादाची आणि त्वरित उत्तरांची हमी देत जनतेशी सहित्यपूर्ण नातं जोडण्याचा संकल्प व्यक्त केला.

# महाविकास आघाडीचा दमदार प्रचार

## अलिबागमधील प्रभाग दोन व चारमध्ये प्रचाराचा शुभारंभ



●(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीचा प्रचार वेगवेगळ्या प्रभागात सुरु झाला आहे. शहरातील प्रभाग दोनमधील सुषमा नित्यानंद पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे या उमेदवारांकडून प्रचाराचा शुभारंभ शुक्रवारी (दि.२१) सायंकाळी झाला. श्रीबाग येथील अंबामाता देवी तसेच पोलीस लाईनमधील श्रीबापदेवाचे दर्शन घेऊन प्रचाराचा सुरुवात केली. तसेच प्रभाग तीनमधील उमेदवार साक्षी पाटील, आनंद पाटील यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन केले. महाविकास आघाडीचा दमदार प्रचार दिसून आला.

महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रचाराचा धमाका सुरू झाला आहे. अलिबाग शहरातील प्रभाग तीनमधील उमेदवार साक्षी पाटील, आनंद पाटील यांचा प्रचार शुक्रवारी सायंकाळी करण्यात आला. शहरातील घरत आळी परिसरातील घरोघरी जाऊन मतदारांची भेट घेतली. त्यांना मतदान करण्याचे आवाहन उमेदवारांनी केले. यावेळी शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, माजी नगरसेविका अश्विनी पाटील, महेश पाटील, अरुण पाटील, रवि आंबेकर, उदय ठाकूर, रितेश ठाकूर, सागर बडमे, विलास रानडे, विकास पाटील, दिपक म्हात्रे, श्रेयश पाटील आदी कार्यकर्ते या प्रचारात सहभागी झाले.



**प्रशांत नाईक यांचा सत्कार**

अलिबाग नगरपरिषदेच्या प्रभाग दोनमधील नगरसेवकपदाचे उमेदवार प्रशांत नाईक यांची बिनविरोध निवड झाली. भाजपच्या उमेदवाराने माघार घेतल्याने महाविकास आघाडीतील शेकाप, काँग्रेसचे उमेदवार प्रशांत नाईक यांना बिनविरोध घोषित करण्यात आले. शुक्रवारी सायंकाळी प्रचारादरम्यान तळकरनगर ग्रामस्थांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार अक्षया नमिता प्रशांत नाईक तसेच प्रभाग दोनमधील नगरसेवकपदाच्या उमेदवार सुषमा नित्यानंद पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ शुक्रवारी सायंकाळी पोलीस लाईनजवळील बापदेव मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. बापदेवाचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात करण्यात आली. नवीन तळकरनगरमध्ये प्रचार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, नंदकुमार तळकर, बाबू भाई, कमळाकर पाटील, विजय नारे, नवाब पल्लवकर, महेंद्र सापगांवकर, नित्यानंद पाटील, तुकाराम जाधव, समीर गायकवाड, जयेश टोलकर, उदय तेली, सिध्दराज वार्डे, नवीन आवा आदी पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचारात सहभागी झाले होते.

प्रभाग चारमधील नगरसेवकपदाचे उमेदवार महेश शिंदे, रेश्मा घरत यांच्या प्रचाराचा शुभारंभ शुक्रवारी सायंकाळी श्रीबाग दोन परिसरात करण्यात आला. अंबामातेचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात झाली. यावेळी शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, रायगड बाजारचे उपाध्यक्ष प्रमोद घासे, वसंत शिंदे, काँग्रेसचे जिल्हा चिटणीस जगदीश कवळे, मनोहर थळे, विकास चवरकर, के.डी. पाटील, अनिकेत गुरव, तुषार वाईकर आदी महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

## श्रीवर्धन येथे मतदार जनजागृती रॅली




**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन नगरपरिषद यांच्या वतीने मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. लोकशाही बळकटीकरण आणि शंभर टक्के मतदानाचे महत्त्व जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने ही रॅली काढण्यात आली.

रॅली श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय येथून सुरुवात करून शहरातील प्रमुख मार्ग होऊन समुद्र किनाऱ्यावर समाप्त झाली. हा उपक्रम निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार महेंद्र वाकलेकर, मुख्याधिकारी जीवन पाटील आणि नायब तहसीलदार मनोज माने यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये एकूण २५० विद्यार्थी सहभागी झाले.

# नीतीशकुमारयांचे धडे

बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नीतीशकुमार यांनी दहाव्यांदा शपथ घेतली आहे. भाजपला यंदा तिथे काहीही करून आपला मुख्यमंत्री बसवायचा होता. ते शक्य झाले नाही. उलट नीतीश यांच्या पक्षाची ताकद इतकी वाढली की त्याच्याकडे दुर्लक्ष करणे अशक्य झाले. नीतीशयांनी किमान आजपर्यंत तरी आपले व आपल्या पक्षाचे अस्तित्व भाजपपासून वेगळे ठेवले आहे व भाजपला मजबूर होऊन पुन्हा त्यांचे नेतेपद मान्य करावे लागले आहे. नीतीश यांच्या या राजकारणापासून महाराष्ट्रातील राजकारण्यांनी काही धडे घेण्यासारखे आहेत.भाजपने जाणूनबुजून प्रचाराच्या काळात मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर केला नव्हता. अब की बार एनडीए की सरकार अशी घोषणा दिली जात होती. बिहारमधील बहुमताचा आकडा १२३ आहे. महाराष्ट्राप्रमाणेच इथेही भाजप त्या आकड्याच्या जवळ पोहोचेल व नंतर चिराग पासवान व इतरांच्या मदतीने भाजप मुख्यमंत्रिपदावर दावा सांगू शकेल असे मनसुबे होते. नीतीश यांच्या पक्षाला शक्य तितक्या कमी जागा मिळाव्यात असेच धोरण होते. महाराष्ट्रात विधानसभेला एकनाथ शिंदे व अजितदादांचा पाय कापून भाजपवाले पुढे गेले. आता पालिकांच्या निवडणुकीत विरोधक शिल्लक नसल्याने महायुतीची आपसातच उघड मारामारी सुरू झाली आहे. जो प्रयोग तीन वर्षांपूर्वी भाजपने उद्धव ठाकरे यांच्या सेनेवर केला तोच आता एकनाथ शिंदे यांच्यावर चालू आहे. तेव्हा त्या प्रयोगाचे शिंदे हे लाभार्थी होते. आता त्यांच्यावर रडण्याची पाळी आली आहे. शिंदे यांचा पक्ष फोडणे तर चालले आहेच, पण खुद्द शिंदे यांनाही त्यांच्याच ठाण्याच्या बालेकिल्ल्यात जेरबंद करण्याचे घाटत आहे. असे काहीही झाले की शिंदे एकतर रुसून जाऊन सातारा जिल्ह्यात आपल्या गावी जाऊन बसतात किंवा मग थेट दिल्लीत जाऊन अमित शाह यांच्याकडे कागाळ्या करायला जातात. यावेळी ते शाह यांच्याकडे गेले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे पैशांच्या थैल्या घेऊन शिंदे सेनेचे माजी नगरसेवक वगैरे फोडत असल्याचे शिंदे यांनी शाह यांना सांगितले.

### एकनाथांची रडारड- मोठ्टा विनोद

शिंदे यांनी शाह यांच्याकडे केलेली ही तक्रार हा २०२५ सालातला सर्वात मोठा विनोद म्हणायला हवा. असलेच धंदे करून भाजपने आजवर सेना व राष्ट्रवादी फोडली व इतरही पक्षांमधल्या लोकांना आपल्याकडे वळवले. आपल्या रायगड जिल्ह्यातही असे अनेक गद्दार अवतीभवती आहेत. पण शिंदे यांच्या या रडण्याला शाह यांनी अजिबात दाद दिली नाही. महाराष्ट्रातील अनेक गोष्टी मला ठाऊक आहेत असे सांगून त्यांनी शिंदे यांना वाटेला लावले. त्या अनेक गोष्टींमध्ये शिंदे यांनी उल्हासनगरात केलेली फोडाफोडी व इतर अनेक चोऱ्या असतील यात शंका नाही. एकूण इतके दिवस मोदी व शाह यांची सतत तारीफ करूनही शिंदे यांचे प्राक्तन टळले नाही. भाजप हा आमचा नैसर्गिक मित्र आहे असे म्हणायला शिंदे यांना आवडते. पण बळी तो कानपिळी हाच निसर्गाचा नियम आहे हे आता शिंदे यांच्या लक्षात यावे. नीतीशकुमार यांनी शिंदे यांच्यासारखी लाचारीची पाळी आपल्यावर येऊ दिली नाही. गेल्या वेळी म्हणजे २०२० मध्ये नीतीश यांच्या केवळ ४३ जागा आल्या. भाजपच्या जागा कितीतरी अधिक म्हणजे ७५ होत्या. तरीही भाजपला नीतीश यांनाच मुख्यमंत्री करावे लागले होते. भाजपकडे या पदासाठी चांगला चेहरा नाही हे कारण यासाठी सांगितले जाते. पण ते खोटे आहे. राजस्थान व मध्य प्रदेशात वसुंधरा व शिवराजसिंग चौहान यांना डावलून भाजपने ज्यांना मुख्यमंत्री केले त्यांची नावेही बाहेर कोणी ऐकलेली नव्हती. गुजरातमध्ये तर विजय रुपानी यांच्यासारख्या ज्येष्ठाला हटवून पहिल्यांदाच निवडून आलेल्याला मुख्यमंत्री करण्यात आले. भाजपची पुरेशी संख्या असती तर भाजपने काहीतरी पर्याय शोधला असताच. निवडणुकीच्या प्रचारामध्ये उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांना आपण आणखी मोठा नेता बनवणार आहोत असे अमित शाह सांगत होते. पण चौधरी यांची धाव पुन्हा उपमुख्यमंत्रिपदापर्यंतच राहिली. शिवाय विजय सिन्हा यांना दुसरे उपमुख्यमंत्रिपद द्यावे लागले. मोदी यांनी मनात आणले असते तर ते नीतीश यांना केंद्रात मंत्रिपद देऊन मुख्यमंत्रिपदाचा सौदा करू शकले असते. पण तसे करायला ते धजावले नाहीत.

### स्वत्व कायम राखले

नीतीश यांचा हा धाक अजब प्रकारचा आहे. आता आपण आघाडी सोडून जाणार नाही असे नीतीश यांनी सांगितले आहे. पण त्यांचा भरवसा कोणीही देऊ शकत नाही. यापूर्वी असेच आश्वासन आधी देऊन नंतर त्यांनी आपले कट्टर विरोधक लालूप्रसाद यादव यांच्याशी समझोता केला होता. इंडिया आघाडीची स्थापना करण्यात त्यांनीच पुढाकार घेतला होता व पाटण्यात इंडियाची पहिली बैठकही त्यांनीच बोलावली होती. या घटनेला अजून तीन वर्षेही लोटलेली नाहीत. इतक्या प्रकारच्या पलट्या मारूनही नीतीश यांच्या पक्षाची लोकप्रियता अबाधित आहे. त्यांच्या दलबदलूपणाबद्दल लोकांची फारशी तक्रार दिसत नाही. भाजप त्यांना या गोष्टीवरून बदनाम करू शकत नाही. नीतीश गेली वीस वर्षे मुख्यमंत्री असले तरी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप नाही. मोदी किंवा शाह त्यांना इडीचे भय दाखवून गप्प बसवू शकत नाहीत. ही नीतीश यांची मोठी ताकद आहे. नेता आपल्या बाजूने येत नसेल तर त्याचा पक्ष फोडायचा ही भाजपची रणनीती राहिलेली आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, आम आदमी, तृणमूल काँग्रेस या सर्वांच्या बाबतीत हा मार्ग वापरून झाला आहे. नीतीश यांच्या बाबत मात्र भाजपला असले उद्योग निदान आजपर्यंत तरी शक्य झालेले नाहीत. स्वच्छ कारभार व प्रतिमा आणि बिहारी जनतेसोबतचे त्यांचे नाते यामुळे नीतीश यांना हे शक्य झाले असावे. दुसरे म्हणजे त्यांनी भाजपच्या हिंदुत्ववादापासून स्वतःला अलग ठेवले आहे. पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून भाजपने मोदींना पुढे केले तेव्हा नीतीश यांनी त्याला स्पष्ट विरोध केला होता. गुजरात दंगलींमध्ये जे घडले ते विसरता येण्यासारखे व क्षमा करण्यासारखे नाही असे मत त्यांनी व्यक्त केले होते. त्यानंतर आजतागायत, हिंदी पट्ट्यातलेच राज्य असूनही त्यांनी बिहारमध्ये हिंदू विरुध्द मुस्लिम असे वातावरण निर्माण होऊ दिलेले नाही. उत्तर प्रदेशामध्ये मशिदी खोदून आधीची तथाकथित देवळे शोधण्याचा कार्यक्रम जोरात असताना त्याहूनही मागास असलेल्या बिहारमध्ये मात्र असा एकही प्रयत्न झालेला नाही. इकडे महाराष्ट्रात शिंदे यांनी तर चहापेक्षा किटली गरम या न्यायाने हिंदुत्वाचा नारा देणे चालू ठेवले आहे. अजितदादा अजून तरी यापासून लांब असले तरी किती दिवस ते तसे राहतील हे सांगता येत नाही. नीतीश यांची प्रकृती बरी नाही. विस्मरणाचा रोग वाढला आहे. तरीही त्यांनी स्वत्व सोडलेले नाही. त्यामुळेच भाजपला नाइलाजाने का होईना त्यांना मुख्यमंत्री करावे लागले आहे. मराठी नेत्यांनी यातून काहीतरी शिकावे.

विचार

# नियोजनबद्ध आत्मघाती हल्ला

***दिल्लीच्या लाल किल्ल्यानजीक घडवलेला बॉंबस्फोट आणि त्यात वापरलेली स्फोटके पाहता हे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने घडवलेले दहशतवादी कृत्य मानता येते. 'जैश ए मोहम्मद' या अतिरेकी संघटनेशी संबंधित दहशतवाद्यांनी देशाच्या राजधानीमध्ये स्फोट घडवून सुरक्षा यंत्रणांना आव्हान दिले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या सुमारास स्फोट घडवून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे.***

भास्कर निघूट

यंदा २२ एप्रिलला पाकिस्तानी दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पुलवामा येथे केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला. भारताने सहा मेच्या रात्रीपासून चार दिवस पाकिस्तानमध्ये घुसून 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबवली. त्यात 'जैश-ए मोहंमद'सह अन्य दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. शंभरहून अधिक दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. त्यातही 'जैश'चा म्होरक्या मसूद अजहरच्या कुटुंबाचा खात्मा करण्यात आला. त्यामुळे चवताळलेली 'जैश' स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. त्यात पाकिस्तानच्या सत्ताधाऱ्यांची, लष्कराची आणि तिथल्या गुप्तचर संस्थेची दहशतवाद्यांना फूस होती. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये नाक कापले गेल्यानंतर पाकिस्तानमधील दहशतवादी गट काही तरी करणार हे अपेक्षितच होते. त्यामुळे तर 'जैश'ने आता महिलांची दहशतवादी ब्रिगेड स्थापन करून भारताविरोधात वापरण्याचे ठरवले होते. शेख हसिना यांच्याविरोधातील बंडानंतर बांगलादेशमध्ये स्थापन झालेल्या युनूस मोहम्मद यांच्या हंगामी सरकारचे आणि पाकिस्तानचे आता चांगलेच गूळपीठ जमले आहे. त्यामुळे पाकिस्तानने व्हाया बांगलादेश दहशतवादी कारवाया सुरू केल्या आहेत. गेल्या अलिकडेच 'जैश'चा म्होरक्या मसूदने भारतात दहशतवादी कारवाया करण्याची धमकी दिली. त्यानंतर भारतातील तपास यंत्रणा सक्रिय झाल्या. जम्मू-काश्मीर, फरिदाबाद, लखनऊ, अहमदाबाद येथून काहीजणांना अटक केली. यातील बहुतेकांचा 'जैश'शी संबंध आहे. ताज्या बॉंबस्फोटामध्ये दहाजणांचा बळी गेला. भारताचा मानबिंदू असलेल्या लाल किल्ला परिसरातील मेट्रो स्टेशनजवळ अतिशय नियोजनबद्धतेने स्फोट घडवण्यात दहशतवाद्यांचे आत्मघाती पथक यशस्वी झाले आणि त्यातून सामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण करता आली हे महत्त्वाचे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राष्ट्रीय तपास संस्था, दिल्ली पोलिस, केंद्रीय अन्वेषण विभाग, फॉरेन्सिक यंत्रणा तसेच अन्य घटकांशी चर्चा करून दिल्लीच्या स्फोटाचे मूळ शोधायला सुरुवात केली. फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांनी घटनास्थळावरून पुरावे गोळा केले. दिल्ली पोलिस, 'एनआयए', 'एनएसजी' आणि 'एफएसएल'च्या पथकांनी तपास सुरू केला. घटनास्थळाभोवती असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. कोणत्याही दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली नसली, तरी पूर्वी अटक केलेल्यांच्या तपासातून त्यांचा 'जैश'शी आणि अटक केलेल्यांचा दिल्ली बॉंबस्फोटाशी संबंध जोडला जात आहे. स्फोटानंतर राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील सुरक्षा संस्थांना सतर्क करण्यात आले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) दिल्ली मेट्रो, लाल किल्ला, सरकारी इमारती आणि इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळासह सर्व संवेदनशील ठिकाणी सुरक्षा कडक केली. दिल्ली मेट्रो स्थानकांवर आणि विमानतळावर प्रवाशांची तपासणी आणि पाळत वाढवण्यात आली. राजधानी क्षेत्रातील सर्व संवेदनशील प्रतिष्ठानांवर अतिरिक्त दल तैनात करण्यात आले असले, तरी हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. कोणत्याही दहशतवादी घटनेनंतर देशात काही दिवस सतर्कता बाळगली जाते आणि नंतर दुर्लक्ष केले जाते. जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी मोठ्या दहशतवादी हल्ल्यासाठी बनवलेले २,९०० किलोग्रॅम स्फोटके जप्त करण्यासह तीन डॉक्टरांसह आठ संशयितांना अटक केली आहे.

दरम्यान, केंद्रीय एजन्सींसह हरियाणा आणि उत्तर प्रदेश पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये 'जैश-ए-मोहम्मद' आणि 'अन्सार गजवत-उल-हिंद'शी संबंधित 'एका व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करण्यात आला. तो काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये पसरला होता. अटक केलेला संशयित दहशतवादी डॉ. मुझमिल अहमद गनी उर्फ मुसैब याच्या तपासातून पोलिस यंत्रणेला मिळालेली माहिती धक्कादायक आहे. त्याच्याशी संबंधित महिला डॉक्टर डॉ. शाहीन हिला अलिकडेच लखनऊमध्ये अटक करण्यात आली. तिच्या कारमधून एके-४७ रायफल जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या २,९०० किलो स्फोटकांमध्ये अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम नायट्रेट आणि सल्फरचा समावेश होता. यापूर्वी, अनंतनाग येथील रहिवासी डॉ. आदिल अहमद याला सात तारखेला सहारनपूरमध्ये अटक करण्यात आली. तो अनंतनाग येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत होता. आरिफ निसार दार, यासिर-उल-अशरफ आणि मकसूद अहमद दार उर्फ शाहिद हे नौगाम, श्रीनगरचे, मौलवी इरफान अहमद शोपियानचा, जमीर अहमद अहंगर हा गंदरबलचा, डॉ. मुझम्मिल अहमद गनई आणि डॉ. आदिल हे कुलगाममधील नागरिक आहेत.

स्फोट झालेल्या कारच्या विक्रीचे टप्पे पाहिल्यास हे कनेक्शन पुलवामापर्यंत पोहोचते. या प्रकरणात डॉ. उमरसह आणखी काहीजणांना अटक होण्याची शक्यता आहे. मुझम्मिल आणि आदिलच्या फोनवर अनेक पाकिस्तानी नंबर सापडले. हे नंबर या नेटवर्कचे हॅंडलर्स असू शकतात. मुझम्मिल अल फलाह विद्यापीठात डॉक्टर म्हणून काम करत होता. २,९०० किलो स्फोटकांपैकी ३६० किलो स्फोटके आणि काही शस्त्रे तसेच दारूगोळा डॉ. मुझम्मिलच्या फरिदाबादमधील भाड्याच्या घरातून जप्त करण्यात आला. फतेहपूर तागा गावातील एका खोलीतून २,५५० किलो अमोनियम नायट्रेट जप्त करण्यात आले. स्टार पिस्तूल आणि गोळ्या, एक बेरेटा पिस्तूल आणि गोळ्या, एके-५६ रायफल आणि गोळ्या, स्फोटकांसह एके क्रिन्कोव्ह रायफल, रसायने, अभिकर्मक, ज्वलनशील पदार्थ, सर्किट, बॅटरी, वायर, एक रिमोट कंट्रोल, २० टायमर, एक वॉकी-टॉकी सेट, दोन रिकामी काडतुसे आणि धातू जप्त करण्यात आले. मुझम्मिलने श्रीनगरमध्ये 'जैश-ए-मोहम्मद'च्या समर्थनार्थ पोस्टर्स लावली होती. दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करून, सुरक्षा यंत्रणांनी 'जैश-ए-मोहम्मद' आणि भारतातील 'इसिस'चा गट 'अन्सार गजवत-उल-हिंद' च्या धोकादायक योजना उधळून लावल्या; परंतु दिल्लीच्या कटाचा सुगावा तपास यंत्रणांनाही लागला नाही.

जप्त केलेल्या अमोनियम नायट्रेटचा वापर शेकडो अत्यंत शक्तिशाली आयईडी (इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइसेस) बनवण्यासाठी केला गेला असता. अमोनियम नायट्रेट हे एक पांढरे, पावडरसारखे रसायन आहे. ते फार महाग नसते. त्यात डेटोनेटर, बॅटरी आणि टायमर जोडल्याने एक घातक बॉम्ब तयार होतो. डॉ. मुझम्मिल अहमद गनी उर्फ मुसैब याने चौकशीदरम्यान कबुली दिली. त्याच्या पाकिस्तानी हॅंडलरने त्याला सांगितलं होतं, की या वेळी स्फोट इतका भयानक असेल, की मृतांची संख्या हजारोंमध्ये जाईल. दहशतवादी संघटनेची ही धोकादायक योजना अमलात आणण्यासाठी २९०० किलो स्फोटके फरिदाबादला पाठवण्यात आली होती. फरिदाबादमधील यात्रेला लक्ष्य करण्याचा दहशतवाद्यांचा कट होता. त्यात डॉ. शाहीन सहभागी होती. या यात्रेला सुमारे ४० हजार लोक उपस्थित होते. यात्रेला लक्ष्य करण्यापूर्वी संशयित दहशतवादी मुसैबला अटक करण्यात आली. त्यामुळे त्याचा कट उधळला. डॉ. उमर त्यांच्या कटात सहभागी होता. त्याचा संबंध दिल्ली बॉंबस्फोटाशी जोडला जात आहे. तो अजूनही तपास यंत्रणांना सापडलेला नाही. धार्मिक विष पेरून आत्मघाती कृत्ये करायला लावणारे मास्टरमाईंड अजून मोकळे आहेत. दिल्लीमध्ये स्फोट झालेली कार गुरुग्राममधील सलमानच्या नावावर नोंदलेली आहे. पोलिसांनी त्याला ताबडतोब ताब्यात घेतले आणि चौकशी केली. त्याने ही कार ओखला येथील रहिवासी देवेंद्रला विकली. त्यानंतर देवेंद्रने ती अंबाला येथील एकाला विकली. त्यानंतर ती पुलवामा येथील रहिवासी तारिकला विकण्यात आली. तारिकने ती डॉ. उमरला दिली असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. २०१९ मध्ये दहशतवाद्यांनी पुलवामा येथे अशाच प्रकारच्या स्फोटकांनी भरलेल्या वाहनाचा स्फोट केला. त्यात ४० सैनिकांचे बलिदान झाले. कमी काळात कारची विक्री आणि तिचा दहशतवादी कृत्यासाठी वापर यामागच्या कारणाचा तपास यंत्रणा शोध घेत आहेत. कारमध्ये झालेल्या स्फोटाच्या कारणाबद्दल अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. स्फोट कसा झाला, कारमध्ये काही स्फोटक पदार्थ साठवले होते की बॉम्ब, कारची इंधन टाकी किंवा सीएनजी टाकी फुटून स्फोट झाला का, कारमधील लोकांना स्फोटाची अगोदरच माहिती होती का याबद्दल स्पष्ट माहिती समोर येत आहे. तपास अधिकारी कारच्या हालचालींचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. हा जाणूनबुजून केलेला स्फोट असल्यास लक्ष्य कोण होते, असा प्रश्न पडतो. या घटना स्थानिक पातळीवर घडल्या होत्या की त्यांचा देशाबाहेर संबंध होता? हे सर्व तपशील अद्याप उघड झालेले नाहीत. लाल किल्ल्याजवळील पार्किंगमध्ये कारमध्ये एक कारचालक तीन तासांपासून बसला होता. त्यानेच हा स्फोट घडवून आणल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात, तर काहींनी तीन लोक होते, असे सांगितले. त्यामुळे किती लोक होते, याचाही यंत्रणा शोध घेत आहेत. असेही म्हटले जात आहे, की कारमधील व्यक्ती डॉ. उमर मोहम्मद असू शकते. फरिदाबादमध्ये दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश झाल्यापासून तो फरार आहे. डॉ. उमर मोहम्मद 'जैश-ए-मोहम्मद' दहशतवादी नेटवर्कशी जोडलेला आहे. पुलवामा येथील रहिवासी तारिकने ही कार उमरला विकली.

उमर मोहम्मदच दुर्घटनाग्रस्त आय२० कार चालवत असल्याचा संशय आहे. पोलिस आता कारच्या ड्रायव्हरच्या सीटवर सापडलेल्या मृतदेहाची डीएनए चाचणी करत आहेत. दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाला सीसीटीव्ही फुटेजमधून अनेक महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. दहशतवादी गटांकडून वापरली जाणारी ही एक प्रसिद्ध कार्यपद्धती आहे. दहशतवादी संघटना हल्ल्यांसाठी अनेक वेळा विकल्या गेलेल्या वाहनांची निवड करतात आणि या व्यवहारांमध्ये बनावट ओळखपत्रांचा वापर केला जातो. घटनास्थळी पोहोचलेल्या फॉरेन्सिक आणि दहशतवादविरोधी पथकांना काही आश्चर्यकारक गोष्टी आढळल्या. सामान्यतः, अशा बॉम्बस्फोटांनंतर जमिनीवर एक खड्डा तयार होतो आणि शार्पनेल विखुरलेले असते; परंतु येथे असे काहीही आढळले नाही. आरडीएक्स आणि अमोनियम नायट्रेटचे मिश्रण किंवा अत्यंत ज्वलनशील रसायन वापरण्यात आल्यामुळे खड्डा पडला नसावा, असा तज्ज्ञांचा अंदाज होता. हा आत्मघातकी हल्ला होता का याचाही तपास पोलिस करत आहेत. तथापि, या सिद्धांतावर प्रश्न उपस्थित करणारी एक बाब म्हणजे स्फोटाच्या वेळी कारमध्ये तीन लोक होते. सहसा आत्मघातकी हल्ल्यांमध्ये फक्त एक किंवा दोन लोक असतात. लाल किल्ल्याअगोदर ही कार सुन्हेरी मशिदीजवळ गाडी दिसली. ती दोन तास तिथेच राहिली. त्यानंतर ती लाल किल्ल्याकडे नेण्यात आली. बहुतेक लोकांच्या मृतदेहावर शार्पनेलचे कोणतेही चिन्ह नव्हते. एकंदरित, दिल्लीच्या घटनेमागे मोठे षडयंत्र असून त्यातून नागरिकांच्या मनात भीती निर्माण करण्याचा हेतू होता, हे स्पष्ट दिसते.

# खराब रस्त्यांमुळे धुळीचे साम्राज्य



वैभव पाटील

पाऊस थांबताच अलिबाग-वडखळ रस्त्यावर विविध ठिकाणी रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांतील कोरड्या चिखलामुळे निर्माण झालेल्या धुळीच्या त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. तसेच या प्रदूषणामुळे आजाराचा धोका वाढला आहे. रस्त्यांवरील पडलेल्या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ पसरू लागली आहे. पावसाळ्यामध्ये माती टाकून खड्डे बुजवल्याने ही धुळ परिसरात पसरू लागली आहे. तसेच, वाहतूक कोंडी होत आहे. अलिबाग - वडखळ मार्गावर माती, खडी टाकून खड्डे बुजविण्याचा दिखावा करण्यात आला. रस्त्यावर तात्पुरती लावलेली मलमपट्टीदेखील उखडल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीत रस्त्यावरील खड्डे चुकवत प्रवास करणाऱ्या नागरिकांना आता धुळीचा त्रास साहन करत आहे. उखडलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्यामुळे रस्त्यावरून मोठे वाहन गेल्यानंतर मागून जाणाऱ्या दुचाकी चालकाच्या नाका-तोंडात धूळ जाते. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवाशांसह चालक व पादचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या गलथान कारभारामुळे खोकला, सर्दी, घसा दुखण्यासारखे आजार वाढण्याची भिती निर्माण झाली आहे.

अलिबाग-वडखळ मार्गावरील रस्त्यांचे काम मागील चार वर्षापासून प्रलंबित आहे. या रस्त्याचे काम अपूर्ण स्थितीत आहे. पावसाळ्यात माती, खडी टाकून खड्डे बूजविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभामार्फत करण्यात आले. पावसाळ्यात चिखलातून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली होती. अलिबाग वडखळ रस्त्यांवर वाहनांची वर्दळ आहे. या उखडलेल्या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून नागरिकांना खड्डे चुकवण्यासाठीही कसरत करावी लागत आहे. धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या वर्दळीमुळे रस्त्यांवरील खडी मातीची धुळ उडत आहे. रस्त्यावर काही काळ थांबल्यास संपूर्ण धूळ अंगावर थराप्रमाणे साचत असून याच दरम्यान श्वसनातून शरीरात धूळ जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकांचे आजारी होण्याचे प्रमाण देखील वाढल्याचे चित्र आहे. या धुळीचे कण अनेकांच्या नाका तोंडात जात आहे. त्यामुळे काही जण नाक दाबून तर काही जण तोंडाला कपडा बांधून प्रवास करीत आहेत. दुचाकी चालकासह तीन चाकी, चार चाकी या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांमधील चालकांना आणि पादचारी प्रवाशांना या धुळीचा त्रास होत आहे. धुळीच्या प्रमाणात दुपटीने वाढ झाली आहे. या धुळीमुळे ॲलर्जी तसेच श्वसनाच्या विकाराची लागण होत असून, त्याचे दूरगामी परिणाम आरोग्यावर होत आहे. शहरातील वर्दळीच्या प्रमुख रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक वाहनामुळे धूळ उडताना दिसून येते. या रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती न केल्यास धुळीचा प्रश्न कायम राहील. रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मातीमिश्रीत मुरुम टाकला जात असल्यामुळे आणखीनच धुळीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे रस्त्यांवर चष्म्याविना किंवा तोंडाला दुपट्टा न बांधता वाहन चालवणे अवघड झाले आहे. यामुळे अपघाताला एकप्रकारे निमंत्रण दिले जात आहे. धुळीमुळे वातावरण दूषित होत असून, प्रदूषित हवेमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. धुळीमुळे दीर्घकालीन आरोग्याच्या समस्येने श्वसनक्रियेत अडचणी निर्माण होत असून, प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. काहींना सर्दी, खोकला, घसा दुखण्याचे आजार होऊ लागले आहे. सरकारी दवाखान्यांसह खासगी दवाखान्यात या आजाराच्या उपचारासाठी रुग्णांची गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

धूळ श्वासावाटे शरीरात जाते. त्यानंतर धूलिकण श्वसनात जमा होतात. हे धूलिकण श्वसनातून शरीरात, फुप्फुसात, श्वसननलिकेत जातात. ॲलर्जीचा त्रास होणार्यांना सर्दी, खोकला, कफ होणे, धाप लागणे असे त्रास होतात, तर काहींना सर्दी, खोकला आणि घशात दुखणे असे त्रास होत आहेत. या धूलिकणाचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसनाची क्षमता कमी होत जाणे होय.

दिवाळीच्या निमित्ताने खरेदीसाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी नागरिकांची ये - जा सुरु झाली आहे. तसेच पर्यटकही त्यांच्या वाहनांमधून या मार्गावरून प्रवास करीत आहेत. परंतु मातीचे कण व धुळीमुळे प्रवास करणे नकोसे झाले आहे. वारंवार मागणी करूनही या रस्त्याच्या कामाचा वेग प्रशासनाकडून वाढवला जात नसून या रस्त्यासाठी अनेकदा आंदोलनेदेखील केली आहेत. मात्र तरीही प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांची या जाचातून कधी सुटका होणार, असा प्रश्न त्रस्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.

लोकसंसद

## मार्गशीर्ष महिन्याचे महत्त्व

मार्गशीर्ष महिना सुरू होत आहे. मार्गशीर्ष हा मास (महिना) सर्वश्रेष्ठ आहे; कारण तो प्रत्यक्ष भगवंताची विभूती आहे. गीतेत प्रत्यक्ष भगवंतानेच हा मास म्हणजे माझीच विभूती आहे, असे वचन दिले आहे. भगवंताला भक्तीचे पूर्ण फळ या एकाच मासात भक्ताला द्यावेच लागते. हा रहस्याचा भाग गोकुळातील गोपींना ठाऊक असल्यामुळे याच मासात पूर्वी गोपकन्यांनी स्नान, पूजा आदी कर्मे करून श्रीकृष्णभक्तीचा लाभ करून घेतला आहे. या एकाच मासाच्या सेवेने भगवान श्रीकृष्ण संतुष्ट झाले. त्यांनी गोपींना भोग, मोक्षफल दिले, असे प्रत्यक्ष श्रीकृष्णाचे कथन आहे. सर्व पुण्यकर्मांचा उदय याच मासात (महिन्यात) करून घेता येतो. या मासात उषःकाली उठून विधीयुक्त आणि संकल्पयुक्त स्नान केल्यास त्या भक्तावर भगवंत प्रसन्न होतात. त्याला आपला आत्मासुद्धा ते प्रदान करतात. या संपूर्ण मासात ३० ही दिवस स्नान करावे. या मासाच्या स्नानविधीला, तसेच नंद, गोपाल आणि गोपी यांनी केलेल्या स्नानविधीला संतुष्ट होऊन परम तत्त्वाने या स्नानाला वर दिलेला आहे; म्हणून या मासातील स्नानाचे पुष्कळच पुण्य पदरी पडते. गोप-गोपींची उच्च स्तरावरील भक्ती आणि आध्यात्मिक उन्नती होण्याचे हेच एकमेव रहस्य आहे. याच मासात तुळशीचे हार घातलेल्या विष्णुमूर्तीचे नुसते दर्शन घेतले, तरी ब्रह्महत्येपासून मुक्ती मिळते. **सौ. आदिती अमित देखणे, नवीन पनवेल.**

## क्रिकेटप्रेमींच्या उत्साहाला उधाण !

भारत व दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा कसोटी सामना आजपासून (२२ नोव्हेंबर) आसामच्या गुवाहाटीच्या डॉ. भूपेन हजारिका क्रिकेट स्टेडियमवर सुरु होत आहे. भारतातील गेल्या ९२ वर्षातील कसोटी क्रिकेटच्या इतिहासात गुवाहाटीमध्ये प्रथमच कसोटी सामना खेळवला जाणार असल्यामुळे भारतातील कसोटी क्रिकेट खेळपट्ट्यांची एकूण संख्या ३० होईल व कसोटी सामने भरवणाऱ्या शहरांची संख्या २४ वर जाईल. विशेष म्हणजे गुवाहाटीमध्ये सूर्योदय आणि सूर्यास्त लवकर होत असल्यामुळे या सामन्यात परंपरा मोडीत काढत आधी चहापान आणि नंतर जेवणाची वेळ असणार आहे. कसोटी सामन्याच्या इतिहासात असे प्रथमच घडणार आहे. दुसरे म्हणजे मायदेशात खेळवला जाणारा हा ३०० वा कसोटी सामना आहे. क्रिकेटच्या इतिहासात ३०० किंवा त्याहून अधिक कसोटी सामन्यांचे यजमानपद भूषवणारा भारत इंग्लंड (५६६ कसोटी सामने) आणि ऑस्ट्रेलिया (४५० कसोटी सामने) यांच्यानंतर तिसरा देश ठरणार आहे. भारतात आतापर्यंत खेळविल्या गेलेल्या एकूण २९९ सामन्यांपैकी सर्वाधिक ४६ कसोटी सामने भारतीय क्रिकेटची पंढरी असलेल्या मुंबई शहरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी खेळविले गेले. त्यांनतर कोलकात्याच्या ईडन गार्डनचा (४३ कसोटी सामने) क्रमांक लागतो. **-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# समाजवादी विचारधारेचे पाईक मुलायमसिंग यादव



समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज जयंती. २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई गावात जन्मलेले मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायम सिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायम सिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. तीन वर्षापूर्वी १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांचा पाईक असलेला एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला. मुलायमसिंग यादव यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारधारेचे पाईक असलेल्या मुलायमसिंग यादव यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन !

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ नोव्हेंबर

१) श्री.दिलीप चिंतामण शिंदे
कामतआळी, अलिबाग,
२२-११-१९५२

२) श्री.देविदास मोतीराम डबरी
कोळीवाडा, अलिबाग,
२२-११-१९५२

३) मंजूळा उत्तम ओसवाल
बाजार पेठ, अलिबाग
२२-११-१९५५

## गुहागर आगारात सेल्फी पॉईंट

**गुहागर :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या गुहागर आगार येथे प्रवाशांना आणि पर्यटकांना एसटी बसकडे आकर्षित करण्यासाठी खास सेल्फी पॉईंटची सोय करण्यात आली आहे. सेल्फी काढण्यासाठी प्रवाशी आणि पर्यटकांची गर्दी होत आहे. हा आकर्षक सेल्फी पॉईंट बनवण्यासाठी गुहागर आगारमधील कर्मचारी एस. आर. जाधव, ए. डी. काटकर यांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी गुहागर एसटी आगाराचे व्यवस्थापक अशोक चव्हाण यांच्यासह सर्व अधिकारी, कार्यशाळेतील अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

# विकासकांना काम बंदच्या नोटीस

## * वायू प्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिकेच्या उपाययोजना

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबईत गेल्या काही दिवसांपासून हवेचा दर्जा खालावत असून वायू प्रदूषण रोखण्यासाठी महानगरपालिकेने बांधकाम विकासकांसाठी विविध मार्गदशक सूचना जारी केल्या आहेत. तसेच, वायू प्रदूषणाचे नियम न पाळणाऱ्या वरळीतील चार विकासकांना महानगरपालिका प्रशासनाने कामे थांबविण्याची नोटीस बजावली आहे.

वातावरणीय बदल, वाहनांचे उत्सर्जन, रस्ते व बांधकामाच्या ठिकाणी निर्माण होणारी धूळ, लाकूड कचरा जाळणे आदी विविध कारणांमुळे मुंबईतील वायू प्रदूषणात भर पडत असल्याचे निदर्शनास आले. त्यांनतर महानगरपालिकेने वायू प्रदूषण नियंत्रणासाठी विविध अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना केल्या. त्याअंतर्गत, बांधकाम प्रकल्पांमुळे होणारे वायू प्रदूषण कमी करण्यासाठी विकासकांना २८ मुद्द्यांचा समावेश असलेली सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आली. असे असले



तरीही पालिकेने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात काही विकासकांकडून दिरंगाई होत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, वरळीत सुरू असलेल्या इमारतींच्या पाडकामादरम्यान विकासकांनी आवश्यक नियमांचे पालन केले नसल्याची बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास आली. त्यांनतर महानगरपालिका कायद्यातील नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी प्रशासनाने वरळीतील चार विकासकांना कामे थांबविण्याची नोटीस बजावली. विकासकांनी काम न थांबविल्यास कोणत्याही सूचनेविना त्यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येईल, असाही इशारा महापालिकेने संबंधितांना दिला.

बांधकामस्थळ पत्र्याने बंदिस्त करणे, इमारत पाडकाम प्रक्रियेदरम्यान सतत पाण्याची फवारणी करणे, बांधकाम साहित्य उतरवताना धुळ उडू नये यासाठी अँन्टी स्मॉग गनने पाणी फवारावे, बांधकामस्थळी पडून असलेला राडारोडा, मातीवर सातत्याने पाणी शिंपडावे, मोकळ्या भागात सेन्सर-आधारित वायुप्रदूषण मापक यंत्र बसवावे, बांधकामस्थळावरून बाहेर पडणाऱ्या वाहनांची चाके पाण्याची स्वच्छ करावी, सीसी टीव्ही कॅमेरे बसवावे यासह अन्य सूचना करण्यात आल्या आहेत. मात्र या सूचनांचे पालन न केल्यामुळे संबंधित विकासकांना कामे थांबविण्याची नोटीस बजावण्यात आली.

### अन्यथा होणार कारवाई

थंडीची चाहुल लागताच मुंबईतील वायू प्रदूषणात वाढ होत असल्याचे लक्षात घेऊन महानगरपालिका प्रशासनाने २०२३ मध्ये प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी विविध मार्गदर्शक सूचना जारी केल्या. या सूचनांचे पालन करणे बांधकाम विकासकांना बंधनकारक करण्यात आले. तसेच, त्यावर लक्ष ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने प्रत्येक पालिका विभागात भरारी पथकांची नियुक्ती केली. या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

## रस्त्याचे काम पूर्ण; पुलाचे काम मात्र रखडले

**| पालघर | प्रतिनिधी |**

जव्हार तालुक्यातील मनमोहाडी या अतिदुर्गम भागात करोडो रुपये खर्च करून रस्त्याचे काम पूर्ण झाले. परंतु, जव्हार नदीवरील अत्यंत जुनाट व जीर्ण झालेल्या पुलाचे काम मात्र अद्यापही रखडले आहे. तब्बल ३० ते ३५ वर्षांपूर्वी बांधलेला हा पूल दिवसेंदिवस जीर्ण व नादुरुस्त होत असून, सध्या तो वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. त्यामुळे रस्ता तर झाला परंतु पूल तसाच राहिला आहे.

येथील स्थानिक नागरिकांनी अनेकवेळा हा पूल दुरुस्त अगर नवा व्हावा याकरिता पाठपुरावा करूनही



पुलदुरुस्ती वा नव्या पुलाबाबत कोणतीही ठोस भूमिका होत नाही. त्यामुळं मनमोहाडीसह परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामीण भागात मूलभूत सुविधा नसल्याने दैनंदिन व्यवहार, शिक्षण, आरोग्य आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यासाठी नागरिकांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागते. जव्हार नदीचा हा पूल पूर्णपणे नादुरुस्त झाला असून स्ट्रक्चर कमकुवत होत असल्याने भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. त्यामुळे तत्काळ स्ट्रक्चर ऑडिट करून पुल पाडून नवीन पूल मंजूर करावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. परंतु जर वेळेत निर्णय न घेऊन या पुलाचे काम न केल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

> **गेल्या ३० ते ३५ वर्षांपूर्वी बांधलेल्या या पुलामुळे अनेक गावे जोडली गेली आहेत. या परिसरात रस्ता देखील चांगला झाला. मात्र, पुलाची अवस्था दयनीय असल्या कारणाने पूल त्वरित दुरुस्त करण्यात यावा. जेणे करून १५ गावांना जोडणारा मार्ग बंद होणार नाही.**
>
> **एकनाथ दरोडा, सरपंच, झाप ग्रामपंचायत**

## जलवाहिनी फुटल्याने पाणीपुरवठा ठप्प

**| ठाणे | प्रतिनिधी |**

तारापूर औद्योगिक क्षेत्रासह परिसरातील १५ ग्रामपंचायतींना पाण्याचा पुरवठा करणारी एमआयडीसीची मुख्य जलवाहिनी गुरुवारी दुपारी अचानक फुटली. त्यामुळे सुमारे १२०० कारखान्यांसह १५ ग्रामपंचायतींचा पाणीपुरवठा ठप्प झाला. एमआयडीसीच्या जलशुद्धीकरण केंद्रातून तारापूर औद्योगिक क्षेत्राकडे १००० मिमीच्या मुख्य जलवाहिनीद्वारे दररोज सुमारे ७० एमएलडी पाण्याचा पुरवठा केला जातो. गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास बोईसर पूर्वेतील वारांगडे परिसरात विराज कंपनीजवळ ही



जलवाहिनी फुटली. जमिनीखाली साधारण १० ते १२ फूट खोल असलेल्या या पाइपलाइनमधून मोठ्या प्रमाणावर पाणी बाहेर पडू लागल्याने परिसरात काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच तारापूर येथील एमआयडीसीच्या देखभाल आणि दुरुस्ती उपविभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन दुरुस्तीचे काम सुरू केले.

## कल्याण-डोंबिवलीत स्मशानभूमी उजळल्या

**| ठाणे | प्रतिनिधी |**

कल्याण, डोंबिवलीतील काही स्मशानभूमीत यापूर्वी विद्युत पुरवठा खंडित झाल्यास वाहनांच्या हेडलाईट्सचा आधार घेऊन अंत्यविधी पार पाडण्याची वेळ नातेवाईकांवर यायची. मात्र हा त्रास आता कायमचा दूर झाला आहे. स्मशानभूमीमध्ये हायब्रीड सोलर लाईट्स बसवल्यामुळे २४ तास त्या उजळून निघत आहेत.

१४ ऑक्टोबर रोजी महावितरणचा विद्युतपुरवठा खंडित झाल्याने सापर्डे स्मशानभूमीत अंत्यसंस्काराच्या वेळी निर्माण झालेल्या अडचणीबद्दल समाजमाध्यमांसह नागरिकांकडून



केडीएमसीवर ताशेरे ओढण्यात आले होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी तत्काळ पर्यायी उपाययोजना करण्याचे आदेश दिले. पहिल्या टप्प्यात केडीएमसीच्या १० स्मशानभूमींमध्ये २२ हायब्रीड सोलर फिटिंग बसविण्यात येत आहेत. यामध्ये लाल चौकी स्मशानभूमीत तीन, मुरबाड रोडला असलेल्या स्मशानभूमीत तीन, सांगळेवाडी बैलबाजार स्मशानभूमीत तीन, सापर्डे स्मशानभूमीत एक, विठ्ठलवाडी स्मशानभूमीत तीन, यादवनगर स्मशानभूमीत तीन, टिटवाळ्यातील इंदिरानगर स्मशानभूमीत दोन, डोंबिवलीच्या शिवमंदिर स्मशानभूमीत दोन, उंबर्डे स्मशानभूमीत एक आणि बारावे स्मशानभूमीत एक असा समावेश आहे.

## पत्नीनेच केली पतीची हत्या

**ठाणे :** नवघर परिसरातील सोनल पार्क इमारतीमध्ये सुशांतो यांचे ज्वेलरी बनवण्याचे दुकान होते. मंगळवारी रात्री सुशांतो यांचा मृतदेह दुकानात आढळून आला होता. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून सुशांतो यांची पत्नी अमृता पाल आणि तिच्या दोन मुलांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी हत्येची कबुली दिली. पतीकडे पैसे मागूनही तो पैसे देत नसल्यामुळे हत्या केल्याचे अमृताने पोलिसांना सांगितले.

## तोरंगण घाटात टेम्पो पलटी होऊन एकाचा मृत्यू



**| पालघर | प्रतिनिधी |**

नाशिक-डहाणू राज्यमार्गावर मोखाडाजवळील तोरंगण घाटात टेम्पोचा भीषण अपघात झाला. या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींवर विविध शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

जव्हार मोखाडा तालुक्यातील अनेक मजूर दररोज नाशिक परिसरात रोजगारासाठी ये-जा करतात. मात्र एसटीचे भाडे परवडत नसल्यामुळे हे मजूर खाजगी वाहनातून दाटीवाटीने धोकादायकरित्या प्रवास करतात. असेच काही मजूर नाशिक परिसरात मजुरीसाठी गेले होते. मात्र कामगार परतत असताना हा भीषण अपघात घडला.

मोखाडा हद्दीत असलेल्या तोरंगण घाटातील उतारावर गुरुवारी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास ब्रेक फेल होऊन होऊन टेम्पो उलटला. अपघातामध्ये सुभाष दिवे (२८) रा. हाडे ता. जव्हार या मजुराचा मृत्यू झाला, तर ३० पेक्षा अधिक मजूर जखमी झाले आहेत. टेम्पोला अपघात झाल्याचे समजतात मोखाडा येथील पोलीस कर्मचारी, शासकीय यंत्रणा आणि परिसरातील राजकीय व सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांनी तातडीने अपघात स्थळी धाव घेऊन मदत कार्य सुरू केले.

### अनेकजण जखमी

अपघातातील जखमींपैकी पाच जणांना नाशिक येथील शासकीय रुग्णालय, सात जणांना त्र्यंबकेश्वर ग्रामीण रुग्णालय तर इतर जखमींना मोखाडा ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिकांमधून उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## बसस्थानकातील शौचालयाला टाळे

### ● साफ करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे कारण

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

प्रवासी जनतेच्या मागणीनुसार पावस बसस्थानकामध्ये बांधण्यात आलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालयाची टाकी चुकीच्या पद्धतीने बांधल्यामुळे वारंवार भरते. त्यामुळे परिसरामध्ये दुर्गंधी मोठ्या प्रमाणात पसरत असल्याने परिवहन खात्याने ती साफ करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने कुलूप ठोकण्यात आले आहे. तरी तातडीने शौचालयाच्या टाकीची दुरुस्ती करून प्रवासी जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

पावस बसस्थानकातील शौचालयाची दुरवस्था झाल्यामुळे नवीन शौचालय बांधण्यात यावे, अशी मागणी प्रवाशांतून करण्यात आली. अखेर पावस ग्रामपंचायतीतर्फे स्वच्छ भारत अभियानांतर्गत २ लाख ६७ हजार रुपये खर्च करून शौचालय बांधण्यात आले. त्यानंतर पावस बसस्थानक इमारत व परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले; परंतु, नव्याने बांधलेल्या शौचालयाच्या टाकीचे काम योग्यत-हेचे नसल्यामुळे व प्रवासी जनता त्याचा वापर करत असल्यामुळे वारंवार शौचालय भरत होते. त्यावेळी परिवहन खात्याच्या माध्यमातून त्याची स्वच्छता केली जात होती. त्याकरिता प्रत्येक संबंधित खात्याला दहा ते पंधरा हजार रुपये खर्च येत होता. हा खर्च त्यांना परवडत नसल्यामुळे त्या शौचालयाच्या भागाला कुलूप लावण्यात आले. त्यानंतर बस स्थानकाच्या बांधकामाची पाहणी करण्याकरिता पालकमंत्र्यांनी दौऱ्यात शौचालयाची पाहणी केली असता नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून यावर तोडगा काढू, असे आश्वासन पावस परिसरातील प्रवासी जनतेला दिले होते. आता या गोष्टीला सहा महिने उलटले तरी अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

विरारमधील वृक्षप्रेमी तरुणाचा स्तूत्य उपक्रम | ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी

# महापालिकेच्या मृत झाडांना मिळाली नवसंजीवनी

**| पालघर | प्रतिनिधी |**

वसई-विरार महापालिकेकडून सुशोभीकरणासाठी रस्त्याच्या कडेला आणि दुभाजकांवर लावण्यात आलेल्या रोपांकडे ठेकेदारांनी केलेल्या दुर्लक्षामुळे ती मृत पावली होती. मात्र, विरार येथील एका वृक्षप्रेमी तरुणाने हाती घेतलेल्या उपक्रमामुळे या झाडांना नवसंजीवनी मिळाली आहे.

वसई-विरार महापालिकेकडून शहरातील रस्ते आणि दुभाजकांच्या सुशोभीकरणासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले होते. या रोपांच्या देखभालीची



जबाबदारी ठेकेदारावर सोपवण्यात आली होती. परंतु, ठेकेदारांच्या दुर्लक्षामुळे झाडांची योग्यरित्या निगा राखली जात नसल्याचे स्पष्ट झाले आहे. नोव्हेंबर महिन्यात वाढलेला उकाडा आणि वाढत्या धूळ प्रदूषणामुळे शहरातील अनेक ठिकाणीची झाडे सुकून गेली, तर काही रोपांची अवस्था बिकट झाली आहे.

परंतु, विरार येथे राहणारे चंद्रकांत सुवर्णा या वृक्षप्रेमी तरुणाने हाती घेतलेल्या उपक्रमामुळे या झाडांना नवसंजीवनी मिळाली आहे. चंद्रकांत सुवर्णा हे दररोज सकाळी आणि संध्याकाळी हातात पाण्याचे डबे घेऊन नित्यनेमाने २०० ते २५० झाडांना पाणी देण्याचे काम करतात, ज्यामुळे शहरातील अनेक झाडांचे पुनरुज्जीवन झाले आहे. तसेच विरार येथील विराटनगर येथे त्यांनी १३० झाडे लावली आहेत. ज्यात आंबा, चिंच, पिंपळ अशा विविध प्रकारच्या झाडांचा समावेश आहे.

महापालिकेने विरार पश्चिमेकडे हजारो झाडे लावली आहेत. त्यातील काही मृत पावली आहेत. तर, उर्वरित झाडांना सकाळ संध्याकाळ पाणी देऊन मी त्यांची काळजी घेत आहे. मात्र, झाडे लावल्यानंतर झाडांना सुरक्षा जाळ्या असणे, त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने ज्या ठेकेदारांना कंत्राट दिले आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी चंद्रकांत सुवर्णा यांनी केली आहे.

### कोट्यवधींचा खर्च वाया

महापालिकेकडून कोट्यवधी रुपये खर्च करून रस्त्यांच्या सुशोभीकरणासाठी दुभाजक आणि रस्त्यांच्या कडेला विविध प्रकारची रोपे लावण्यात आली होती. तर या झाडांची निगा राखण्यासाठी कंत्राटदार देखील नियुक्त करण्यात आला होता. मात्र, देखभालीअभावी या झाडांची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे महापालिकेने केलेला कोट्यवधींचा खर्च वाया गेला असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. तसेच नागरिकांना स्वखर्चाने या झाडांची काळजी घ्यावी लागत असल्यामुळे महापालिकेच्या कार्यपद्धतीवरही संताप व्यक्त केला जात आहे.

## निवडक

### टीईटी परीक्षा केंद्रावर सीसीटीव्हीची नजर



**रत्नागिरी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या बहुप्रतीक्षित शिक्षक पात्रता परीक्षेची रत्नागिरी जिल्ह्यात जय्यत तयारी करण्यात आली आहे. २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या परीक्षेसाठी जिल्ह्यात १० केंद्रांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने पारदर्शक व्यवस्थेसह तयारी केली आहे. शिक्षक भरतीसाठी अनिवार्य असलेली ही परीक्षा शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा प्रयत्नशील आहे. जिल्ह्यात या शिक्षक पात्रता परीक्षेसाठी रत्नागिरी जिल्ह्यातून अर्ज केलेल्या उमेदवारांची संख्या लक्षणीय आहे. या परीक्षेसाठी १० केंद्रांची निश्चिती करण्यात आली आहे. त्यामध्ये पेपर १ साठी १,७६२ उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात जाती आहे. पेपर २ साठी २,५८९ उमेदवारांची संख्या आहे. या परीक्षेत कोणताही गैरप्रकार होऊ नये आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक वातावरणात पार पडावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत विशेष काळजी घेतली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची बारकाईने नजर असणार आहे. यामुळे परीक्षा हॉलमधील हालचालीवर २४ तास नियंत्रण राहणार आहे. उमेदवारांच्या ओळखपत्राची खात्री करण्यासाठी केंद्रावर प्रत्येकाचे थम्ब रीडिंग घेतले जाणार आहे. यामुळे बोगस उमेदवार बसण्यास पूर्णपणे प्रतिबंध होणार आहे. परीक्षेवेळी प्रशासकीय कामकाजासाठी ३५० कर्मचाऱ्यांची नियोजनासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.



### गावठी दारूच्या हातभट्ट्या उध्वस्त

**वसई :** वसई-विरार शहरात छुप्या मार्गाने गावठी दारूच्या हातभट्ट्या लावल्या जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. नुकताच वसई गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकाने नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कामण येथील देवकुंडी जंगल परिसरात अवैधरीत्या चालणाऱ्या गावठी दारूभट्ट्या उध्वस्त केल्या आहेत. यात सुमारे तीन लाखाचा मुद्देमाल नष्ट केला आहे. वसई विरारमध्ये जंगल, डोंगर, कांदळवन क्षेत्र अशा विविध ठिकाणच्या भागात गावठी दारू तयार करण्यासाठी हातभट्ट्या लावण्यात येत आहेत. त्यातून तयार होणारी दारू विविध ठिकाणी वितरित केली जात आहे. दिवसेंदिवस गावठी दारू हातभट्टीचे अड्डे वाढत आहेत. अशा बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. नुकताच नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कामण येथील देवकुंडी जंगल परिसरात अवैधरीत्या गावठी दारू तयार करण्यासाठी हातभट्टी लावली जात असल्याची गुप्त माहिती वसई गुन्हे शाखा कक्ष २च्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने त्याठिकाणी छापा टाकून कारवाई केली आहे. कारवाईमध्ये ३ लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### चारित्र्याच्या संशयातून पत्नीची हत्या

**मुंबई :** चारित्र्याच्या संशयातून मध्यरात्री डोक्यात दगड घालून पतीने पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना मालाडमध्ये उघडकीस आली आहे. सिराज नाईक असे आरोपी पतीचे नाव असून तो पत्नी मुमताजसह मालाडमधील मालवणी परिसरात राहत होता. सिराजला पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. यामुळे दोघांमध्ये सतत भांडण होत होते. बुधवारी रात्री उशिरा पती-पत्नीमध्ये पुन्हा वाद झाला. यानंतर पत्नी झोपी गेली. मात्र या वादाचा राग मनात धरून पतीने पत्नीच्या डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. यानंतर गुरुवारी सकाळी पती मालवणी पोलीस ठाण्यात गेला आणि हत्येची कबुली दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत जखमी मुमताजला रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. यानंतर पोलिसांनी पतीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

### देवराईत विद्यार्थ्यांकडून स्वच्छता मोहीम

**चिपळूण :** कळबंस्ते येथील शासनाच्या पडीक जागेत वनस्पती उद्यान आणि देवराईची हिरवळ वाढत आहे. देवराई अधिक सुशोभित होण्यासाठी येथे शहर परिसरातील विद्यार्थ्यांनी देवराईस भेट देत विविध वनस्पती व देवराईच्या झाडांची माहिती घेतली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी देवराईत वाढलेले गवत व कचरा काढून स्वच्छता अभियान राबवले. येथील प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांनी पुढाकार घेत प्रशासकीय अधिकारी, विविध सेवाभावी संस्था, कंपन्या आणि सह्याद्री निसर्ग मित्रच्या माध्यमातून कळबंस्ते येथे देवराई आणि वनस्पती उद्यान विकसित केले आहे. सुमारे दोनशेहून अधिक प्रजातीची दीड हजार झाडे येथे लावली आहेत. पावसाळ्यात लावलेली ही झाडे चांगलीच वाढू लागली आहेत. जी रोपे मृत पावली तेथे नव्याने त्याच जातीची रोपे पुन्हा लावण्यात आली. काही रोपे जिल्ह्यात न मिळाल्याने ती पुण्यातून आणली. विद्यार्थ्यांना या वनस्पतींच्या बोटॅनिकल बॅलची माहिती होण्यासाठी प्रांत कार्यालय व गटशिक्षणाधिकारी यांच्यातर्फे डी. बी. जे. महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल सती चिंचघरी, आर. सी. कॉलेज पेढे, गद्रे इंग्लिश स्कूल चिपळूण, ख्रिस्त ज्योती स्कूल वालोपे, मेरी माता स्कूल खेर्डी या शाळांतील सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी भेट देऊन स्वच्छता अभियान उपक्रम राबविला.

### ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक

**मुंबई :** 'नाशिक क्राईम ब्रँच येथून बोलतोय, तुमच्या खात्यामध्ये बेकायदेशीर पैसे आले आहेत, त्याची पडताळणी करायची आहे. या गुह्यांत तुमचे नाव येत आहे', अशी बतावणी करत सायबर गुन्हेगाराने काळाचौकी येथील एका ज्येष्ठाला डिजिटल अटक केली. मग त्यांना भीती दाखवत नऊ लाख ७७ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली होती. त्या फसवणूक करणाऱ्या भामट्याला काळाचौकी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. काळाचौकी परिसरात राहणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाला सायबर गुन्हेगाराने मी नाशिक गुन्हे शाखेचा अधिकारी बोलतोय, तुमच्या खात्यामध्ये बेकायदेशीर पैसे आले असून त्या प्रकरणात तुमच्यावर कारवाई होणार, असे घाबरवत डिजिटल अटक केली. त्यानंतर या प्रकरणातून बाहेर काढतो असे सांगत त्यांच्याकडून नऊ लाख ७० हजार रुपये उकळले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्या नागरिकाने काळाचौकी पोलिसांत धाव घेऊन फसवणुकीची तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा दाखल झाल्यावर सपोनि राऊत, महिला उपनिरीक्षक शीतल माने व पथकाने तांत्रिक बाबींचा कसून तपास केल्यावर ज्येष्ठ नागरिकाला फसविणारा हा जळगावातील भुसावळचा रहिवासी असल्याचे समजले. त्यानुसार आणखी खोलात जाऊन तपास करत पथकाने राहुल बागल (३४) या तरुणाला पकडले. त्याच्याकडे अधिक चौकशी सुरू आहे.

# पाली नगरपंचायतीची करवाढ स्थगित




। सुधागड-पाली । प्रतिनिधी। पाली नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. २१) नगरपंचायतीच्या सभागृहात पार पडली. या सभेत विविध विषयांवर चर्चा झाली. यामध्ये सर्वाधिक महत्त्वाची चर्चा करवाढीच्या प्रस्तावावर केंद्रित होती.

सभेत नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. २०२५/२०२६ आर्थिक चालू वर्षाची करवाढीला स्थगिती देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे पालीकरांना दिलासा मिळणार असून, नगरपंचायतीने जनतेच्या हिताचा विचार करून पुढाकार घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

सभेत बोलताना नगराध्यक्ष पराग मेहता यांनी सांगितले की, यापूर्वी ३० डिसेंबर २०२४ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांनी करवाढ रद्द करण्याचा ठराव घेतला होता. मात्र, प्रशासनाने या ठरावावर अपील केल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर सुनावणी झाली आणि २५ मार्च २०२५ रोजी करवाढी संदर्भात नगरपंचायतीने केलेला ठराव जिल्हा अधिकारी अलिबाग यांनी रद्द करण्यात आला. त्यानंतरही नगरपंचायतीने पालीकरांच्या हितासाठी पुन्हा एकदा करवाढीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. नगराध्यक्ष पराग मेहता यांनी स्पष्टपणे सांगितले की, पाली नगरपंचायतीतील सर्व नगरसेवक हे जनतेच्या बाजूने ठामपणे उभे आहेत आणि त्यांच्या हिताचा विचार करूनच निर्णय घेत आहेत. या निर्णयामुळे पाली शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये जनतेच्या अपेक्षांची जाणीव जागवण्याचा प्रयत्न यशस्वी ठरल्याचे चित्र दिसत आहे.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल पुनम राजेश जंगम यांनी खालील नमुद केलेली निवासी सदनिका मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक राजेश गोविंद पाटील यांचेसोबत चालु आहे. सदरची निवासी सदनिका मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर निवासी सदनिकेचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे (पुर्वीची ग्रामपंचायत वरसोली) हद्दीतील दुय्यम निबंधक अलिबाग यांच्या अधिकार क्षेत्रातील गांव चेंढरे येथील सर्व्हे नंबर ६२, हिस्सा नं. १, प्लॉट नं. २, क्षेत्र ६६१ चौ. मी. या बिनशेती मिळकतीवरील विजया सह. गृह. संस्था मर्या. या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ४, क्षेत्र ५८५.०६ चौ. फुट बिल्टअप, चेंढरे ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३३१/१४ ही निवासी सदनिका

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २१/११/२०२५

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु. पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक **नितीन प्रभुदास सोमाणी व विजय गेनुभाऊ गुळवे** यांच्या हिश्यातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत असून, आमचे आशिल विजय गेनुभाऊ गुळवे यांनी सदर मिळकतीचे पैकी क्षेत्राचे खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीची प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**-:मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे :- वानिवली, तालुका- खालापूर, जिल्हा रायगड.**

| अ.क्र. | सर्व्हे गट क्र. | एकूण क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| १ | ३२/१ | ०-३६-०० | १.४७ |
| एकूण क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | | ०-३६-०० पैकी नितीन प्रभुदास सोमाणी यांच्या हिस्स्याचे ०-१८-०० हे. आर क्षेत्राचे खरेदीखत. | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ॲड. आकाश ज्ञानेश्वर कांबळे**
कार्यालयीन पत्ता-आप्पा गोरे संकुल, गाळा क्र. १७,
बँक ऑफ इंडिया एटीएमच्या बाजूला,
मु.पो. तालुका खालापूर, जिल्हा रायगड ४१०२०२
मोबाईल नं. ८१४९३७१५१४


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- अलिबाग एसटी स्टॅंड जवळ दुकानगाळा अलिबाग समुद्राजवळ फ्लॅट विक्री करणे आहे. विद्यानगरजवळ हॉटेल भाड्याने देणे आहे.९७६४५४८६७९.
- Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549
- गिरीष एंटरप्रायझेस येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे. शैक्षणिक पात्रता : १२ वी उत्तीर्ण, टु व्हीलर चालवता येणे आवश्यक. स्थानिक उमेदवारास प्राधान्य. संपर्क -८२३७३१६२१८. ऑफीस वेळ :- ९-३० ते ६-३०
- कन्स्ट्रक्शन ऑफीस अलिबाग येथे ३ महिन्याकरिता अकाऊंटच काम करण्यासाठी तात्पुरती मुलगी पाहिजे. संपर्क-८८०६७५९०९०
- अंश एन्टरप्रायजेस सोलर ऑफीसमध्ये ऑफीस कामाकरिता १ मुलगी आणि १ मुलगा पाहिजे. शिक्षण कमीत कमी १२ वी पास किंवा पदवीधर पाहिजे. मो. नं. ८४८३९९९२२९
- Driver पाहिजे ८०८७५७२७४७
- नामांकित खाद्य तेल कंपनीत सेल्समन आवश्यकता आहे. स्वत:ची टूव्हीलर आवश्यक मोबाईल - ९४२२६९११४७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे शिरगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती सुनीता रामा सातमकर, श्री. अनिल रामा सातमकर, श्री. अमोल रामा सातमकर आणि सौ. रंजना संदीप मोरे सर्व रा. टेंभुर्ले, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शिरगाव ता. मुरुड | १३९/१ | ०-३६-००<br>पो.ख. ०-०७-००<br>एकूण ०-४३-०० | २.०७ |

सबब सदरहू भातशेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती व घर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :२०/११/२०२५

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभाग
### जाहीर आव्हान

पनवेल महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात वाढती लोकसंख्या, होणारे शहरीकरण, नवीन येणाऱ्या उंच इमारती व त्यामुळे वाढणारे धोके लक्षात घेता आपणास कळविण्यात येते कि,

''महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम २००६(सुधारित २०२३) मधील कलम ३ पोटकलम ३ अन्वये इमारतीमधील आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना सुस्थितीत व कार्यान्वीत असल्याचे लायसन्स प्राप्त अभिकरणाकडील नमुना ''ब'' मधील दाखला वर्षातून दोन वेळा जानेवारी व जुलै महिन्यात अग्निशमन विभागास सादर करण्याची जबाबदारी इमारतीचे मालक अथवा भोगवटादार यांची आहे.

तसे न केल्यास इमारती मध्ये आगी सारखी दुर्घटना घडून होणाऱ्या जीवित व वित्त हानीस सर्वस्वी जबाबदार इमारतीचे मालक अथवा भोगवटादार राहतील याची नोंद घ्यावी व अशा इमारतीवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम २००६ (सुधारित २०२३) कारवाई पनवेल महानगर पालिका अग्निशमन विभागा मार्फत करण्यात येईल.

**दिनांक :२०-११-२०२५**

**सही/**
**उपआयुक्त**
**(मुख्यालय)**

टीप :- महाराष्ट्र शासनाकडील लायसन्स प्राप्त अभिकरणाची यादी ''www.mahafireservice.gov.in'' या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. मनोहर प्रभाकर पिंपरकर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे मेचकरवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ५६/३ एकुण ०.७२.०० पो ख ०.२४.०० पैकी ०.४८.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २२/११/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे पाली तर्फे कोथलखलाटी, ता.कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुभाष गणपत देशमुख वगैरे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे पाली तर्फे कोथलखलाटी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीच वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १३ | ८ | ०-१८-५०<br>पैकी लिहून देणार यांचे क्षेत्र<br>०-१३-५० | १-१९ |
| १३ | ९ | ०-०५-३० | ०-३९ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २२/११/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) हर्षद पुंजलाल दवे, २) मीनाक्षी हर्षद दवे, ३) देवांग हर्षद दवे, ४) मौलिक हर्षद दवे यांचे सोबत सदरहू मिळकतीचे बाबतीत आमचे अशील सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमपान क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे.) |
|---|---|---|
| २५६९/१ | जिरायत ००.३१.३०<br>पो.ख.००.००.००<br>एकुण ००.३१.०० | ०१.०४/- |

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, तिचे बाबतीत कोणताही निर्णय घेणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणतीही व्यक्ती वा संस्था कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क दावा, अपील/आक्षेप, धारणाधिकार, देखभाल, मृत्युपत्र, लिस पेंडन्स, एफ एस आय वापर, अतिक्रमण या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे बाबतीत कोणत्याही व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण: अलिबाग
दिनांक : २१/११/२०२५

सही/-
**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. भीमराव आनंदराव पवार, २. श्रीमती. मंगल भीमराव पवार व ३. श्री. जयंतराव भीमराव पवार, यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली असून त्या आशयाचा साठेकरार देखील माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान स्वाक्षरीत झालेला आहे. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमत: पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**- संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| कावीर, ता.अलिबाग, जि.रायगड. | ३२ | ०-०७-०० | १.६२ |

अलिबाग,
दिनांक २२/११/२०२५.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी, कन्याशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड,
मो.९८२२५२८९३१,
ईमेल - adv.rdpatil@gmail.com.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. सदानंद कोंडु कुंभार व इतर ८ यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे नसरापूर, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १/१ एकुण ०.२६.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २२/११/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## ग्रुप ग्रामपंचायत आपटा

समाविष्ट महसुली गावे : आपटा, सारसई, कौरळ
मु. पो. आपटा, ता. पनवेल, जि. रायगड.
ई-मेल : grampanchyatapte@gmail.com

दिनांक : २०/११/२०२५

**निविदा जाहिरात देणेबाबत**

उपरोक्त विषयान्वये कळविणेत येते की, ग्रामपंचायत आपटा हद्दीत खालीलप्रमाणे कामांच्या जाहिरात देणेत याव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत आपटा हद्दीत नवीन कोळीवाडा अंतर्गत रस्ता तयार करणे. | १,४९,९६५/- |
| २) | ग्रामपंचायत आपटा हद्दीत गोपाळ सावंत ते तटकरे घरापर्यंत गटार बांधणे | १,२०,०००/- |

वरीलप्रमाणे कामांच्या जाहिरात देणेत याव्यात सदर मुदत २१/११/२०२५ ते २७/११/२०२५ ठेवावी. तरी येणारी फी ही ग्राम निधीतून देणेत येईल.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.जीतनेश यशवंत गायकर व श्री.मेघनाथ भगवान गायकर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे वडवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १३/१ एकुण ०.०७.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २२/११/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्रीमती मनिषा सुनिल देशमुख रा.कुंभारआळी, पेण, तालुका-पेण, जिल्हा रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक सौ.गीता राजगोपाल प्रभु रा.पेण, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांचेकडून रजिस्टर्ड साठेकराराने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिति पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा- आंबेघर, ग्रामपंचायत आंबेघर, मौजे आंबेघर येथील गट नं. १६२ एकुण क्षेत्र ०-६५-३० हे.आर.चौ.मी. आकार रु. ५-०० पैसे पैकी सौ.गीता राजगोपाल प्रभु यांचे हिश्श्याची ०-०२-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी जमिन विकत घेणार यांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ७ (सात) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-०२-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. २२/११/२०२५

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६.
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसुत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशांनुसार, आम्ही खालील परिशिष्टात सविस्तरपणे नमूद केलेल्या शेतजमिनीसंदर्भात श्री. जगदीश प्रभाकर लवेकर, या सदरहू शेतजमिनीच्या मालकांच्या नामाधिकारांची तपासणी करीत आहोत.

सदरहू शेतजमिनी मध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये कोणाही व्यक्तीचा हक्क, नामाधिकार, हिस्सा, हितसंबंध, अधिकार वा दावा-जसे की विक्री, हस्तांतर, अभिहस्तांतरण, गहाण, ताबा, धारणाधिकार, भाडेपट्टा, विश्वस्तव्यवस्था, भेट, हक्क, वारसा, देखभाल, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, वहिवाटीचा हक्क, कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हुकूम किंवा कोणत्याही प्रकारचा करारनामा वा अन्य कोणत्याही प्रकारे, असल्यास निम्नस्वाक्षरीकरांना त्यांच्या खालील नमूद पत्त्यावर दाव्यांच्या पृष्टर्थ्य दस्तऐवजी पुराव्यांसह सदरहू जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीमध्ये कळविणे आवश्यक आहे; अन्यथा सदरहू शेतजमिनीमध्ये वर नमूद केलेल्या व्यक्तिंव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तींचा कोणत्याही प्रकारचा हक्क, नामाधिकार, हितसंबंध अथवा दावा नाही किंवा त्यांचा त्याग केल्याचे/सोडून दिल्याचे समजण्यात येईल.

**शेतजमिनीचे परिशिष्ट**

**पहिली मिळकत**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका सुधागड, तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समिती पाली ह्यांचे हद्दीतील आणि मे. सब रजिस्ट्रार सो. सुधागड ह्यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे : आमणोरी, ता. सुधागड, जि. रायगड, तलाठी सजा: दहिगाव, ग्रुप ग्रामपंचायत: दहिगाव, ता. सुधागड, जि. रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्ड प्रमाणे खुलासेवार वर्णन केलेली शेतीची मिळकत खालीलप्रमाणे:-

| स.नं.गट भूमापन क्र. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४९ | ४ भात | ०.३१.००<br>०.००.२०<br>०.३१.२० | ५.०० |

**चर्तुः सिमा :-**
पुर्वेस :- सर्व्हे क्र. ३५/३ व ४८/२ ची मिळकत
पश्चिमेस :- सर्व्हे क्र. ४९/५ ची मिळकत.
दक्षिणेस :- सर्व्हे क्र. ४९/२ व ४८/१ ची मिळकत..
उत्तरेस :- सर्व्हे क्र. ३५/३ व ३५/२ ची मिळकत.

**दुसरी मिळकत**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका सुधागड, तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समिती पाली ह्यांचे हद्दीतील आणि मे सब रजिस्ट्रार सो.सुधागड ह्यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे: आमणोरी, ता.सुधागड, जि.रायगड, तलाठी सजा: दहिगाव, ग्रुप ग्रामपंचायत: दहिगाव, ता.सुधागड, जि.रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्ड प्रमाणे खुलासेवार वर्णन केलेली शेतीची मिळकत खालीलप्रमाणे:-

| स नं.गट भूमापन क्र. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३५ | ३<br>सुभात व रापड | ०-६७-८<br>०-०२-८<br>०-७०-६ | १२-०२ |

यापैकी श्री. जगदीश प्रभाकर लवेकर यांच्या मालकीचा अविभक्त हिस्सा.
चर्तु:सिमा :-
पुर्वेस :- आमणोरी बौद्ध पाडा.
पश्चिमेस :- सर्व्हे नं. ३८/२ भातशेती.
दक्षिणेस :- सर्व्हे नं. ३६
उत्तरेस :- सर्व्हे नं. ३५/५

दिनांक २२ नोव्हेंबर, २०२५ सही/-
**कदम आणि कंपनी**
वकील
३०५-३०६, ३रा माळा, युसूफ बिल्डींग,
महात्मा गांधी रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत सौ. हेमांगी भानुदास खडे व श्री. जय भानुदास खडे यांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री. जितेंद्र विट्ठल पेरणे व इतर १ | १२८/११ | ३.००.०० | ३०.०० |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक-श्री. जितेंद्र विठ्ठल पेरणे व इतर १ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे,

कर्जत
दिनांक: २२/११/२०२५

सही/-
**मिनाक्षी जगन्नाथ भासे**
ॲडव्होकेट.
पत्ता -शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१.
मो. नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक कलह त्रासदायक ठरेल. नोकरीत अडचणी निर्माण होतील. कुलदेवतेची उपासना करावी.
- **वृषभ** : ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल. कामाचा ताण कमी होईल. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल.
- **मिथुन** : छोट्या व्यावसायिकांना दिलासा मिळेल. प्रवास टाळावा. नुकसानीबाबत काळजी घ्यावी.
- **कर्क** : अपेक्षित वार्ता कानी येईल. आर्थिक व्यवहार लाभदायक ठरतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **सिंह** : कारकिर्दीत नव्या जबाबदाऱ्या येतील. पती-पत्नीत मतभेद संभवतात. नव्या योजना मार्गी लागतील.
- **कन्या** : उत्साहवर्धक घटना घडतील. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल. उत्तम धनप्राप्तीचे योग आहेत.
- **तूळ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. आर्थिक बाबतीत स्थैर्य लाभेल. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृश्चिक** : वरिष्ठांची नाराजी वेळीच दूर करा. प्रकृतीच्या तक्रारी उद्‌भवतील. कौटुंबिक समाधान प्राप्त होईल.
- **धनु** : व्यवसायात नवे करार होतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. यंत्र, वाहनांचा वापर जपून करावा.
- **मकर** : चिंतेचं वातावरण राहील. नोकरीत वरिष्ठांच्या नाराजीची शक्यता आहे. विचारपूर्वक पावलं टाकावी.
- **कुंभ** : वास्तवाचं भान ठेवायला हवं. इतरांना आश्वासनं देताना विचार करावा. मानसिक अस्वास्थ राहील.
- **मीन** : कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. अनावश्यक खर्च टाळायला हवा. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.

फॅशन पॅशन

## ब्रोकेडचे भन्नाट प्रकार

* फुलाफुलांचं नक्षीकाम केलेलं ब्रोकेडही उठून दिसतं. यात संपूर्ण कापडावर फुलाफुलांचं नक्षीकाम केलेलं असतं. ब्लाउज, साड्या, तसंच लहंग्याला हेवी लूक मिळावा यासाठी या प्रकारच्या ब्रोकेडची मागणी केली जाते.

* भूमितीय आकृत्या असलेले ब्रोकेडही खूप छान दिसतं. घराचे पडदे, कुशन कव्हर्सवर हे डिझाइन शोभून दिसतं. वेगळा लूक मिळवण्यासाठी तुम्ही अशा डिझाइनचे कपडे घेऊ शकता.

* पक्षी, प्राणी यांचं नक्षीकाम केलेलं ब्रोकेडही मिळतं. याला शिकारगाह ब्रोकेड असं म्हणतात. हा प्रकार खूप ट्रेंडी आणि स्टायलिश दिसतो.

* जरी ब्रोकेडमध्ये सोनेरी आणि चंदेरी धाग्यांचा वापर करून वर्क केलेलं असतं. या वर्कला किमखाब असंही म्हणतात. लग्न तसंच रिसेप्शनच्या वेळी घातल्या जाणाऱ्या कपड्यांवर हे वर्क खुलून दिसतं.

## २२ नोव्हेंबर

दिनविशेष

- **१९५९:** ज्येष्ठ नाटककार पार्श्वनाथ आळतेकर यांचे निधन.
- **२००५:** एंजेला मर्केल जर्मनीच्या प्रथम स्त्री चान्सेलर झाल्या.
- **२०१३:** आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला 'हेलेन' या वादळाचा मोठा फटका. वादळाचे सात बळी.
- **२०१४:** जामा मशिदीचे इमाम सय्यद अहमद बुखारी यांनी त्यांचा मुलगा शाबान याला नायब इमाम म्हणून नियुक्त केले.
- **२०१५:** भारताने आशिया करंडक ज्युनियर हॉकी स्पर्धेत अंतिम फेरी गाठली.

स्मार्ट ॲप्स

## स्मार्ट ॲप्स फॉर स्मार्ट स्टुडंट्स

मुलांना अभ्यासात मदत करणारी, विषय नीट समजावून सांगणारी बरीच ॲप्स उपलब्ध आहेत. त्यांचा वापर अगदी मोफत करता येतो. या ॲप्समुळे तुमचा अभ्यास झटपट होईल तसंच अभ्यास करताना मजाही येईल.

*Istudiez Pro-Legendary planner हे ॲप डाउनलोड करून तुम्ही दिवसाचं नियोजन करू शकता. घरच्या अभ्यासाचं प्लानिंग करू शकता. यासोबतच ऑनलाईन क्लास तसंच उरलेल्या असाईनमेंट्सची माहिती तुम्हाला इथे मिळू शकते. * My homework student planner मुळे विद्यार्थी अभ्यास आणि दिवसभराच्या कार्यक्रमांचं संपूर्ण नियोजन करू शकतात. क्लासवर्क तसंच होमवर्कची माहिती यात सेव्ह करता येईल. वर्गातल्या छोट्या छोट्या चाचण्या तसंच मुख्य परीक्षेसाठी तुम्ही रिमाइंडर सेट करू शकता. * फ्री ग्राफिंग कॅल्क्युलेटर हे ॲप डाउनलोड केल्यानंतर तुम्ही झटपट आकडेमोड करू शकता. नेहमीच्या कॅल्क्युलेटरपेक्षा हे ॲप बरंच वेगळं आहे. ॲपच्या मदतीने तुम्ही ग्राफिक्स तयार करू शकता. * ऑफिस लेन्स हे ॲप स्कॅनरप्रमाणे वापरता येतं. हे ॲप डाउनलोड केल्यावर तुम्ही नोट्स स्कॅन करून शेअर करू शकता.

### पंचांग

**शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
मार्गशीर्ष शु. २, चंद्रराशी : वृश्चिक,
नक्षत्र : ज्येष्ठा, योग : सुकर्मा,
सूर्योदय ६.५२ सूर्यास्त ५.५७

### फॉरवर्डस

**हवा क़े रुख़ बदलनें क़ा क़्या ख़ौफ़ साहब...**

**हमनें तों अपनों कों भीं वक़्त पर बदलतें देख़ा हैं...!**

आरोग्यमंत्र

## ज्येष्ठांनो, सूचना पाळा

प्रत्येकानं आरोग्याची काळजी घेणं गरजेचं असलं तरी ज्येष्ठांनी याप्रती अधिक सजग रहायला हवं. त्यांनी तज्ज्ञांच्या काही विशेष सूचनांचं पालन करायला हवं. आज याविषयी जाणून घेऊ.

* तहान लागली नसली किंवा गरज भासत नसली तरीही भरपूर पाणी प्या कारण आरोग्याच्या सर्वात मोठ्या समस्या शरीरातील पाण्याच्या कमतरतेमुळे होतात. म्हणून दररोज किमान तीन-चार लिटर पाणी पिणं गरजेचं आहे.



* शरीराकडून जास्तीत जास्त काम करवून घ्या. चालणं, पोहणं किंवा कोणत्याही प्रकारच्या खेळानं तुम्ही शरीराची ही गरज भागवू शकता.

* वाढत्या वयात आहार हलका असावा. म्हणूनच जास्त खाण्याची लालसा सोडून द्या. अर्थात अन्नापासून स्वत:ला वंचित करू नका, परंतु खाण्याचं प्रमाण कमी करा. आहारात प्रथिने, कार्बोहायड्रेटयुक्त पदार्थ जास्त वापरा.

* अगदी आवश्यक असल्याशिवाय वाहन वापरू नका. सामान घेण्यासाठी, कोणाला भेटायला किंवा काही कामासाठी पायी जाण्याचा प्रयत्न करा. लिफ्ट, एस्केलेटर वापरण्याऐवजी पायऱ्या चढा.

* सर्वात महत्त्वाचं म्हणजे राग सोडा, त्रागा कमी करा. काळजी करणं थांबवा. काही गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुमचं मानसिक आरोग्य उत्तम राहू शकेल.

### फॅशन पॅशन

* अगदी साधे वाटणारे कपडेही तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवून जातात. निळा कुर्ता आणि पांढरा चुडीदार परिधान करून त्यावर छानशी सँडल घाला. हा लूकही खूप छान दिसेल.

* हेरम पँटमुळे तुम्हाला हटके पण आरामदायी लूक मिळेल. हेरम पँटवर फंकी टी शर्ट घाला. त्यावर मस्त जॅकेट कॅरी करा. कॅज्युअल ऑकेजनसाठी हा लूक परफेक्ट आहे.

* बंदगळा आणि अचकनला तुम्ही ट्विस्ट देऊ शकता. या पेहरावासोबत योग्य त्या ॲक्सेसरीज कॅरी करा. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## सेवाभावातून कारकिर्द

बदलत्या आणि आधुनिक जमान्यात विविध क्षेत्रांचा विस्तार होत असताना त्याला सेवा क्षेत्रही अपवाद राहिलेलं नाही. याही क्षेत्रात रोजगाराच्या नवनव्या संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रात कारकिर्दीच्या संदर्भात काही बाबी अवश्य लक्षात घ्याव्या. मुख्यत्वे अमेरिका आणि ब्रिटनमधील या क्षेत्राची संकल्पना भारतात चांगलीच मूळ धरू लागली आहे. पॅरेंटस केअर आऊटसोर्सिंग ही



अशीच एक संधी. सायकॉलॉजी, फिजिओथेरपी, जेरॅटॉलॉजी, फिजिकल सायन्स, अलाइड हेल्थ सायन्स यामध्ये मास्टर्स डिग्री मिळवणारे या क्षेत्रात उत्तर करियर करू शकतात. घरातील आजारी, एकट्या वृध्द व्यक्तिंची काळजी घेण्याची जबाबदारीही पार पाडता येते. अर्थात यात वृध्दांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच त्यांची मानसिकता लक्षात घेऊन संवाद साधण्याचं कौशल्य असावं लागतं. तसं असेल तर 'एल्डरली केअर स्पेशालिस्ट' म्हणून काम करता येतं. सद्यस्थितीत दिल्ली, मुंबईबरोबरच पुणे, बंगळुरू, चेन्नई, हैद्राबाद, मेरठ, अहमदाबाद, नाशिक तसंच नागपूरमध्येही 'एल्डरली केअर सर्व्हिस' ची आवश्यकता भासत आहे. यासाठी खास अभ्यासक्रम पूर्ण करण्याची किंवा प्रशिक्षणाची आवश्यकता असतेच असं नाही. सामाजिक कार्याची आवड, सहनशीलता आणि दुसऱ्यांना समजून घेण्याची, त्यांच्याशी मनापासून मैत्री करण्याची आवड असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र खुलं आहे.

खेचाखेची

## नवीन शर्ट

**बायको** : ऐका ना, मी तुम्हाला नवीन शर्ट आणलाय...

**नवरा** : अरे वा! शर्ट तर मस्तच आहे. केवढ्याला आणला?

.
.
.

**बायको** : पाच हजाराच्या साडीवर फ्री होता. चांगला वाटला म्हणून मला साडी विकत घ्यावी लागली...

### वेगळं काही

रशियातल्या पाच वर्षांच्या राखीम कुरायवने १००, २०० नाही तर ४०१५ पुश अप्स काढले आहेत. २ तास २५ मिनिटांमध्ये त्याने ही कामगिरी केली आहे. रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतीन यांचे निकटवर्तीय असणारे तिथले एक तेल व्यावसायिक तसंच रशियन सेनेतले लेफ्टनंट रमजान कद्दरोव यांना या मुलाने न थांबता तुमच्यापेक्षा जास्त पुश अप्स करून दाखवण्याचं आव्हान दिलं होतं. या मुलाने हे आव्हान पेललं. इतकंच नाही तर नवा विश्वविक्रमही केला. यामुळे आनंदी झालेल्या कद्दरोवने त्याला २६ लाख रूपये किंमतीची पांढरी मर्सिडिज गाडी भेट म्हणून दिली. राखीमला लहानपणापासूनच व्यायामाची आवड आहे. कद्देरोव यांनी या मुलाचं तोंडभरून कौतुक केलं आहे.

ट्रेंडिंग

## जुन्या साड्यांचा नवा अंदाजह

लग्नसमारंभ म्हटला की भारीच्या, आकर्षक, नाविन्यपूर्ण साड्यांची खरेदी आलीच. त्यात मुख्यत्वे बनारसी तसंच सिल्कच्या साड्यांचा समावेश होतो. मात्र, हौसेनं घेतलेल्या अशा साड्या नवीन असताना वापरल्या तरी नंतर मात्र पडून राहतात. पडून राहणाऱ्या या साड्यांमध्ये जीव गुंतल्यामुळे देऊन टाकणंही शक्य होत नाही. अशा वेळी रिसायकलिंगद्वारे त्यांना ट्रेंडी लूक देण्याचा प्रयत्न करता येईल. कसा ते पाहू...



* बनारसी साडीचा काठ जाड असतो. तो नको असेल तर बॉर्डर कापून उरलेला भाग दुपट्टा म्हणून कॅरी करता येईल. हा दुपट्टा सिल्कच्या प्लेन ड्रेसवर खुलून दिसतो. हे दुपट्टे तुम्ही घरी बनवू शकता.

* भरजरी साड्यांचे गाऊन्स शिवून घेता येतील. लग्न, रिसेप्शनसाठी हा छान पर्याय आहे. रिच, एथनिक लूकसाठी बेस्ट!

* या साड्यांपासून ट्रेंडी ब्लाऊज शिवता येतील. ते लेहंग्यावर किंवा घेरदार स्कर्टस्‌वर शोभून दिसतील. प्लेन साडीवरही हे ब्लाऊज घालू शकता. या कॉन्ट्रास्ट ट्रेंडच्या जमान्यात हटके लूक मिळवून देईल.

* काही वेगळं ट्राय करायचं तर साड्यांपासून ट्राउझर्स किंवा पलाझो शिवता येतील. त्यावर क्लासिक व्हाईट शर्ट मस्त लूक देईल.

## सुडोकू ३१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५ | ६ | | | | | २ | ९ |
| | | | | | ४ | | १ | ३ |
| | | २ | | | ९ | | | |
| ८ | ७ | | ५ | | ६ | १ | | |
| | | | | ९ | | | | |
| | | ४ | ३ | | २ | | ९ | ८ |
| | | | ९ | | | ३ | | |
| ६ | ४ | | २ | | | | | |
| ९ | १ | | | | | २ | ७ | ५ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ६ | ५ | ४ | १ | ७ | ९ | ३ | ८ |
| ८ | ४ | १ | ९ | ५ | ३ | ७ | २ | ६ |
| ७ | ३ | ९ | २ | ६ | ८ | ५ | ४ | १ |
| ४ | २ | ८ | ७ | ९ | १ | ६ | ५ | ३ |
| १ | ७ | ३ | ५ | २ | ६ | ४ | ८ | ९ |
| ५ | ९ | ६ | ८ | ३ | ४ | २ | १ | ७ |
| ६ | ५ | ७ | १ | ८ | २ | ३ | ९ | ४ |
| ९ | १ | ४ | ३ | ७ | ५ | ८ | ६ | २ |
| ३ | ८ | २ | ६ | ४ | ९ | १ | ७ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ३१

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | ५ | | ६ | | ७ | | ८ |
| | ■ | | ■ | ९ | १० | | | ■ | | ■ | | ■ | |
| ११ | १२ | | | ■ | | ■ | १३ | | | | ■ | १४ | |
| ■ | १५ | | ■ | ■ | | ■ | | ■ | | ■ | १६ | ■ | |
| १७ | | ■ | १८ | १९ | | ■ | ■ | २० | ■ | २१ | | | |
| २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | २५ | | २६ | | | ■ | |
| २७ | | | | ■ | २८ | | | ■ | | ■ | ■ | २९ | |
| ३० | | ■ | ■ | ३१ | ■ | ■ | ३२ | ३३ | | ■ | ३४ | | ■ |
| ■ | ३५ | ३६ | | | ३७ | | | | | ३८ | | ■ | ३९ |
| ४० | | | ■ | ४१ | | ■ | ■ | | ■ | ४२ | | ■ | |
| ४३ | | ■ | ४४ | | | ■ | ४५ | ■ | ४६ | ■ | ■ | ४७ | |
| | ■ | ४८ | | | ■ | ४९ | | | | | ■ | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | | | ■ | | ■ | ५४ | ५५ | |
| ५६ | | | ■ | ■ | ५७ | | ■ | ५८ | | | | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) शरीराचे सर्व भागे
४) एखाद्या कामास उशीरा आलेले लोक (वा.प्र.)
९) स्तुती
११) अमान्य करणे
१३) वरपांगी
१४) भीमाचे शस्त्र
१५) चकणा
१७) बोलता न येणारा
१८) अर्धवर्तुळाकार
२१) चलनवलन
२२) चुलता
२३) अर्धी ओंजळ
२४) सरसकट
२७) धमकी
२८) केस काळे करण्याचा पदार्थ
२९) गीत
३०) स्वत:ला
३२) सूड
३४) हात
२५) परिस्थिती जशी असेल तसे वागणे (वा.प्र.)
४०) केर
४१) नातेवाईक
४२) उर्ध्व दिशा
४३) बासरी
४४) विकत घेतलेला नोकर
४७) द्रव पदार्थ
४८) एकूणएक, सर्व
४९) मावशीचा मुलगा
५०) संधी, वाव
५२) मान खाली घातलेला
५४) नूतन
५६) माफी असावी
५७) मगज
५८) रचना करणारा

**उभे शब्द :-**
१) स्त्री, बाई
२) फसवणूक
३) रानरेडा
४) नाराची उमटलेली खूण
५)अंत:पूर,जनानखाना
६) माणूसकी
७) व्यापारातील फायदा
८) सैन्याचे कूच होणे
१०) घराणे
१२) नारायणराव पेशवे यांनी जीवदानासाठी चुलत्याला केलेली विनंती
१६) बदल
१७) ठेकेदार
१८) कारस्थानी
१९) मत्स्य
२०) स्तुती करणारा
२१) साद, बोलाविणे
२४) मनाला टोचणारे दु:ख
२५) चहा-कॉफी पिण्याचे जोड साहित्य
२६) रोजचे पठन
२९) थंड
३१) सुरक्षित
३३) पोळी
३४) एक जंगली फूल
३६) थोडक्यात राजमान्य राजेश्री
३७) घोड्याला आवर घालणारी वादी
३८) परमेश्वर
३९) संगरवरी दगड
४०) कपाळ फुटणे
४४) बिनातक्रार, मुकाट्याने
४५) आवक ***
४६) सभेचे व्यासपीठ
४९) शिक्षक
५१) कार्य, काज
५३) नंतर
५४) एक नकारार्थी शब्द
५५) शूर, पराक्रमी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | यं | डा | ■ | भ | वि | ष्य | का | ळ | भू | त | का | ळ | ■ |
| य | दा | ■ | सा | ■ | ष | ■ | र | ■ | क | ल | म | ■ | प |
| ज | ■ | पा | ■ | खे | ■ | ठा | ण | क | ■ | वा | ■ | धा | गा |
| मा | ये | त | अ | ट | क | णे | ■ | सा | क्ष | र | ता | ■ | र |
| ■ | न | ■ | दा | र | ■ | क | स | ■ | प | ■ | रा | ■ | दा |
| सु | के | ■ | का | ■ | का | र | भा | री | ण | ■ | धी | व | र |
| ■ | न | ■ | र | वा | ना | ■ | मं | ■ | क | ल | श | ■ | ■ |
| सां | प्र | त | ■ | स | ■ | स | ड | क | ■ | ग | ■ | वा | स |
| ■ | का | ळ | पु | रु | ष | ■ | प | सा | य | दा | न | ■ | म |
| सा | रे | ■ | ष्प | ■ | ट | का | ■ | ब | ■ | ■ | व | री | स |
| स | ण | क | ■ | हे | ■ | य | ■ | सा | त | पु | ती | ■ | मा |
| रे | ■ | र | ख | वा | ल | दा | र | ■ | न | ■ | ■ | ध | न |
| बु | रा | ■ | ळ | ■ | ग | ■ | क्ष | मा | या | च | ना | ■ | ■ |
| वा | ज | त | गा | ज | त | ■ | क | ड | ■ | ल | व | क | र |

# कलासक्त

**रामायण मालिका सुरू झाली आणि ती घराघरात पोहोचलीदेखील. रामायण मालिकेची लोकप्रियता शिगेला पोहोचली होती. रामानंद सागर यांच्या रामावर असलेल्या निस्सीम श्रद्धाभावातून निर्मिती करण्यात आलेली ही मालिका अद्भुत अशीच होती. राम म्हणून जेवढे अरूण गोविल लोकप्रिय झाले, तेव्हा हनुमान म्हणून दारा सिंगदेखील तेवढेच लोकप्रिय झाले.**

## सिनेसृष्टीतील पोलादी अभिनेता दारा सिंग

श्रीराम शेटये





दारा सिंग यांचे खरे नाव- दिदारसिंग रंधावा (दारा सिंग) यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९२८ ला पंजाबमधील धर्मूचक गावात एका शेतकरी कुटुंबात झाला. बालपण ग्रामीण भारतातील सर्वसामान्य कुटुंबाप्रमाणेच होते. मात्र, नशीब साधे नव्हते. निसर्गाने दिलेले ६ फूट २ इंच उंच आणि १२७ किलोग्रॅम वजनाचे बलदंड शरीर व त्यात व्यायामाची आवड. वयाच्या १८ व्या वर्षी दारासिंग सिंगापूरला गेले. सिंगापूरला त्यांचे वडील आणि काका त्यावेळी काम करत होते. सिंगापूरमध्ये, ग्रेट वर्ल्ड स्टेडियममध्ये हरनामसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत असताना त्यांनी ड्रम उत्पादन गिरणीत काम करण्यास सुरुवात केली. अनेक वर्षांचे कठोर प्रशिक्षणाने ते स्थानिक कुस्ती स्पर्धांमध्ये चांगले कुस्तीपटू म्हणून ओळखले जावू लागले.

कुस्तीच्या मैदानात प्रसिद्ध समजल्या जाणाऱ्या दिग्गजांना पाणी पाजणारे दारासिंग १९४० च्या दशकात भारतीय कुस्तीप्रेमींच्या गळ्यातील ताईत बनले. स्वातंत्र्यपूर्व भारतातील वेगवेगळ्या संस्थानिकांच्या आमंत्रणावरून कुस्ती खेळणाऱ्या दारासिंग यांचे कसब पाहून त्यांना परदेशात जाऊन व्यावसायिक कुस्तीगीरांसोबत दोन हात करण्याची संधी मिळाली. दारासिंग यांनी १९४७ मध्ये सिंगापूर येथे 'चॅम्पियन ऑफ मलेशिया' किताबावर आपले नाव कोरले. पूर्वेतील राष्ट्रांत व्यावसायिक कुस्त्यांत सहभागी झालेले दारासिंग १९५२ मध्ये भारतात परतले. त्यानंतर १९५४ मध्ये ते भारतीय 'चॅम्पियन' झाले. 'कॉमनवेल्थ' राष्ट्रांत झालेल्या स्पर्धांत अपराजित राहिलेल्या दारासिंग यांनी त्यावेळचे 'ओरिएंटल चॅम्पियन' किंगकाँग, जॉर्ज गार्डिन्को (कॅनडा), जॉन डिसिल्व्हा (न्यूझीलंड) यांना हरवून १९५९ मध्ये 'कॉमनवेल्थ चॅम्पियन' होण्याचा मान पटकावला. दारासिंग यांनी जगभरातील त्यावेळच्या सर्व मातब्बर कुस्तीगीरांना हरवून 'वर्ल्ड चॅम्पियन' होण्याचा मान पटकावला होता. भारत सरकारने १९७८ मध्ये त्यांना 'रुस्तुम-ए-हिंद' या पुरस्काराने गौरविले होते. देश-विदेशांत ५०० पेक्षा जास्त कुस्त्या खेळून विजेतेपद पटकावणाऱ्या दारासिंग यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे होते. त्यांच्या सर्वात संस्मरणीय लढतींमध्ये १९५९ मध्ये राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धेसाठी जॉर्ज गोर्डिएन्कोवर मिळवलेला विजय आणि १९६८ मध्ये लू थेझविरुद्ध मिळवलेला विजय यांचा समावेश आहे, त्यामुळे त्यांना जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद मिळाले.

कुस्तीत नाव कमवित असतानाच संगदिल (१९५२) या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले, या चित्रपटाचे नायक-नायिका होते दिग्गज अभिनेता दिलीप कुमार आणि अभिनेत्री मधुबाला. बाबूभाई मिस्त्री यांच्या १९६२ मधील 'किंग काँग' या चित्रपटाने त्यांना स्टारडम मिळवून दिले. या चित्रपटाच्या यशानंतर, ते लवकरच देशभरातील घराघरात लोकप्रिय झाले. त्यांच्या सुरुवातीच्या चित्रपटांमध्ये रुस्तम-ए-बगदाद (१९६३), आवारा अब्दुल्ला (१९६३), आया तूफान (१९६४), जग्गा (१९६४), दारासिंहः आयर्नमॅन (१९६४), शेर दिल (१९६५), सात समुंदर पार (१९६५), महाभारत (१९६५), लुटेरा (१९६५), दुल्ला भट्टी (१९६६), नौजवान (१९६६), वीर बजरंग (१९६६), दादा (१९६६), चांद पर चढ़ाई (१९६६), थीफ ऑफ बगदाद (१९६९), तुफान (१९६९) चोरों का चोर (१९६९) या चित्रपटांचा समावेश होता.

मुमताज ही त्यांची पहिली नायिका होती. तिच्याबरोबर दारासिंग यांनी १६ चित्रपट केले. हे सर्व चित्रपट बॉक्सऑफिसवर यशस्वी ठरलेत. फौलाद (१९६३), वीर भीमसेन (१९६४), सॅमसन (१९६४), हरक्यूलिस (१९६४), आंधी और तूफान (१९६४) आणि टारझन कम्स टू दिल्ली (१९६५), सिकंदर-ए-आझम (१९६५), रुस्तम-ए-हिंद (१९६५), राका (१९६५), बॉक्सर (१९६५), खाकान (१९६५), जवान मर्द (१९६५), डाकू मंगल सिंग (१९६६), दो दुश्मन (१९६७) आणि जंग और अमन (१९६८) यासारख्या चित्रपटांमध्ये त्यांची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांनी पसंत केली.

१९७० च्या दशकात, मेरा नाम जोकर पासून त्यांनी चित्रपटांमध्ये चरित्र भूमिका करण्यास सुरुवात केली, त्यानंतर नानक दुखिया सब संसार (१९७०), आनंद (१९७१), ललकार (१९७२), कुंवारा बाप (१९७४), धरम करम (१९७५), धर्मात्मा (१९७५), मर्द (१९८५), कर्मा (१९८६), शहजादे (१९८९), एलान-ए-जंग (१९८९), प्रतिज्ञा (१९९०), प्रेम दीवाने (१९९२), दिल्लगी (१९९९), दुल्हन हम ले जाएंगे (२०००), कल हो ना हो (२००३), जब वी मेट (२००७) हे त्यांचे गाजलेले चित्रपट होते.

बजरंगबली (१९७६) या पौराणिक चित्रपटातील आणि नंतर रामानंद सागर यांच्या रामायण मालिकेतील हनुमानाची भूमिका ही दारासिंग यांच्या सर्वात लोकप्रिय झालेल्या भूमिकांपैकी एक होती. त्याशिवाय 'लव कुश', 'महाभारत', 'क्या होगा निम्मो का?', 'हद कर दी आपने' या मालिकांतही त्यांनी काम केले. अभिनयाव्यतिरिक्त दारा सिंग यांनी चित्रपटांचे दिग्दर्शन, निर्मिती आणि लेखनही केले. सवा लाख से एक लढाऊं, रब दियान राखण आणि नानक दुखिया सब संसार यासह सात पंजाबी चित्रपट, तसेच भक्ती में शक्ती आणि रुस्तम (१९८२) या हिंदी चित्रपटांचे त्यांनी दिग्दर्शन केले होते. त्यांच्या 'मै माँ पंजाब दी' या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना प्रत्यक्ष हनूमान समोर उभे ठाकलेत की काय अशी भावना निर्माण व्हावी ईतके दारा सिंग प्रभावी अभिनेते होते.

## महंत, योगी, सदगुरू, संत कै. विश्रामबाबा परब महाराज

धनंजय शेटये



अध्यात्माच्या आकाशातील तेजस्वी दीपभक्तीपरंपरेचे अमर मार्गदर्शक!

खांबडचुनवरेच्या पावन भूमीवर जेव्हा पहाटेचा पहिला सूर्यकिरण उतरतो, तेव्हा त्या उजेडात आजही प्रतिबिंब उमटतेयोगी, महंत, सदगुरू संत कै. विश्रामबाबा परब महाराज यांच्या दिव्य स्मृतीचे! दत्तभक्तीच्या अखंड साधनेत स्वतःला भक्तीरसाची आहुती करुन घेतलेल्या या दैवतस्वरूपी महंतांनी खांबडचुनवरेला कोकणातील 'गाणगापूर' बनविले.

भक्तीरस, परंपरा आणि अध्यात्म यांची सुवर्णज्योत पेटवणारे हे अव्याहत तेज आजही हजारो हृदयात झळकत आहे. अध्यात्माचे जपणारे दैवतस्वरूपी संतमहंत योगीपुरुष माणसांच्या गर्दीतून जेव्हा करुणा, शांतता आणि निष्ठेचा सुवास वाहतो, तेव्हा जाणवते ही साधी मानवरुपी देहयात्रा नव्हे, तर देवत्वाचे चालतेफिरते स्वरूप! त्यांची वाणी म्हणजे मंत्र, स्मित म्हणजे कृपाछाया, आणि पावले म्हणजे लोककल्याणाचा दिव्य नाद. भजन, नामस्मरण, जप-तप यांच्या अखंड प्रवाहात त्यांनी स्वतःला आत्मज्ञानाचे दीपस्तंभ बनविले. त्यांच्या दर्शनाने मनाला स्थैर्य लाभते, आशीर्वादाने संकटांचा अंधार वितळतो आणि त्यांच्या स्पर्शात परमकरुणेची उब जाणवते. ते केवळ उपदेश देत नसत, ते उपदेशाला जिवंत प्रतिमा देत.

त्यांच्यासाठी प्रत्येक भक्त म्हणजे कुटुंब, प्रत्येकाचे दुःख म्हणजे स्वतःची पीडा, आणि आनंद म्हणजे स्वतःचा विजय.

अशा या संतांच्या सान्निध्यात येणाऱ्याला ''सदगुरु सदैव माझ्याजवळच आहेत'' याची अधिराज्य करणारी अनुभूती मिळते.

चुनवरेखांबड निसर्गाच्या कुशीतील अध्यात्मनगरी मालवण तालुक्यातील हे छोटेसे गाव म्हणजे केवळ भौगोलिक स्थान नव्हे, तर देव, निसर्ग आणि भक्तीने विणलेले एक दिव्य काव्य! हिरवीगार वनराई, निर्मळ वारा आणि श्रीदेवी तिठाई व जैन रामेश्वर यांच्या दिव्यत्वाच्या आशीर्वादाचे तेज या वातावरणात पाऊल टाकताच मनाला जाणवते. जणू भूमीचा प्रत्येक कण ''श्रीदेव दत्त श्रीदेव दत्त'' हेच नाम जपत आहे.

महंत, योगी पुरुष कै. विश्रामबाबा दत्तनामात विलीन झालेला तेजस्वी अवतार, बाबा महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात दत्तगुरूंची कृपाछाया प्रकाशत असे. त्यांच्या ओठांतून झरणारा अखंड महामंत्र.

''श्रीदेव दत्त श्रीदेव दत्त''

हे ऐकताच रोमांच उभे राहात. त्यांच्या मुखमुद्रेत शांततेचा सागर, डोळ्यांत स्नेहाचा झरा आणि वचनांत अलौकिक सामर्थ्य असे. त्यांच्या उपस्थितीत भजननामाचा अखंड जागर फुलत असे आणि भक्त हरीनामात तल्लीन होत. ''जे का रंजले गंजले'' जगणारा संदेश संतपरंपरेची शिकवण ते केवळ सांगत नसत, तर ती प्रत्येक क्षणात जगत.

अनेकांना त्यांनी दत्तनामाच्या आधाराने उभारी दिली, मार्ग दाखवला, हात दिला आणि उभे केले. त्यांचा एक अमूल्य संदेश आजही तेजाने झळकतो ''देव मंदिरातच नाही देव सर्वांमध्ये आहे. प्रेम दिलं, तर दत्त सापडतो!''

सिंधुदुर्गातील सर्वात दिव्य दत्तजयंती त्यांची देणगी. सिंधुदुर्गात इतक्या भव्य, दिव्य, ऐतिहासिक स्वरूपात दत्तजयंती उभी करण्याचे अपार श्रेय कै. विश्रामबाबा महाराज यांनाच! आज हजारो भक्तांच्या जीवनात जो भक्तीरस ओथंबतो आहे, तो त्यांच्या प्रारंभ केलेल्या परंपरेतूनच. होमहवन, पूजन, वेदघोष, नामसत्संग, महाप्रसाद आणि रात्रभर चालणाऱ्या भजनी जागराचा तो अद्भुत अनुभव हे सर्व आजही त्यांच्या भक्तिभावाचे साक्षीदार आहेत. आध्यात्मिकतेचा आत्मियतेने स्नेहभावाने वारसा जपणारे श्री. भाऊ उर्फ बबन परब. बाबामहाराजांचा पवित्र वारसा आज त्यांचे सुपुत्र श्री. भाऊ उर्फ बबन परब प्रेम, निष्ठा आणि अखंड समर्पणाने पुढे नेत आहेत. ते केवळ वारसदार नाहीत, तर प्रेम, आपुलकी आणि भक्तीचा दिवा जपणारे, आपलेपणा, आत्मियता, जिव्हाळा-स्नेहभाव जपणारे आध्यात्मिकतेच्या घरचे दैवतच आहेत.

सह्याद्रीसारखी भक्कम साथ, रोखठोक स्वभाव, आणि मनात अपार दत्तभक्ती ही त्यांची ओळखच बनली आहे. दत्तजयंतीनिमित्त विशाल कुटुंबसोहळा पाहायला मिळतो जणू भक्तांचा महापूर.. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण काही दिवस आधीच येथे येतात. तयारी, सजावट, सेवा, जणू एक अखंड कुटुंबभाव! खांबडवाडीतील प्रत्येक घरात भक्तीची वेगळीच लय धुंद असते. अविस्मरणीय अनुभव, एकदा तरी या !

दत्तजयंती म्हणजे श्रद्धेचा महासागर, भक्तीचा अखंड प्रवाह, दिव्यतेचा अपूर्व महोत्सव! खांबडचुनवरे या पावन भूमीला एकदा तरी भेट द्या आणि या अनुभवाचे सुवर्णाक्षरांनी कोरलेले स्मरण आपल्या मनात कायमचे जतन करा! ●●

## विष्णुदास भावे पुरस्काराच्या मानकरी नीना कुलकर्णी

रंगबहार

शरद कोरडे



नाट्य क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल आणि योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा हा पुरस्कार अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर सांगलीतर्फे सांगली येथे पाच नोव्हेंबर या रंगभूमी दिनाचे औचित्य साधून दिला जातो. यावर्षीच्या पुरस्कारासाठी समितीचे अध्यक्ष शरद कराळे यांनी नीना कुलकर्णी यांच्या नावाची घोषणा केली. या पुरस्कारांत रोख २५ हजार रुपये, शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देण्यात येते. यापूर्वी हा पुरस्कार बालगंधर्व, अमोल पालेकर, दुर्गा खोटे, भालचंद्र पेंढारकर, सतीश आळेकर, विक्रम गोखले व सुहास जोशी अशा मान्यवरांना देण्यात आला आहे. आद्य नाटककार व थोर रंगकर्मी विष्णुदास भावे यांच्या नावाने हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार प्रथम १९५९ मध्ये बालगंधर्व यांना प्रथम देण्यात आला होता.

नीना कुलकर्णी यांनी मराठी व हिंदी नाट्यसृष्टीत तसेच चित्रपटसृष्टीत गेले चार दशके योगदान दिलेले आहे. नीना कुलकर्णी यांचा जन्म पुणे येथे १५ ऑगस्ट १९५५ मध्ये झाला. आई-वडील दोघेही व्यवसायाने डॉक्टर होते. पुढे ते मुंबई येथे स्थलांतरित झाले. नीना कुलकर्णी यांनी मुंबई येथील कॅसोना कॉन्व्हेंट हायस्कूल व एलफिस्टन कॉलेज येथे शिक्षण घेतले. फ्रेंच भाषेत त्यांनी पदवी संपादन केली व नंतर काही काळ त्यांनी मॉडेलिंगही केले. १९७० सालामध्ये प्रिंट मीडियावर त्यांनी पहिली जाहिरात केली. क्लियरसील गर्ल म्हणून त्यांनी ही जाहिरात केली. नीना कुलकर्णी यांनी १९७० मध्ये प्रथम हिंदी प्रायोगिक रंगभूमीवर काम केले. १९७२ मध्ये शं. ना. नवरे लिखित 'गुंतता हृदय' हे या नाटकात त्यांनी आशा काळे यांच्या कुमारवयीन मुलीचे काम केले. मराठीतील हे त्यांचे पहिले नाटक होते. हिंदीमध्ये सत्यदेव दुबे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आधे अधुरे, मायावी सरोवर व एज्युकेटिंग रिटा या नाटकातून कामे केली. येथेच त्यांची प्रथम दिलीप कुलकर्णी या अभिनेत्याशी ओळख झाली. दोघेही त्यावेळी हिंदी मराठी रंगभूमीवर कार्यरत होते.

नीना कुलकर्णी यांनी प्रथम ख्यातनाम निर्माते व्ही. शांताराम व शक्ती सामंता यांच्याकडून चित्रपटाच्या आलेल्या ऑफर नाकारल्या आणि मराठी रंगभूमीवर लक्ष केंद्रित केले. मराठी रंगभूमीवर नायिकेची प्रथम भूमिका त्यांनी विजया मेहता यांच्या दिग्दर्शनाखाली या नाटकांत त्यांनी 'शंभो' या नायिकेची भूमिका केली. हे नाटक अनिल बर्वे यांनी लिहिलेले होते. या नाटकांत अशोक सराफ नाना पाटेकर, सुहास पळशीकर व स्वतः विजया मेहता यांनी भूमिका केल्या होत्या. हे नाटक खूप गाजले, त्यामुळे नीना कुलकर्णी यांची एक नायिका म्हणून खूप प्रसिद्धी झाली.

त्यांच्या उल्लेखनीय भूमिकांत महासागर, सावित्री, आकस्मात, ध्यानीमनी, वटवट सावित्री, देहभान, प्रेमपत्र व सध्या चालू असलेले असेन मी नसेन मी नाटकांतील भूमिकांचा समावेश आहे. अजित दळवी यांच्या डॉक्टर तुम्हीसुद्धाचे हिंदी भाषांतर डॉक्टर आप भी? या हिंदी भाषांतरीत नाटकांत नीना कुलकर्णी यांनी नायिकेचे काम केले. महासागर या नाटकाचे त्यांनी दिग्दर्शन केले होते. दिलीप कुलकर्णी दिग्दर्शित नागमंडल व मातीच्या गाड्यांची कथा या नाटकांतून त्यांनी कामे केली. पुढे दिलीप कुलकर्णी यांच्याशी त्यांनी १९८० मध्ये लग्न केले. त्यांना दोन मुले आहेत. महात्मा वर्सेस गांधी वेडींग अल्बम व त्यानंतर माय नेम इज गौहर जान या हिंदी नाटकात त्यांनी कामे केली. गौहर जानमध्ये त्यांनी मलकाजान व गोहर जान अशा दुहेरी भूमिका केल्या आहेत.



सवत माझी लाडकी या स्मिता तळवळकर यांच्या चित्रपटात त्यांनी केलेल्या नायिकेच्या कामास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, तर महेश मांजरेकर यांच्या आई या चित्रपटांतील आईची भूमिका खूप गाजली. दोन्ही चित्रपट प्रशंसनीय व यशस्वी झाले. २००५ मध्ये त्यांनी शेवरी या चित्रपटाची निर्मिती केली, त्यास राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. या चित्रपटात त्यांनी घटस्फोटाच्या दरम्यान मुंबईत संघर्ष करणाऱ्या मध्यमवर्गीय मराठी मध्यवयीन पत्नी, आई व मुलीची मध्यवर्ती भूमिका साकारली होती. या भूमिकेसाठी त्यांना फिल्मफेअर अवॉर्ड मिळाले. फोटो फ्रेम या चित्रपटासाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचा फिल्मफेअर क्रिटिक्स पुरस्कार मिळाला. हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी दाग द फायर नायक, गुरु, पहेली, हंगामा, रण, भूतनाथ, फिर भी दिल है हिंदुस्तानी, मेरे यार की शादी, हसी तो फसी, घायल वन्स अगेन, यासारख्या यशस्वी चित्रपटांत कामे केली. मराठीमध्ये त्यांनी काही वेगळ्या घाटणीचे चित्रपट केले, त्यांत गजेंद्र अहिरे यांचा कुलकर्णी चौकांतला देशपांडे, सचिन कुंडलकर यांचा पाँडिचेरी व मोहित टाकळकर यांचा स्पायसी या चित्रपटांचा समावेश आहे. नीना कुलकर्णी म्हणतात की, माझे नाटक व अभिनय यावर मोठे प्रेम आहे. त्यांच्या प्रत्येक भागाचा मी जास्तीत जास्त फायदा घेतला. मी या क्षेत्रात जबरदस्तीने काही केले नाही. मला जे आवडते तेच मी स्वीकारले आणि खंबीर राहून न आवडणाऱ्या गोष्टी नाकारल्या. सत्यदेव दुबे हे मोठे दिग्दर्शक, अभिनेते व नाटककार आहेत. ते आमच्या संपूर्ण पिढीतील कलाकारांना मार्गदर्शन करीत असत. कलाकारांना ते आपल्या स्वतःची अभिनयक्षमता शोधण्यास भाग पाडीत. रंगभूमीचा चालता बोलता विश्वकोश आम्हास त्यांच्या रूपाने मिळाला. मी अभिनयाचे कोणतेही प्रशिक्षण व औपचारिक शिक्षण घेतलेले नाही. मोहन राकेश यांचे आधे-अधुरे, शेकर शेष यांचे मायावी सरोवर व विली रसेल यांचे एज्युकेटिंग रिटा या नाटकांतून आम्हाला प्रशिक्षण मिळाले. पुढे विजया मेहता यांच्या दिग्दर्शनातून आम्हाला खरे प्रशिक्षण मिळाले. मी त्यांची ऋणी आहे.

नीना कुलकर्णी यांनी अनेक मराठी व हिंदी दूरदर्शन मालिकांतून कामे केली. त्यात कयामत, कमल, जीना इसी का नाम है, बा बहूऔर बेबी, मेरी माँ, ये है मोहब्बते, अशा हिंदी मालिकांचा समावेश असून, देवयानी, अधुरी एक कहानी, स्वराज्य जननी जिजामाता, राजा शिवछत्रपती, सारथी, स्वामिनी, लज्जा, उंच माझा झोका आदी मराठी मालिकांचा समावेश आहे.

नीना कुलकर्णी यांना सवत माझी लाडकी, उत्तरायण, शेवरी, बायोस्कोप, मोगरा फुलला, फोटो फ्रेम आदी मराठी चित्रपटांसाठी अभिनयाचे पुरस्कार मिळाले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने यावर्षी त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविले आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी 'द बेस्ट एक्झोस्टिक मेरीगोल्ड हॉटेल' या इंग्रजी चित्रपटात काम केले, तर फ्रेंच भाषेतील राणी व २०१७ मध्ये पॅरिसमध्ये प्रीमियर झालेल्या 'नोसेस' या चित्रपटात त्यांनी काम केले होते. दैनिक लोकसत्तामध्ये त्यांनी 'अंतरंग' या पुरवणीत तीन वर्षे लिखाण केले. पुढे या सदराचे पुस्तकही प्रकाशित झाले. नीना कुलकर्णी यांच्या चार दशकांच्या कारकीर्दीची दखल घेऊन सांगलीमधील महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीतर्फे त्यांना सन्मानाचा विष्णुदास भावे पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल सर्वत्र नीना कुलकर्णी यांचे अभिनंदन होत आहे. ●●

# अनोखं जिम कॉर्बेट



जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान म्हणजे प्राणीप्रेमी, निसर्गप्रेमींसाठी पर्वणीच. जेम्स एडवर्ड उर्फ जिम कॉर्बेट यांच्या नावाने हे राष्ट्रीय उद्यान ओळखलं जातं. जिम कॉर्बेट ब्रिटिश सैन्यात कर्नल होते. भारतावर इंग्रजांचं राज्य असताना ते भारतात होते. त्यावेळी जिम कॉर्बेट माणसांना खाणारे वाघ, बिबट्या अशा अत्यंत हिंस्त्र प्राण्यांची शिकार करत असत. पण काही वर्षांनंतर त्यांनी पर्यावरणरक्षणाचा वसा घेतला. पर्यावरणावर बरंच संशोधन केलं, काही पुस्तकं लिहिली. ‘मॅन इटर्स ऑफ कुमाऊं’ आणि ‘जंगल लोर’ अशी काही पुस्तकं त्यांनी लिहिली. त्या काळात त्यांच्या पुस्तकांना फारशी प्रसिद्धी मिळाली नव्हती. पण नंतर या पुस्तकांचं खूप कौतुक झालं. या पुस्तकांचा खपही बराच वाढला.

बंगालच्या ढाण्या वाघाच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या व्याघ्र प्रकल्पाच्या उभारणीत जिम कॉर्बेट यांचा महत्त्वाचा वाटा होता. सुरूवातीला या राष्ट्रीय उद्यानाचं नाव हेली राष्ट्रीय उद्यान होतं. १९ एप्रिल १९५५ या दिवशी जिम कॉर्बेट यांचा मृत्यू झाला आणि १९५७ मध्ये या अभयारण्याला त्यांचं नाव देण्यात आलं. जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान ५२०.८ चौरस किलोमीटर परिसरात पसरलं आहे. या उद्यानात डोंगराळ भाग आहे. नद्या आहेत. सपाट भूमी आहे. गवताळ जमीन आणि भला मोठा तलावही आहे. या अभयारण्यात प्राण्यांसोबतच ५८० प्रजातींचे पक्षीही बघायला मिळतात. इथे भरपूर झाडं आहेत. जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानात ११० प्रजातींची झाडं बघायला मिळतात. ५० प्रजातींचे सस्तन प्राणी आणि २५ प्रजातींचे सरपटणारे प्राणीही इथे आहेत. जिम कॉर्बेट हे भारतातलं सर्वात जुनं राष्ट्रीय उद्यान आहे. १९३६ मध्ये या राष्ट्रीय उद्यानाचं प्रवेशद्वार उघडण्यात आलं. रॉयल बंगाल टायगर हा भारताचा राष्ट्रीय प्राणी. त्यांचं संवर्धन आणि संरक्षण हा या राष्ट्रीय उद्यानाचा महत्त्वाचा उद्देश आहे आणि हा उद्देश साध्य करण्यात जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान यशस्वी ठरलं आहे.

**भ्रमंती**

जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानाच्या ७३ टक्के भागात घनदाट जंगल आहे. या राष्ट्रीय उद्यानात रिव्हर राफ्टिंगचा आनंद लुटता येतो. इथलं एलिफंट सफारीही खूप प्रसिद्ध आहे. हत्तीवर बसून जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानात फेरफटका मारणं हा अनोखा अनुभव ठरतो. जवळपास नऊ ते दहा फूट उंचीवरून आपण जिम कॉर्बेटचं सौंदर्य न्याहाळू शकतो. इथे जीप सफारीही आहे. पावसाळ्यात जिम कॉर्बेटमधल्या जीप सफारीचा आनंद लुटता येईल.

जीपमध्ये बसून प्राण्यांची छायाचित्रंही घेता येतात. या अभयारण्यात एक वस्तू संग्रहालयही आहे. जिम कॉर्बेटच्या कार्याबद्दल जाणून घ्यायचं असेल तर या वस्तूसंग्रहालयाला भेट द्यायला हवी. या वस्तू संग्रहालयात वाघांबद्दलही बरीच माहिती मिळते. म्हणूनच उत्तराखंडमधलं हे राष्ट्रीय उद्यान पर्यटक आणि प्राणीप्रेमींना नेहमीच भुलवतं.

# दमदार नगारा

नगारा हे एक पारंपरिक भारतीय तालवाद्य आहे. हे मोठ्या आकाराचे ड्रमसारखे वाद्य असते. नगाऱ्याचे शरीर तांब्या किंवा पितळेसारख्या धातूपासून बनवलेले असते. क्वचित प्रसंगी ते लाकडी किंवा मातीचे असू शकते. त्यावर प्राण्यांच्या कातड्याचे आवरण घट्ट बांधलेले असते. हे कातडे मोठ्या लोखंडी कड्यांनी किंवा दोऱ्यांनी बांधलेले असते ज्यामुळे आवाज घुमतो. जोरदार होतो.



नगारा साधारणपणे जोडीने वाजवला जातो. एक मोठा आणि एक थोडा लहान. दोन्ही नगाऱ्यांना मोठ्या लाकडी गजांनी किंवा वाकड्या काठ्यांनी ठोकून आवाज काढला जातो. त्याचा आवाज इतका दमदार असतो की तो लांबवर ऐकू येतो. पूर्वीच्या काळात राजा किंवा सरदार येत असल्याची घोषणा करण्यासाठी नगारा वाजवला जात असे. तसेच युद्ध सुरू होण्यापूर्वी सैनिकांना जोश देण्यासाठीही त्याचा वापर होत असे. म्हणून नगाऱ्याला शौर्य आणि उत्साहाचे प्रतीक मानले जाते.

**वाद्यांची ओळख**

आजही महाराष्ट्रात यात्रा, दहीहंडी, गुढीपाडवा, गणपती मिरवणूक अशा अनेक ठिकाणी नगाऱ्यांचा गजर ऐकायला मिळतो. ढोल-ताशांच्या बरोबर नगारा आणखी उर्जा निर्माण करतो. पंजाबमध्ये याला नगाडा किंवा नगाडे म्हणतात. मंदिरात खास प्रसंगी देवाला जागवण्यासाठीही नगारा वाजवला जातो. नगाऱ्याचा आवाज केवळ कानाला नाही तर थेट मनाला भिडतो. तो जमावाला एकत्र आणतो. आणि प्रत्येकाला उत्साहाने भारून टाकतो. त्यामुळे हे पारंपरिक वाद्य आजही आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

# पँडोराची पेटी

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. तेव्हा जगात दुःख नव्हते. आजार नव्हते. भांडणे नव्हती. सारे जग सुखी होते.पण एकदा एका माणसाने देवांकडून आग पळवून आणली. देवांचा राजा झूआस खूप संतापला. त्याने मानवांना शिक्षा करायची ठरवले.



झूआसने मातीपासून पँडोरा नावाची एक सुंदर स्त्री तयार केली. पँडोरा म्हणजे देवांची देणगी. देवांनी तिला सगळे गुण तर दिलेच पण त्याबरोबर त्यांनी तिला थोडीशी उत्सुकता आणि अधीरपणाही दिला. पँडोरा माणसांबरोबर राहू लागली.

**ग्रीक लोककथा**

एक दिवस झूआस तिला भेटायला आला. त्याने तिला एक सोन्याची पेटी दिली. यात खूप महत्वाच्या वस्तू आहेत. मी परत येईपर्यंत ती सांभाळ. मात्र कधीही उघडू नकोस. पँडोराने ती बाजूला ठेवून दिली. पण तिचे लक्ष सारखे त्या पेटीकडे जाई. काय असेल याच्यात? तिच्या मनातली उत्सुकता वाढत राही.

अखेर एक दिवस तिने ती पेटी हातात घेतली. हळूच अगदी थोडे झाकण उघडून बघू. झूआसला कळणार पण नाही. तिने हळूच झाकण उचलले.

पुढच्याच क्षणी आतून खूप जोरात धक्का बसला आणि भयानक आवाज करत अनेक काळ्या सावल्या बाहेर उडाल्या. आजार, दुःख, भांडण, मत्सर, राग, भूक, लढाया यांच्या त्या सावल्या होत्या. पँडोरा घाबरली. तिने झाकण लावले. पण काय उपयोग? तोवर ते सारे जगभर पसरले होते. ती रडायला लागली. इतक्यात डब्यातून एक लहानसा प्रकाश बाहेर आला. ती होती आशा. आशेने पँडोराला धीर दिला. आशा म्हणाली, घाबरू नकोस. मी जगात राहीन आणि लोकांना दुःखातही पुढे जगायला मदत करीन. तेव्हापासून उद्याचा दिवस तरी छान असेल या आशेवर लोक आनंदाने जगू लागले.




# मनोहारी सिमला

सिमला ही हिमाचल प्रदेशची राजधानी. सिमला खूप सुंदर आहे. इथे पर्यटकांची वर्दळ असते. श्यामला देवीच्या नावावरून या शहराला सिमला हे नाव पडलं. हे शहर सात टेकड्यांवर वसलं आहे. म्हणूनच त्याला टेकड्यांची राणी असंही म्हटलं जातं. सिमल्यात उत्तर भारतातलं पहिलं पोस्ट ऑफिस सुरू झालं. इथल्या कॉनी कॉटेज नावाच्या छोट्याशा इमारतीत १८८२ मध्ये पोस्टाच्या कामाला सुरूवात झाली.

आपण सिमला मिरची खातो. ब्रिटिशांनी सिमल्यात पहिल्यांदा या मिरचीची लागवड केली. म्हणून या मिरचीला सिमला मिरची असं म्हणतात. सिमल्यामध्ये बर्फ पडतो. इथे तुम्ही आईस स्केटिंगचा आनंद लुटू शकता.



**सफर शहरांची**

सिमल्यामध्ये १८८८ मध्ये टाउन हॉल बांधण्यात आला. दक्षिण-पूर्व आशियातल्या सर्वात मोठ्या माउंटन बायकिंग शर्यतीचं आयोजन सिमल्यात केलं जातं. या शर्यतीत बरेच स्पर्धक सहभागी होतात.

सिमल्यात बघण्यासारखं बरंच काही आहे. कालका-सिमला रेल्वेला युनेस्कोने जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे. सिमला हे बऱ्याच प्रसिद्ध लोकांचं जन्मस्थानही आहे. इथे आल्यानंतर मॉल रोड, जाखू मंदिर, सिमला ख्राईस्ट चर्च ही ठिकाणं बघायला हवीत. असं हे सिमला अनेकांचं आवडतं पर्यटन स्थळ बनून गेलं आहे.

# असं मिळवा यश



दहावी-बारावीच्या परीक्षांना आपल्या आयुष्यात खूप महत्त्व आहे. या परीक्षेतल्या गुणांवरून आपण करिअरचा मार्ग ठरवतो. दहावीच्या निकालानंतर आपण विज्ञान, वाणिज्य किंवा कला यापैकी एका शाखेची निवड करतो. परीक्षा झाल्यावर आपला कल नेमका कोणत्या क्षेत्रात आहे याबाबत चर्चा केली जाते. मग आवडीनुसार विज्ञान, वाणिज्य किंवा कला शाखेची निवड केली जाते. पण त्यानंतरही अनेकांना कोणत्या क्षेत्रात करिअर करावं हे समजत नाही. बरीच मुलं गोंधळलेली असतात. म्हणूनच बारावीनंतर कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं याविषयी...

- तुम्ही करीअरचा मार्ग निवडला असेल तर काही हरकत नाही. पण अजूनही काही ठरलं नसेल तर घरच्यांशी चर्चा करून आपला मार्ग निवडा. त्यानंतर त्या क्षेत्राशी संबंधित एखाद्या विषयात प्राविण्य मिळवा. आजच्या काळात पदवीसोबतच इतर कौशल्य असणं गरजेचं आहे.

**कोण होणार?**

- विषयाची निवड केल्यानंतर एक उद्दिष्ट ठरवा. वयाच्या २४ किंवा २५ वर्षांपर्यंत नोकरी मिळेल या दृष्टीने प्रयत्न सुरू करा. स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा असेल तर त्या दृष्टीने प्रयत्न करा.
- आयुष्यात काय करायचं आहे याचा निर्णय तुमचा तुम्हीच घ्यायचा आहे हे लक्षात घ्या. मित्रमैत्रिणी काय करतात, त्यांनी कोणती शाखा निवडली आहे यावरून स्वत:चे निर्णय घेऊ नका. तुमचा कल कशात आहे हे ओळखा.
- व्यावसायिकतेचे धडे तुम्ही घ्यायला हवेत. दहावीपर्यंत तुम्ही शाळेत होतात. पण आता तुम्ही आयुष्यात यशस्वी होणार आहात. नोकरी किंवा व्यवसाय करताना तुम्हाला यशस्वी व्हायचं असेल तर या गोष्टी महत्त्वाच्या ठरतील.

# सांस्कृतिक नदी- सिंधु

सिंधू नदी ही भारतातील आणि जगातील सर्वांत जुन्या संस्कृतीला जन्म देणारी नदी मानली जाते. तिचा उगम तिबेटमधील मानसरोवर जवळ होतो. तिथून ती जम्मू-काश्मीर, पाकिस्तान आणि शेवटी अरबी समुद्राला मिळते. तिची लांबी सुमारे ३१८० किलोमीटर आहे. सिंधू नदीला इंग्रजीत इंडस म्हणतात. भारताची इंडिया आणि हिंदुस्थानही नावे सिंधू नदीवरून पडल्याचे मानले जाते.

सिंधू नदीच्या काठावरच जुन्या काळात सिंधू संस्कृती फुलली. हडप्पा आणि मोहेंजोदडो ही दोन प्रसिद्ध प्राचीन शहरे या नदीजवळ सापडली आहेत. या संस्कृतीतील लोक शेती, लोखंडकाम, मातीची भांडी बनवणे आणि व्यापार यात तरबेज होते. त्यामुळे सिंधू नदीला जगातील प्राचीन संस्कृतीची जननी मानले जाते. ही नदी भारतात लडाख आणि जम्मू-काश्मीरमधून वाहते. तिथे तिचे पाणी स्वच्छ आणि निळसर दिसते. भारतीय सैन्याचे काही तळही या नदीच्या जवळ असल्याने तिचे महत्व अधिक आहे. सिंधू नदी पाकिस्तानसाठीदेखील अत्यंत महत्त्वाची आहे. त्या देशातील अनेक धरणे आणि कालवे या नदीवर आहेत. या पाण्याने गहू, कापूस आणि तांदूळ यांची शेती केली जाते. भारतातही जम्मू-काश्मीरमधील अनेक लहान गावांना सिंधू नदीचे पाणी उपयोगी पडते. सिंधू नदीला धार्मिक महत्त्वही आहे. हिंदू धर्मात या नदीला पवित्र मानले जाते. अनेक लोक तिची पूजा करतात. तिच्या पाण्याला पवित्र मानले जाते. अशा या सिंधू नदीने हजारो वर्षे लोकांचे जीवन समृद्ध केले आहे. सिंधू नदीने लोकांना अन्न, पाणी, संस्कृती आणि ओळख दिली आहे.



**ओळख नद्यांची**

**ठिपके जुळवा**





# आगळेवेगळे छंद

मुलांनो, परीक्षा संपल्यानंतर तुम्हाला भरपूर वेळ मिळतो. तुम्ही या मोकळ्या वेळेचा सदुपयोग करू शकता, नव्या गोष्टी शिकू शकता. मित्रमैत्रिणींनो, आपल्याला एखादा छंद असायला हवा. छंदांमुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. सुटीमध्ये फक्त मोबाईलवर खेळत बसण्यापेक्षा वेगळं काही तरी करा. एखादा छंद जोपासा. तुमच्यातल्या कलागुणांना वाव द्या. सुट्टी सुरू झाल्यावर नेमकं काय करता येईल? जाणून घेऊ.



- मुलांनो, तुम्ही स्वयंपाक शिकू शकता. आज प्रत्येकालाच थोडाफार स्वयंपाक यायला हवा. विविध पदार्थ बनवण्याची आवड असेल तर तुम्ही नवे पदार्थ बनवून बघू शकता. सोपे पदार्थ नक्की बनवून बघा. तुमच्या मित्रमैत्रिणींनाही सोबत घ्या. तुम्ही बनवलेला एखादा पदार्थ आईबाबांना खायला घाला.
- तुम्ही नाचाच्या क्लासला जाऊ शकता. नाचणं हा खूप चांगला व्यायाम आहे. नाचाच्या क्लासमध्ये तुम्हाला नवे मित्रमैत्रिणी भेटतील. खूप गप्पा मारता येतील आणि सोबतच नृत्यकलाही शिकता येईल.
- तुम्हाला चित्र काढायला आवडतं? मग चित्रकलेच्या क्लासला जा. चित्रकलेमुळे तुमच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. आपले विचार, भावना कागदावर उतरवण्याची क्षमता विकसित होते.
- छोट्यांनो, सुट्टीत तुम्ही वाचन करू शकता. वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तकं वाचा. पुस्तक प्रदर्शनाला भेट द्या. पुस्तकं वाचल्यामुळे तुम्हाला भरपूर ज्ञान मिळतं. शिवाय वेळही छान जातो.
- धाडसी खेळांची आवड असेल तर तुम्ही हायकिंग करू शकता. हायकिंगमुळे तंदुरूस्ती वाढते. तसंच शरीराची क्षमताही सुधारते. तुम्ही नवी आव्हानं स्वीकारायला सज्ज होता.
- छोट्यांनो, सुट्टीत लेखनही करता येईल. तुम्ही आपल्या विचारांना शब्दरुप देऊ शकता. तुमच्या आवडीच्या विषयावर लिहा. तुमचं लिखाण वेबसाईटवर प्रकाशितही होऊ शकतं. त्यामुळे लिहिण्याचा प्रयत्न करून बघा.

**धमाल**

**दोस्त हे मस्त**

## उंचपुरा जिराफ



जिराफ या पृथ्वीवरचा सर्वात उंच प्राणी आहे. जिराफाचे पाय माणसांच्या उंचीपेक्षाही लांब असतात. त्याच्या पायाची लांबी सहा फुटांपर्यंत असू शकते. जिराफाच्या अंगावर चट्टे असतात. गंमत म्हणजे प्रत्येक जिराफाच्या अंगावरचे चट्टे वेगळे असतात. जिराफ फार झोपत नाही. त्याला पाच मिनिटांची झोपही पुरते. जिराफ अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ झोपत नाही. तो उभ्या उभ्या झोपतो. पिलांना जन्म देतानाही जिराफ उभाच असतो. आयुष्यातला बराच काळ जिराफ उभाच असतो.

**खादाडी**

## मस्त पनीर मॅक्रोनी

मुलामुलींनो, तुम्ही मस्तपैकी पनीर मॅक्रोनी बनवू शकता. यासाठी ५० ग्रॅम मॅक्रोनी घ्या. दोन चमचे किसलेलं पनीर, एक कप दूध, सिमला मिरची, मीठ, मिरपूड आणि पाणी हे साहित्य घ्या. सर्वात आधी मॅक्रोनी उकडून घ्या. त्यानंतर कढई गॅसवर ठेवा. त्यात दूध घाला. उकळल्यावर सिमला मिरची, मीठ, मिरपूड, पाणी आणि पनीर घाला. दोन मिनिटं शिजू द्या. दूध आटल्यावर त्यात मॅक्रोनी घालून हलवून घ्या. तुमचं पनीर मॅक्रोनी तयार आहे.



**स्टडी टिप्स**

## गोंधळ दूर करा



मुलांनो, कोणताही विषय नीट समजून घेतल्याशिवाय तुम्हाला अभ्यास करता येणार नाही. शाळेत शिकवलेला विषय समजला नाही तर घाबरून जाऊ नका. शिक्षकांना विचारा. घरी आल्यावर आई-बाबांकडूनही विषय समजून घेता येईल. विषय नीट समजून घेतला तर तुमचा गोंधळ होणार नाही. शाळेतले शिक्षक विषय नीट समजावून सांगतील. तुम्ही शिकवणीला जात असाल तर तिथल्या शिक्षकांची मदत घेऊ शकता.

**योगा टाईम**

## वाढवा रोगप्रतिकारक शक्ती



छोट्यांनो, विविध आजारांपासून बचाव करण्यासाठी आपलं शरीर सक्षम असायला हवं. म्हणजेच आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढायला हवी. यासाठी तुम्ही नियमित योगासनं करू शकता. काही योगासनांमुळे प्रतिकारशक्ती वाढायला मदत होते आणि सर्दी, खोकला, ताप, फ्लूसारखे आजार होत नाहीत. ताडासन हे सुद्धा असंच एक आसन आहे. ताडासन केल्यामुळे संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो. त्यामुळे नियमितपणे ताडासन करा.

# गुवाहाटी कसोटीची धुरा 'पंत'कडे

## || भारत-आफ्रिका यांच्यात दूसरा सामना || मालिका बरोबरीत सोडवण्याचे आव्हान





| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताचा कर्णधार शुभमन गिल मानेच्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीला मुकणार आहे. स्वत: भारताचे फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत याविषयी माहिती दिली. त्यामुळे गिलच्या अनुपस्थितीत डावखुरा यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंत भारताचे नेतृत्व करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर झालेल्या पहिल्या कसोटीत टेम्बा बव्हुमाच्या नेतृत्वात खेळणाऱ्या आफ्रिकेने भारतावर ३० धावांनी सरशी साधली. याबरोबरच आफ्रिकेने दोन लढतींच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. शनिवार (दि.२२) नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथे दुसरी कसोटी रंगणार आहे. पहिल्या कसोटीत फलंदाजी करताना मान लचकल्याने गिलला दुखापत झाली. पहिल्या डावात अवघ्या ४ धावा केल्यावर गिल रिटायर्ड हर्ट होऊन माघारी परतला. तो दुसऱ्या डावातही फलंदाजीस आला नाही. गिल सध्या गुवाहाटीला दाखल झाला असला, तरी बीसीसीआयच्या वैद्यकीय चमूने त्याला जोखीम न पत्करण्याचे आदेश दिले आहेत, असे समजते.

गिलच्या प्रकृतीत नक्कीच सुधारणा होत आहे. मात्र शुक्रवारी त्याची अंतिम चाचणी घेण्यात येईल. संघाचे फिजिओ व वैद्यकीय फळी गिलच्या तंदुरुस्तीविषयी अंतिम निर्णय घेईल.

गिलच्या अनुपस्थितीत एका युवा खेळाडूला चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची संधी मिळेल. सुदर्शन किंवा जुरेलपैकी एकाला खेळवण्यासह नितीश रेड्डीलाही संघात स्थान देण्याचा पर्याय आहे. गिल नसल्यास पंत कर्णधारपद बजावण्यासाठी सज्ज आहे, असेही कोटक यांनी नमूद केले. त्यामुळे २८ वर्षीय पंत भारताचा ३८ वा कसोटी कर्णधार बनू शकतो.

फिरकीला पूर्णपणे पोषक खेळपट्टी बनवण्याचा डाव भारताच्या अंगलट आला. कारण दक्षिण आफ्रिकेने १२४ धावांचा यशस्वी बचाव करताना भारतावर ३० धावांनी रोमहर्षक विजय मिळवला. २०१० म्हणजे १५ वर्षांनी प्रथमच आफ्रिकेने भारताविरुद्ध भारतात एखादी कसोटी जिंकली, हे विशेष. आफ्रिकेचा संघ हा जागतिक अजिंक्यपद विजेता असल्याने त्यांच्याविरुद्ध भारताचा कस लागेल, याचा अंदाज होता.

या कसोटी मालिकेनंतर भारत-आफ्रिका यांच्यात ३ सामन्यांची एकदिवसीय व ५ लढतींची टी-२० मालिकासुद्धा रंगणार आहे. तूर्तास जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) दृष्टीने आफ्रिकेविरुद्धची मालिका महत्त्वाची आहे. यानंतर भारताची पुढील कसोटी मालिका थेट जून २०२६ मध्ये असेल. मात्र सध्या भारताची डब्ल्यूटीसी गुणतालिकेत चौथ्या स्थानी घसरण झाली असून त्यांच्यापुढे दुसरी कसोटी जिंकून मालिका बरोबरीत सोडवण्याचे आव्हान आहे.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दूसरा कसोटी सामना गुवाहटी येथे खेळला जाणार आहे. या सामन्यात भारतीय संघाचे नेतृत्व भारतीय यष्टीरक्षक ऋषभ पंत करणार आहे. शुभमन गिलला या सामन्यातून बाहेर पडला आहे. आक्रमक यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंतने शुक्रवारी कबूल केले की एकाच कसोटीत नेतृत्व करणे ही सर्वोत्तम भूमिका नसली शनिवारपासून येथे सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीतील कठीण आव्हानांवर तो जास्त लक्ष केंद्रित करत नाही.

> **कर्णधारासाठी एकच सामना हा सर्वोत्तम पर्याय नाही, परंतु हा सन्मान दिल्याबद्दल तो बीसीसीआयचे आभार मानतो. कधीकधी, जर तुम्ही एखाद्या मोठ्या संधीबद्दल जास्त विचार केला तर त्याचा काही उपयोग होत नाही. मला त्याबद्दल जास्त विचार करायचा नाही. पहिली कसोटी आमच्यासाठी कठीण गेली आणि आम्ही कसोटी जिंकण्यासाठी जे काही करावे लागेल ते करणार आहोत. – ऋषभ पंत**

ईडन गार्डन्स कसोटी दरम्यान मानेच्या गंभीर दुखापतीमुळे नियमित कर्णधार शुभमन गिलला संघाबाहेर पडला आहे. त्याला रुग्णालयातही दाखल करण्यात आले, त्यानंतर संघ व्यवस्थापनाने पंतकडे कर्णधारपदाची धुरा सोपवली आहे.

# बॉक्सिंगध्ये भारताचा 'सोनेरी' पंच

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या वर्ल्ड बॉक्सिंग कप फायनल २०२५ मध्ये मीनाक्षी हुडाने फोझिलोवाचा ५-० च्या फरकाने मोठा पराभव केला. सुवर्णपदक जिंकल्यानंतर मीनाक्षी म्हणाली की, मी सुरुवातीला घाबरले होते, पण नंतर मी गर्दी पाहून उत्साह निर्माण झाला. देशासाठी सुवर्णपदक जिंकल्याबद्दल मला आनंद झाला आहे.



विश्वचषकातील कांस्यपदक विजेत्या इटलीच्या सिरीन चाराबीला पराभूत हरवून सुवर्णपदक पटकावले. महिलांच्या ५४ किलो वजनी गटात प्रीतीने सिरीनवर जोरदार मुक्का मारले आणि पूर्ण नियंत्रणासह सुवर्णपदकावर नाव कोरले.

यानंतर, भारताच्या अरुंधती चौधरीने देखील आपला दम दाखवत उझबेकिस्तानच्या अझीजा झोकिरवाला धूळ चारत सुवर्णपदकांची कमाई केली. त्यानंतर नुपूर शेओरनने महिलांच्या ८०+ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत उझबेकिस्तानच्या ओल्टिनॉय सोटिम्बोएवाला पराभूत करत भारताच्या खात्यात चौथे सुवर्णपदक टाकले.

भारताची स्टार बॉक्सर निखत जरीनने वर्ल्ड बॉक्सिंग कप २०२५ मध्ये सुवर्णपदक जिंकत भारताच्या खात्यात पाचवे सुवर्णपदक जमा केले. गुरुवारी झालेल्या अंतिम सामन्यात निखतचा सामना चिनी तैपेई बॉक्सर जुआन यी गुओशी झाला. ५१ किलो वजनी गटात निखतने उत्कृष्ट पंच आणि वेगाने तिच्या प्रतिस्पर्ध्याला पराभूत केले आणि राष्ट्रीय ध्वज अभिमानाने फडकवला.

## निवडक

### धनुषचे एअर रायफलमध्ये सुवर्ण



**नवी दिल्ली :** भारतीय नेमबाज धनुष श्रीकांतने टोकियो येथे सुरू असलेल्या डेफलिंपिक्स स्पर्धेत पुरुषांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये सुवर्णपदक जिंकत भारताच्या मोहिमेची विजयी सुरुवात केली. २३ वर्षीय धनुषने अंतिम फेरीत २५२.२ असे कमाल गुण नोंदवत केवळ डेफलिंपिक्सच नव्हे, तर डेफ फाइनल वर्ल्ड रेकॉर्डही मोडीत काढला. भारताच्या मोहम्मद मुर्तजा वानियाने २५०.१ गुणांसह रौप्य पटकावले, तर दक्षिण कोरियाच्या बँक स्यूंघाक याला २२३.६ गुणांसह कांस्य मिळाले. धनुषने पात्रता फेरीत ६३०.६ गुणांची जबरदस्त कामगिरी करीत डेफलिंपिक्स रेकॉर्ड प्रस्थापित केला. मुर्तजा ६२६.३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिला. अंतिम फेरीत धनुषने पुन्हा एकदा विक्रम मोडीत काढत डेफ फाइनल वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला. पुरुष १० मीटर एअर रायफलमध्ये हे त्याचे कारकिर्दीतील दुसरे डेफलिंपिक्स सुवर्ण होते.

### हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**चिपळूण :** संघर्ष क्रीडा मंडळातर्फे रविवारी (दि.३०) नोव्हेंबर रोजी हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेरील राज्यांमधून या स्पर्धेसाठी २१ किलोमीटर आणि दहा किलोमीटर साठी सुमारे २५० स्पर्धकांनी आपली नोंदणी केली आहे. तसेच शालेय गटात पाच किलोमीटर साठी सुमारे बाराशे स्पर्धक सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी एअर मार्शल हेमंत भागवत, प्रसाद देवस्थळी रत्नागिरी, संध्या दाभोळकर यांची ब्रँड अँबेसिडर म्हणून नेमणूक केली आहे. स्पर्धेला कॅप्टन म्हणून डॉक्टर मनीषा वाघमारे यांची नेमणूक करण्यात आली आहे. स्पर्धेत वयांचे पाच ग्रुप करण्यात आल्या असून पुरुष व महिला या विभागात येतात. २१ किलोमीटरसाठी पुरुष व महिला गटात ओपन गट, ३१ ते ४० वय, ४१ ते ५० वय, ५१ ते ६० वय, आणि साठ वर्षावरील असे गट आहेत. तसेच १० किलोमीटर व ५ किलोमीटरसाठी हीच वयोमर्यादा आहे. शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी शालेय गट ठेवण्यात आला आहे.

### पनवेलच्या रोणालला रौप्यपदक

**पनवेल :** पंजाब येथील १६व्या नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्र संघातील रोणाल पाटीलने रौप्यपदक पटकावले होते. रोणाल हा युनायटेड शोटोकान कराटे असोसिएशन इंडिया (नीलेश फायटर) अकॅडमीमध्ये प्रशिक्षक योगेश बैकर यांच्याकडून बॉक्सिंगचे धडे घेत आहे. अमृतसर येथील देशभरातील मातब्बर खेळाडूंमध्ये तिने चमकदार कामगिरी केली आहे. ३० किलो वजनी गटात रोणालने जिद्द, कौशल्य आणि अचूक तंत्रामुळे रौप्यपदक पटकावले होते. रोणालची मेहनत, चिकाटी आणि क्रीडाप्रती असलेली निष्ठेमुळेच राष्ट्रीय पातळीवर मिळवलेले यश पनवेलसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

### इशा-सम्राट जोडीला रौप्यपदक



**कैरो :** इजिप्त येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेत ऐश्वर्यने पात्रता फेरीत विश्वविक्रम प्रस्थापित केला. मग अंतिम फेरीत रौप्यपदकही पटकावले. त्याशिवाय सम्राट राणा आणि ईशा सिंग यांच्या जोडीनेही रौप्यपदकाचा वेध साधला. भारत सध्या पदकतालिकेत दुसऱ्या स्थानी असून त्यांच्या खात्यात ३ सुवर्ण, ५ रौप्य व ३ कांस्य अशी एकूण ११ पदके जमा आहेत. चीन ८ सुवर्णांसह एकूण १४ पदके जिंकल्याने अग्रस्थानी विराजमान आहे. पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात २४ वर्षीय ऐश्वर्यने पात्रता फेरीत ५९७ गुण कमावून विश्वविक्रम प्रस्थापित केला. त्याने अग्रस्थानासह अंतिम फेरी गाठली होती. मात्र तेथे तो काहीसा कमी पडला. आठ जणांचा समावेश असलेल्या अंतिम फेरीत ऐश्वर्यने ४६६.९ गुण मिळवून रौप्यपदक प्राप्त केले. चीनच्या ऑलिम्पिक विजेत्या ल्यू युकूनने ४६७.१ गुणांसह सुवर्ण पटकावले.

# भारताकडून जर्मनीचा धुव्वा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



भारताने दुसऱ्या महिला विश्वचषक कबड्डी स्पर्धेत पहिल्या दोन्ही लढतींप्रमाणे तिसऱ्या लढतीतही प्रतिस्पर्धी जर्मनीचा ६३-२२ असा धुव्वा उडवत उपांत्य फेरीतील प्रवेश केला आहे. आता शेवटची साखळी लढत युगांडाशी होणार आहे. भारताप्रमाणे 'ब' गटातून इराणनेही विजयाची हॅटट्रिक साजरी करत उपांत्य फेरीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे.

वर्ल्ड कप कबड्डीत प्रथमच खेळत असलेल्या जर्मनी संघाचा दारुण पराभव केला. जर्मनीचा खेळ पाहून भारताचा संघ अर्ध्या ताकदीनिशी खेळला तरीही त्यांनी सहजपणे गुणांची पन्नाशी गाठली. जर्मनीवर पाच लोण चढवले. आज झालेल्या अन्य सामन्यांत इराणने तैपेईचा ३१-२१, नेपाळने केनियाचा २८-२१ तर युगांडाने जर्मनीचा ६५-१७ असा धुव्वा उडवला. जर्मनीविरुद्ध ६५ गुण मिळवत उत्तम खेळ दाखवला.

# रोनाल्डोला जिंकण्याची शेवटची संधी

| पोर्टो | वृत्तसंस्था |

ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या गैरहजेरीतही पोर्तुगालने अर्मेनियाचा ९-१ असा दणदणीत पराभव करत २०२६ फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. या विजयामुळे रोनाल्डोला विक्रमी सहाव्या विश्वचषक स्पर्धेत खेळण्याची संधी मिळणार आहे. यापूर्वी मागील लढतीत आर्यलंडविरुद्ध रेड कार्ड मिळाले असल्याने रोनाल्डोला अर्मेनियाविरुद्ध खेळता आले नव्हते. .येत्या जूनमध्ये अमेरिका, कॅनडा व मेक्सिको येथे आगामी फिफा वर्ल्डकप खेळवला जाईल, त्यावेळी रोनाल्डो ४१ वर्षांचा असणार आहे. आतापर्यंतच्या प्रदीर्घ कारकिर्दीत रोनाल्डोला केवळ फिफा वर्ल्डकपच जिंकता आलेला नाही. त्यामुळे आता या शेवटच्या प्रयत्नात त्याची कसर भरून काढण्याची त्याची महत्त्वाकांक्षा असेल, हे स्पष्ट आहे. आर्यलंडविरुद्ध बाहेर पाठवल्यामुळे या पोर्तुगीज खेळाडूला आणखी २ सामन्यांचे निलंबन भोगावे लागू शकते. मात्र, तो तंदुरुस्त राहिल्यास रॉबर्टो मार्टिनेझच्या संघात आपले स्थान कायम राखेल अशी अपेक्षा आहे. आर्यलंडकडून अनपेक्षित पराभव पत्करल्यानंतर पोर्तुगालसाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा होता.

# क्रीडानगरीतून आनंद भारतीची हॅटट्रिक

**मुंबई:** यजमान श्री आनंद भारती समाजाने आपले वर्चस्व अबाधित राखत चंपाषष्ठी उत्सवानिमित्ताने आयोजित ठाणे जिल्हा निवड चाचणी मल्लखांब स्पर्धेत सांघिक विजेतेपदाची हॅटट्रिक साधली. श्री आनंद भारती समाज संघाने तीन सुवर्णपदकांसह नऊ पदके जिंकली. स्पर्धेतील १८ वर्षाखालील मुलांच्या गटात तिन्हीही पदके जिंकत एकहाती विजय मिळवला. स्पर्धेत ५४ गुण नोंदवून श्री आनंद भारती समाजाने सलग तिसऱ्यांदा सांघिक विजेतेपदावर आपली मोहोर उमटविली.

# सात्त्विक-चिरागला जेतेपदाची संधी

**सिडनी :** यंदाच्या आंतरराष्ट्रीय मोसमामध्ये भारतीय खेळाडूंना एकेरी विभागामध्ये जेतेपदापासून सातत्याने दूर राहावे लागत असल्यामुळे उद्यापासून सुरू होत असलेल्या ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारताची मदार पुन्हा एकदा सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीवर असणार आहे. या जोडीला यंदाच्या मोसमातील पहिल्यावहिल्या जेतेपदाची आस असणार आहे..सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीने जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये ब्राँझपदक पटकावले. हाँगकाँग व चायना मास्टर्स या दोन स्पर्धांमध्ये उपविजेतेपदापर्यंत मजल मारली. अठरा आठवडे ही जोडी पहिल्या स्थानावर विराजमान होती. मे महिन्यात या जोडीची २७व्या स्थानावर घसरण झाली, मात्र आता पुन्हा तिसऱ्या स्थानावर मुसंडी मारण्यात या जोडीला यश मिळाले आहे.

# इंग्लडला १७२ धावांत गुंडाळलं

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



ऑस्ट्रेलिया विरुद्ध इंग्लड यांच्यामध्ये पाच सामन्यांची ऐतिहासिक मालिका खेळवली जात आहे. या मालिकेचा पहिल्या सामन्याला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. या मालिकेमध्ये पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या संघाने कमालीची कामगिरी केली आहे. यामध्ये स्टार्कने धुमाकुळ घातला आहे आणि त्याने एकही फलंदाजाला मैदानावर जास्तवेळ टिकू दिले नाही.

सामन्यामध्ये इंग्लडच्या फलंदाजामध्ये फक्त हॅरी ब्रुक याने चांगली खेळी खेळली. मिचेल स्टार्क याने ७ विकेट्स घेऊन पहिल्याच डावामध्ये कहर केला आहे.

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तथापि, मिचेल स्टार्कने सात विकेट्स घेत त्यांचा निर्णय हाणून पाडला. पहिल्या डावात इंग्लंडचा डाव १७२ धावांवर संपला.

इंग्लंडची सुरुवात खराब झाली. मिचेल स्टार्कने पहिल्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर झॅक क्रॉलीला बाद केले. त्यानंतर सातव्या षटकात स्टार्कने बेन डकेटला एलबीडब्ल्यू करत त्याची दुसरी विकेट घेतली. स्टार्कचा तिसरा आणि सर्वात मोठा विजय नवव्या षटकात आला जेव्हा त्याने जो रूटला बाद केले.

रूट त्याचे खाते उघडू शकला नाही. त्यानंतर ऑली पोपने हॅरी ब्रूकसोबत अर्धशतकी भागीदारी केली. इंग्लंडचा चौथा बळी कॅमेरॉन ग्रीनने ऑली पोपला ४६ धावांवर बाद केले.

दुपारच्या जेवणानंतर मिचेल स्टार्कने बेन स्टोक्स आणि ॲटकिन्सनला बाद करून धावसंख्या उघडली, तर डॉगेटने हॅरी ब्रुकला बाद करून त्याची पहिली कसोटी विकेट घेतली. स्टार्कने १२.५ षटकांत ५८ धावा देत ७ बळी घेतले. दुसऱ्या डावाला सुरुवात झाली आहे.

# ईशा पाटीलला सुवर्णपदक



| भाकरवड | प्रतिनिधी |

नवी मुंबई पोलीस मुख्यालय कलंबोली येथे आयोजित अस्मिता अ‍ॅथलेटिक लीग २०२५, २६ केंद्र शासनाच्या खेलो इंडिया उपक्रमांतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण साई आणि भारतीय अ‍ॅलेटिक फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अस्मिता अ‍ॅथलेटिक स्पर्धेचे आयोजन सोमवार (दि.१७) नोहेंबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत को.ए.सो. माध्यमिक विद्यामंदिर शहाबाज शाळेची ईशाने ६० मीटर धावणे, बॅक थ्रो, लांब उडी या क्रीडा प्रकारांमध्ये आपल्या खेळाचे सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करत सुवर्णपदकाची कमाई केली.

तसेच जियो इन्स्टिट्यूट उलवे उरण येथे झालेल्या १४ वर्षीय अजिंक्यपद मैदानी स्पर्धेमध्ये ६० मीटर धावणे, लांब उडी, बॅक थ्रो या स्पर्धेत ईशाने सुवर्णपदक मिळवले. तिच्या यशाबद्दल सोनल पाटील, रोशन पाटील, यतीराज पाटील, बळवंत शिर्षेकर को.ए.सो. शाळा समिती शहाबाजचे चेअरमन अशोककुमार भगत, जगदीश पाटील, सायली शिरीषकुमार पाटील, गीता पाटील, सदू दुटे, जीवन पाटील भाकरवड तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करुन जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ७११ पेक्षा अधिक महाविद्यालयांचा समावेश मुलांमध्ये मुंबई उपनगर, मुलींमध्ये ठाणे विभाग विजयी

# पालीवाला महाविद्यालयात 'खो-खो'चा थरार

| सुधागड-पाली | वार्ताहर |



मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत आंतरविभागीय खो-खो (मुले व मुली) स्पर्धा १८ व १९ नोव्हेंबर रोजी सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयातील जनरल अरुण कुमार वैद्य क्रीडांगणावर उत्साहात पार पडली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे यांच्या निर्देशानुसार आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. मनोज रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

मुंबई विद्यापीठाच्या ७११ पेक्षा अधिक महाविद्यालयांचा समावेश असलेल्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि कोकण या चार विभागांतील संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. मुलांच्या गटात मुंबई उपनगर विभागाने प्रथम क्रमांक पटकावला, तर ठाणे विभाग दुसऱ्या आणि कोकण विभाग तिसऱ्या क्रमांकावर राहिला. मुलींच्या गटात ठाणे विभागाने विजेतेपद मिळवले, तर मुंबई उपनगर आणि कोकण विभाग अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

या स्पर्धेला सुएसोच्या अध्यक्षा गीता पालरेचा, रवींद्र लिमये, ग. रा. म्हात्रे, सुलतान बेनसेकर, तृप्ती मराठे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय पंच खेळाडूंना मार्गदर्शन केले. स्पर्धेतून निवडण्यात येणाऱ्या १५ उत्कृष्ट खेळाडूंचा संघ मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात सध्या कोणताही क्रीडा शिक्षक अथवा संचालक नसतानाही, महाविद्यालयाने ही राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वीपणे आयोजित केली.

प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संतोष भोईर आणि संपूर्ण महाविद्यालयीन टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. लहूपचांग, प्रा. संतोष भोईर, जिमखाना प्रमुख संजय काटकर, क्रीडा विभाग सदस्य दिपाली पांगारे, महेश राहींज, चिंतामण शिंगवा, विद्यार्थी प्रतिनिधी मुकुंद वारगुडे, स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा. संदेश गावडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संतोष भोईर यांनी केले.

> **विद्यार्थी मैदानात उतरले नाहीत, घाम गाळला नाही, तर तीच ऊर्जा चुकीच्या दिशेने वळते. म्हणूनच आमच्या महाविद्यालयात क्रीडा विभाग बळकट करण्याचा निर्णय घेतला. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा खेळ प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली, ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे.**
> **– डॉ. सुधाकर लहूपचांग**
> **प्राचार्य, शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय, पाली**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)